माणूस शनिवार । ५ ऑगस्ट १९७२
पन्नास पैसे

हो. मी पण त्यांना बघितलं होतं. बघितलं अगदी जवळून. बरोबर राहून. दिवसामागून दिवस.

कितीदातरी त्यांच्या समोर जाऊन उभी राह्यलेय. धाकट्या वहिणीसारखी. पोटच्या पोरीसारखी. कधी सुसज्ज लष्करी गणवेषात. कधी चिखलानं बरबटलेल्या, धुळीनं माखलेल्या, फाटक्यातुटक्या कपड्यांनी अंग झाकून. अन् एकदा—

हो, एकदा राजराणीच्या वेषभूषेत. तो अगदी सरता शेवटचा दिवस. त्यादिवशी माझ्या गळ्यात होता हिऱ्यांचा हार. अंगभर होते मोती. कानात कुंडलं, हातात बांगड्या, त्या रत्नखचित अन् डोक्यावर हिऱ्यामोत्यांनी मढवलेला राजमुकुट.

हजारो दिव्यांच्या उजेडात, हजारो प्रेक्षकांच्या समक्ष देशाच्या राजासमोर येऊन उभी राह्यले होते, राणीच्या वेषात.

सालंकृत कन्येला बाप जसं जवळ घेऊन तिच्या मस्तकाचं चुंबन घेतो, तसंच त्यांनीपण मला जवळ घेतलं होतं. अन् म्हणाले होते, ' माझा आशीर्वाद आहे. असंच राजराणीसारखंच तू पण एक दिवस देशाकरिता जीव ओवाळून टाक.'

तो माझ्या आयुष्यातला दुर्लभ क्षण होता. तो हजारो दिव्यांचा उजेड. हजारो प्रेक्षकांचा तो मुग्ध विस्मय अन् ते उंचशुभ्र हिमालयासारखं एक व्यक्तित्त्व. . .

या व्यक्तित्त्वाची एक नवी ओळख . . .

# मी नेताजींना बघितलंय्

प्रत्यक्ष साक्षीदारांच्या जबान्या
लेखक : नारायण सान्याल
अनुवादक : अशोक शहाणे

**माणूस १५ ऑगस्ट विशेषांकापासून सुरू होणारी रौप्यमहोत्सवी लेखमाला.**




मलपृष्ठ १ पहा

माणूस
शनिवार
५ ऑगस्ट १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : दहावा

वार्षिक वर्गणी
पचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार....

२९ जुलै १९७२

□ 'कॉलेजातील विद्यार्थ्यांचे पोषाख' यावरील आंदोलनावरून ४० वर्षांपूर्वीचे कोल्हापूर आठवले. त्या काळी विद्यार्थी काळ्या वनातीच्या टोप्या वापरीत (करवीर दरबारची शुभ्र खादीवर इतराजी असे!) प्रोफेसर मंडळींनी फेटा बांधावा असा दंडक असे. प्रिन्सिपल डॉ. बाळकृष्ण पंजाबी आर्यसमाजीय असल्याने रेशमी साफा बांधीत. कॉलेजच्या वार्षिक समारंभाना ज्या वेळी हुजूरस्वाऱ्या हजर असत, त्यावेळी प्रोफेसरानी फेटे बांधावेतच असा हुकूम असे. प्रो. फडके हे बंडखोर! नाटय-प्रयोगात काम केल्याबद्दल त्यांना बक्षिस होते. ते घेण्यासाठी विंगमधून फडके बोडके येत आहेत हे पाहताच प्रिन्सिपॉलनी त्यांना नजरेने दटावले. फडक्यांनी कुणाचा तरी उसना साफा कसावसा डोक्याला गुंडाळला आणि स्टेजवर येऊन त्यांनी बक्षिस घेतले. प्रेक्षागृहातून विद्यार्थ्यांनी ज्या टाळ्या दिल्या त्याचे वर्णन काय करावे? फडक्यांची ती एंट्री अगदी नाटयपूर्ण वठली.

संस्थानिकांची जागा आता संस्थाचालक धनिक शेटजीनी घेतली आहे. त्यांना बदललेल्या काल-लाटेची जाणीव विद्यार्थी देतच आहेत.

—गो. शं. हुजूरबाजार, मुंबई

# मुंबई वार्ता

## दर्यासारंग भाऊसाहेब सोमण आणि अहमदाबादची नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाइन

**प्रतिनिधी**

दर्यासारंग बी. एस्. सोमण हे भारतीय आरमारप्रमुख होते. काही वर्षांपूर्वी ते या पदावरून सेवानिवृत्त झाले. गेली दोन वर्षे ते अहमदाबादच्या 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाइन' या संस्थेच्या कार्यकारी संचालक पदावर होते.

त्यांनी स्वखुशीने राजिनामा दिला असा देखावा या संस्थेने उभा करण्याचा प्रयत्न केला असला तरी आपल्याला काढून टाकण्यात आले आहे असे श्री. सोमण स्वत: सांगतात.

दहा-बारा दिवसांपूर्वी श्री. सोमण अहमदाबादहून मुंबईस आले. सध्या ते या संस्थेच्या अनागोंदी कारभाराची लक्तरे वेशीवर टांगण्याचे एक महत्त्वाचे कार्य करीत आहेत.

प्रधानमंत्र्यांनाही त्यांनी यासंबंधी पत्र लिहिले आहे. लोकसभेत या संस्थेसंबंधी काही खासदार प्रश्न विचारतील अशीही अपेक्षा आहे.

या संस्थेवर गेल्या दहा वर्षांत एकूण अडीच कोटी रुपये खर्च झाले आहेत. भारत सरकारने १–२ कोटी, अमेरिकेतील फोर्ड फाऊंडेशनने ८० लाख आणि गुजरात सरकारने ५० लाखाचा निधी या संस्थेला दिला. पण एवढी रक्कम मिळूनही अस्मानी सुलतानी कारभारामुळे या संस्थेचा ठसा नावापुरता राष्ट्रीय सोडला, तर खऱ्या अर्थाने राष्ट्रीय महत्त्वाचा ठरलाच नाही. त्यात साराभाई कुटुंबाचीच मक्तेदारी निर्माण झाली. ज्या डिझाइन्सच्या क्षेत्रात काही खास करण्यासाठी म्हणून १९६१ च्या सुमारास या संस्थेची स्थापना झाली, त्या क्षेत्रात वा डिझाइनर्स तयार करण्याच्या शैक्षणिक क्षेत्रात या संस्थेने काहीही चमक

दाखविली नाही. एकूण सारा कारभारच नालायकीचा.

या साऱ्याला प्रामुख्याने जबाबदार असलेली व्यक्ती म्हणजे श्री. गौतम साराभाई. प्रधान मंत्र्यांकडे जोरदार वशिला असलेल्या श्रीमती पुपुल जयकर आणि केंद्र सरकारचे प्रतिनिधी श्री. तलवार यांनी श्री. साराभाई यांना, श्री. सोमण यांना उडवायला मदत केली असे श्री. सोमण यांनी सांगितले.

संस्थेचा अंदाधुंदी कारभार सुधारण्यास, संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणून श्री. सोमण यांनी सुरुवात करताच संस्थेच्या अध्यक्षपदी असलेल्या श्री. गौतमभाईंनी कारवाया करायला सुरुवात केली आणि शेवटी संस्थेच्या कार्यकारी संचालकपदी आम्हाला तरुण माणूस नेमायचा आहे या सबबीवर श्री. सोमण यांना बडतर्फ केले. याचे एकमेव कारण म्हणजे श्री. गौतमभाईंना मिळणाऱ्या मोकळ्या कुरणावर बंधने पडणार होती हेच होते.

येथे संस्थेची थोडी माहिती करून घेणे उपयुक्त ठरेल.

१९६१ च्या सुमारास सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ आणि अणुशक्ती मंडळाचे अध्यक्ष कै. डॉ. विक्रम साराभाई यांनी 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट' या संस्थेची स्थापना करण्यात पुढाकार घेतला आणि ते स्वत: त्या संस्थेच्या प्रमुखपदी आले. याच सुमारास त्यांचे बंधू श्री. गौतम साराभाई नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाइनच्या प्रमुखपदी आले. एकाच वेळी या दोन संस्था सुरू होणे व दोन भाऊ या संस्थांच्या प्रमुखपदी असणे एवढा एकसारखेपणा सोडल्यास या दोन्ही संस्थांच्या कार्यात जमीन अस्मानाची तफावत आहे.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटने आज देशातच नव्हे तर परदेशातही ख्याती मिळवली आहे. या संस्थेतून शिकून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांला नोकरी शोधावीच लागत नाही. संस्थेची ख्याती एवढी आहे की निरनिराळ्या बड्या कंपन्यांचे बडे अधिकारी अहमदाबादेत तळ ठोकून असतात आणि विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यापूर्वीच त्यांची बड्या अधिकारांच्या जागांसाठी निवड करतात. या उलट नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाइनची अवस्था. या संस्थेने १९६९ साली पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला तर १९७० साली त्याचे रूपांतर पदवीपूर्व अभ्यासक्रमात करण्यात आले. १९६९ सालापर्यंत संस्थेने १०५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. त्यापैकी ७१ विद्यार्थी कोर्स पूर्ण न करताच संस्था सोडून गेले तर २९ जणांना संस्थेने स्टाफवर घेतले, आणि ५ जण अजूनही आपला अभ्यासक्रम करीत आहेत.

प्रॉडक्ट डिझाइन, व्हिज्युअल कम्युनिकेशन, सिरॅमिक डिझाइन, फर्निचर डिझाइन, प्रिन्टींग डिझाइन, टेक्स्टाईल डिझाइन आणि आर्किटेक्चर डिझाइन एवढे सात कोर्सेस शिकवण्याची व्यवस्था तेथे व्हायची होती. पण ७० सालापर्यंत ठराविक अभ्यासक्रम वा कोर्सची काहीही व्यवस्था केली गेली नव्हती. यासंबंधी एक मजेदार

किस्सा सोमणांनी सांगितला. या संस्थेत, काहीही सबंध नसतांनाही संगीताचे पाठ दिले जात होते.

भारत सरकार आणि फोर्ड फाऊंडेशनने ही संस्था उभारली. जेव्हा संस्था उभी राहात होती तेव्हा वरील प्रकारचे शिक्षण देण्याच्या फारच थोड्या सोई देशात उपलब्ध होत्या. पण फोर्ड फाऊंडेशनने जगप्रसिद्ध अशा परदेशी डिझाइन कन्सल्टंटस्च्या दौऱ्यांची व्यवस्था केली. श्री. चार्ल्स इएम्स यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या डिझाइनरने, फोर्ड फाऊंडेशनतर्फे कारभाराची चौकशी केली आणि त्यातील गैर व्यवहार पाहून मदत बंद करण्याचा त्यांनी शिफारस केली. ही संस्था १० वर्षांपूर्वी सुरू करण्यात त्यांनीच महत्त्वाची कामगिरी बजावली होती.

साराभाई कुटुंबाचे या संस्थेत फारच मोठे प्रस्थ आहे. श्रीमती हिरा साराभाई यांच्याकडे संस्थेचा कारभार चालविण्याची जबाबदारी श्री. गौतम साराभाई यांनी टाकली. एवढेच नव्हे तर संस्थेसाठी मशिनटूल्स यांची आयात करणे किंवा यासाठी जल वा हवाई वाहतुकीची सोय पहाणे किंवा अशा प्रकारची इतर सारी कामे साराभाई कुटुंबाच्या मालकीत असलेल्या एजन्सीजकडे देण्यात आली. या सर्व कारणांमुळेच गेल्या वर्षात संस्थेने एकही डिझाइन वा डिझाइनर तयार केलेला नाही. ही फारच मोठी राष्ट्रीय हानी आहे. संस्था सुरू करताना या देशातील औद्योगिक मालाचे स्वरूप, उठावदार सुबक व आकर्षक दिसून त्याला बाजारपेठ मिळावी हा हेतू होता.

श्री. सोमण यांच्या बडतर्फीचा तमाशाही औरच होता. गव्हर्निंग कौन्सिलच्या ज्या सभेत त्यांच्या बडतर्फीचा निर्णय घेण्यात आला, त्या कौन्सिलच्या बैठकीत नऊ सदस्यांपैकी फक्त चारच हजर होते. त्यापैकी, पूर्वीपासूनच या संस्थेबाबत तत्त्वशुद्ध भूमिका घेतलेले, गुजरात सरकारचे मुख्य सचिव श्री. दलाल यांनी बडतर्फीला विरोध केला तर श्री. गौतम साराभाई; त्यांच्या उजवा हात असलेल्या श्रीमती पुपुल जयकर आणि केंद्र सरकारचे प्रतिनिधी श्री. तलवार यांनी बडतर्फीच्या बाजूने मत दिले.

दर्यासारंग भास्करराव सोमण यांच्यावर अन्याय झाला आहे हे तर यावरून स्पष्ट होतंच आहे. संस्थेचा कारभार किती बरबटलेला आहे हे फोर्ड फाऊंडेशनने संस्थेची मदत बंद केली यावरून सिद्ध होते. हा प्रश्न श्री. सोमण यांच्या एकटयाच्या प्रतिष्ठेचा नाही. पैसा आणि खुर्ची यांच्यामागे लागणाऱ्यांपैकी श्री. सोमण नव्हेत.

पण स्वत:च्या व्यक्तिगत स्वार्थासाठी एका राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेचा जो बोजवारा श्री. साराभाई यांनी उडविला आहे. त्यामुळे देशाचे अतोनात नुकसान होत आहे. यासाठीच संस्थेच्या गेल्या दहा वर्षातील कारभाराची चौकशी होणे रास्त ठरेल.

अशा चौकशीची मागणी खुद्द श्री. सोमण यांनीच प्रधानमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात केलेली आहे.

## पुनश्च सोमय्या कॉलेज !

घट्ट तुमानी, तोकडे स्कर्टस् मुर्दाबाद वरून सोमय्या कॉलेजमधील वातावरण पारच बिघडून गेले. एवढेच नव्हे तर मुलांना चिथावणी दिल्याच्या आरोपावरून एका प्राध्यापकाला तात्पुरते नोकरीवरून दूर करण्यात आले. दिवसेंदिवस या प्रश्नाने उग्र रूप धारण केले. बुधवारी तर भयंकरच प्रकार घडला. विद्यार्थ्यांनी प्राध्यापक वा प्राचार्यांना घेरावो घालण्याचा प्रकार मुंबईत अगदी नवा आहे. सध्या मुंबईतील विद्यार्थीजगत् अस्वस्थ दिसते आहे.

या वर्षीच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवातच अस्वस्थतेतून झाली. गेल्या आठवडाभरच्या विद्यार्थी जगताच्या घटनांकडे पहाता असे दिसते की एकाचवेळी अनेक कॉलेजीसमध्ये काहीना काही कारणांवरून अशांतता निर्माण झाली; हा एक निव्वळ योगायोगाचा भाग होता की, यामागे काही लोकांचे संघटीत प्रयत्न होते हे तात्काळ निदर्शनाला येऊ शकले नाही. लॉ कॉलेजच्या संपप्रकरणी कम्युनिस्ट पक्षाचा एक कार्यकर्ता बऱ्याच हालचाली करताना दिसला, तर सोमय्याच्या संपात कलकत्याहून आलेल्या कुमार नावाच्या एका विद्यार्थ्याचे नाव ऐकू आले.

बुधवारी तर सोमय्याच्या विद्यार्थ्यांनी युनिव्हर्सिटीत थैमानच घातले. झाला प्रकार खासच अशोभनीय होता. युनिव्हर्सिटीतील गरीव बिचारा तो कॅन्टीनवाला. त्याला विद्यार्थ्यांनी छळले, लुटले त्याची नासधूस केली. विद्यापीठाचे फर्निचरही मोडले.

आवारात उभ्या असलेल्या मोटारींच्या टपावर आदळआपट केली, त्यांच्या चाकातील हवा काढून घेतली. विद्यापीठाच्या टेलिफोन ऑपरेटरलाही त्यांनी फार त्रास दिला. एवढेच नव्हे तर उपकुलगुरु श्री. टोपे यांच्याशीही त्यांनी अयोग्य वर्तन केले. धक्काबुक्की केली. त्यांच्या खोलीतून काही वस्तू गेल्याचेही म्हणतात. पाहुण्यांसाठी फ्रीजमध्ये ठेवलेल्या वस्तू त्यांच्या खोलीत घुसलेल्या विद्यार्थ्यांनी खाल्ल्या असेही म्हणतात. उपकुलगुरु महाशयांच्या चेंबरबाहेर जोरात बिगुल वाजविणे वगैरेही चालले होते. मुंबई विद्यापीठाच्या इतिहासातील हा पहिला प्रकार. यापुढे असे प्रकार नेहमी घडणार आहेत. कारण आता या विद्यार्थ्यांचे अनुकरण इतर जण करणारच. या दृष्टीने झाला प्रकार निश्चितच वाईट झाला. पण याचा बराचसा दोष, विद्यापीठ, उपकुलगुरु आणि राज्याच्या शिक्षणमंत्र्यांकडे तसेच सोमय्याचे व्यवस्थापक आणि खुद्द श्री. सोमय्या यांच्याकडे जातो. विद्यार्थी या थराला जाईपर्यंत सर्व काय करीत होते ? सोमय्या शेठ आणि मॅनेजमेन्ट आपला हटवाद सोडायला तयार नव्हते तर विद्यापीठाचे अधिकारी कुंपणावर बसले होते. शिक्षणमंत्र्यांनाही याची दखल घ्यावीशी वाटली नाही. त्यामुळे चिडलेल्या

विद्यार्थ्यांकडून चुकून असे गैरवर्तन घडले असेल. तसे नसते तर झाल्या प्रकाराबद्दल 'आम्हाला क्षमा करा सर, सर केलीत ना क्षमा ?' असे त्यांनी उपकुलगुरू श्री. टोपे यांना म्हटलेच नसते. श्री. टोपे यांनीही त्यांना मोठ्या मनाने क्षमा केली, हेही चांगले झाले. त्यामुळे वातावरणात गढूळपणा वा कडवटपणा राहिला नाही.

पण टाईट पॅन्टस्वर बंदी हे नुसते निमित्त होते. त्यापेक्षाही महत्त्वाचे इतर अनेक प्रश्न आजही सोमय्या कॉलेजात पूर्वी इतकेच ठाण मांडून बसले आहेत. १६ जूनला कॉलेज सुरू झाले तरी वेळापत्रक तयार नव्हते. १० जुलैला फायनल टाइम टेबल तयार झाले, पण अजूनही त्याची अंमलबजावणी नाही. जुलै संपत आला असला तरी कॉमर्स आणि इंग्रजी विभागात काही लेक्चरर्सच्या नेमणुका व्हायच्या आहेतच.

विद्यार्थी भरमसाट आहेत पण त्यामानाने वर्ग कमी आहेत. काही वर्गात बाके नाहीत. तर काहींमध्ये फळे नाहीत किंवा पंखे नाहीत. किंवा दोन्हीही नाहीत. सायन्स, कॉमर्स, आर्टसचे विभाग वेगळे करण्यात आले आहेत पण या फॅकल्टीच्या लेक्चरर्सची योग्य व्यवस्था नाही. पिण्याच्या पाण्याचे नळ फारच कमी आहेत. पाणी पिण्यासाठी एका बिल्डींगमधून दुसऱ्या बिल्डींगमध्ये जावे लागते. मुताऱ्यांची व्यवस्था तर भयानकच आहे. स्टाफसाठी तळमजल्यावर दोन आणि विद्यार्थ्यांसाठी सर्वात वरच्या मजल्यावर दोन अशी ही मुताऱ्यांची व्यवस्था आहे असे सांगून कोणाला खरे वाटणार नाही. विद्यार्थिनींनाही याबाबत बरीच गैरसोय सोसावी लागते. कॉलेजच्या व्यवस्थापकांनी या साऱ्या गोष्टींची बिलकूल दखल घेतलेली दिसत नाही. ही




अवस्था अशीच राहिली तर पुन्हा अशांतता निर्माण होणारच नाही असे सांगणे कठीण आहे.

जाता जाता एका गोष्टीचा उल्लेख करतो. असे म्हणतात, की परवा केव्हातरी उपकुलगुरू श्री. टोपे म्हणाले होते की, विद्यापीठ, कॉलेजच्या प्रॉपर्टीचा गैरवापर होऊ देणार नाही. हे अर्थातच मॅनेजमेंटला उद्देशून असावे कारण याबाबत कालच काही गोष्टी कानावर आल्या. सोमय्याचे व्यवस्थापक ती संस्था बंद करण्याच्या विचारात असल्याचे कळले.

यामागे काही काळेबेरे आहे असेही मला सांगण्यात आले. शैक्षणिक संस्थेकरिता म्हणून, कॉलेज असलेली जागा सवलतीच्या दराने मिळविण्यात आली होती व त्या जागेवर संबंधितांचा डोळा आहे व त्यासाठीच वरील कारवाया चालू आहेत असे या संदर्भात मला सांगण्यात आले. तेव्हा श्री. टोपे यांच्या विधानाचा संबंध याच्याशी कुठे असेल काय ?

## आपलेच दात आपलेच ओठ

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी संचलनालयामध्ये सध्या एक गुप्त चौकशी चालू आहे. याची कुणकुण तशी कोणाला लागलेली असावी असे दिसत नाही. म्हणतात ना ' आपलेच दात आपलेच ओठ ' तसाच प्रकार येथे आहे. सरकारचे पोलीस खाते, सरकारच्याच एका महत्त्वाच्या खात्याची अत्यंत गुप्तपणे आणि वरच्या पातळी-वरून चौकशी करीत आहे. खात्यामार्फतही अशी चौकशी होऊ शकली असती मग ही चौकशी स्पेशल ब्रॅन्चकडे का सोपवण्यात आली ?

श्री. गोपाळ गोडसे यांच्या ' गांधीहत्त्या आणि मी. ' या पुस्तकाच्या सुमारे तीस प्रती महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी संचलनालयाने विकत घेण्याचा ' गुन्हा ' केला त्याचीही अत्यंत वरच्या पातळीवरून गुप्त चौकशी चालू आहे. या प्रती महाराष्ट्र सरकारच्या माहिती केंद्रासाठी घेण्यात आल्या असे समजते.

महाराष्ट्र माहिती केंद्रासाठी पुस्तके घेण्यासाठी एक समिती आहे. त्याचप्रमाणे सचिवालयातील संदर्भ ग्रंथालयासाठीही एक अशीच समिती आहे. या समितीवर फक्त एकच व्यक्ती असते आणि ती म्हणजे महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचीव, तर माहिती केंद्रांसाठी पुस्तके घेण्यासाठी असलेल्या समितीवर सर्वसामान्य प्रशासन खात्याचे सचीव, प्रसिद्धी संचालक आणि उपप्रसिद्धी संचालक हे तिघेजण असतात. १९६९ साली या पुस्तकाच्या प्रती घेण्यात याव्यात अशी शिफारस करण्यात आली. ७० साली त्या घेण्यात याव्यात असे ठरले पण त्या वेळी संचालनालयाकडे प्रती घेण्यासाठी पुरेसे पैसे नव्हते म्हणून ७२ साली त्या घेण्यात आल्या. परवा

विधानसभेत श्री. घोंगडे यांनी यावर प्रश्न विचारला आणि चौकशीचा घाट घालण्यात आला. ही चौकशी ६९ सालापर्यंतचे धागेदोरे पहाणार आहे.

गेल्या शुक्रवारी या चौकशीला आरंभ झाला. काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी एका उपपोलीस आयुक्ताच्या हाताखाली ही चौकशी सुरू केली. शुक्रवारी रात्री सचिवालय उघडायला लावून प्रसिद्धी संचालनालयाच्या निरनिराळ्या विभागात कागदपत्रांची शोधाशोध सुरू झाली. त्याच रात्री सचिवालयातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याही घरी पोलीस गेले. यासंबंधीची कागदपत्रे गहाळ असल्याचे म्हणतात. या पुस्तकाच्या प्रती घेण्यासंबंधीचा फक्त एकच कागद पोलिसांच्या हाती लागला पण त्यावर कोणाचीच सही नाही त्यामुळे हा हुकूम कोणी दिला याची पोलीस चौकशी करीत आहेत.

या चौकशीत महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांची जबानी घेतली गेली. त्यांनी उत्तर दिले की सचिवालयातील वाचनालय हे वाचनालय नव्हे तर ते संदर्भ ग्रंथालय आहे. त्यामुळे जप्त पुस्तकेही त्यात असली तर त्यात चूक काही नाही. शासनाला त्यांची वेळप्रसंगी आवश्यकता भासते. म्हणूनच आपण यात काही चूक केली नाही असे ते म्हणाले, अर्थातच त्या ग्रंथालयासाठी फक्त एक दोनच प्रती घेण्यात आल्या असल्याचे समजते.

प्रसिद्धी संचालनालयातर्फे असे सांगण्यात आले की ही नकळत चूक झाली. एका उपप्रसिद्धी संचालकाला जबानीत विचारले गेले, आपण येथे आलेली पुस्तके वाचता का ? त्यावर त्यांनी उत्तर दिले ते पुस्तके वाचत नाहीत. पुस्तके आल्यावर ती पाहून फक्त ते सह्या करतात. चौकशी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने या उत्तराची नोंद करून घेण्यास त्याच्या हाताखालील माणसास सांगितले. गोव्यात असलेल्या महाराष्ट्र माहिती केंद्राधिकाऱ्यांचीही जबानी घेतली गेली असे म्हणतात.

खात्यामार्फत चौकशी न करता पोलीस चौकशी का ? याचे एक कारण असे असल्याचे म्हटले जाते की प्रसिद्धी संचालनालयात जनसंघ प्रवृत्तीची अनेक माणसे कामाला आहेत असे मुख्यमंत्र्यांचे कोणीतरी कान चावले आणि म्हणूनच अगदी तळापर्यंत जाऊन चौकशी करण्याचा आदेश पोलिसांना देण्यात आला.

□ □ □

# सर्जनशील बेचैनी पेरणारे कार्यक्रम हवेत !

**यदुनाथ थत्ते**

दिल्लीला राष्ट्रीय विकास मंडळाची बैठक झाल्यानंतर स्वातंत्र्याचे रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करण्याबाबतही मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. काही अखिल भारतीय कार्यक्रम आणि काही स्थानिक कार्यक्रम मिळून सबंध वर्षाची दैनंदिनी तयार करण्यात येणार आहे आणि त्यानुसार वर्षभर कार्यक्रम होत राहणार आहेत. स्वातंत्र्याची चिरस्मरणीय गाथा स्वातंत्र्योत्तर जन्मलेल्या पिढ्यांपर्यंत पोचवणे हा या वार्षिक कार्यक्रमांचा एक भाग राहील. स्वातंत्र्यासाठी शंभर दीडशे वर्षे ज्या अनंत देशभक्तांनी प्रयत्न केले त्यांचे हे संकीर्तन उन्नत करणारे असेल यात शंका नाही. गांधी जन्मशताब्दी वर्षात वर्षभर जसे विविध कार्यक्रम झाले तसे स्वातं·त्र्याच्या रौप्य महोत्सवी वर्षातही सर्वत्र झाले पाहिजेत. पण या बाबतीत म्हणावी तशी काही तयारी सुरू झाल्याचे दिसत नाही. पंधरा ऑगस्ट होऊन गेल्यावर ह्या बाबतीत हालचाल सुरू झाली तर नोकरशाहीच्या आस्थाशून्य दप्तर दिरंगाईच्या प्रथेला धरूनच ते होईल ! पण असे होता कामा नये. शाळा सुरू झाल्या आहेत, महाविद्यालयेही सुरू झाली आहेत. अद्याप आठवड्याचा अवधी आहे. तळ-मळीने काम सुरू केले तर अद्यापही वेळ साधता येईल.

गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षात ' अपुरे त्यांचे स्वप्न राहिले ' असा कार्यक्रमाच। एक भाग असे. भंग्याची मुलगी राष्ट्रपतिपदी सहज बसू शकेल असे सामाजिक परिवर्तन गांधीजींना अभिप्रेत होते. हे त्यांचे अपुरे स्वप्न पूर्ण होण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष करण्यासारख्या काही गोष्टी दाखवण्यात आल्या होत्या. जातीय उच्चनीचतेच्या शापातून देशाची सुटका व्हावी यासाठी विद्यार्थ्यांनी विधायक बंड केले पाहिजे, असे त्यांना सांगण्यात आले होते. गांधी बालपणापासून जणू रूढ मार्गाविरुद्ध वैचारिक व सक्रिय बंडखोरी करीत आले होते. घरातून सफाई करणाऱ्या उदक भाईला का शिवायचे नाही, या प्रश्नाने त्यांनी आईला भंडावून

सोडले होते. आणि हरिजनांना स्पर्श करून त्यांनी ही बंडखोरी जोपासत नेली होती. शाळेतील रूढ संकेताविरुद्धही त्यांनी बंडखोरी केली होती आणि पुढच्याचे पाहून आपले स्पेलिंग दुरुस्त करण्याचे नाकारून मूढपणा पत्करला होता. त्यांच्या रक्तात भिनलेली ही बंडखोरी न सांगता गांधी गौरवाची गाथा गाणे हे व्यर्थ होते. मुलांच्या विधायक बंडखोरीला आवाहन करणारे गांधीच त्यांना स्वाभाविकपणे रूचण्यासारखे होते.

## तृष्णेची अस्वस्थताही हवी

स्वातंत्र्याबाबतही विद्यार्थ्यांना सांगताना अपुऱ्या राहिलेल्या राष्ट्रीय स्वप्नांची जाणीव त्यांना करून दिली पाहिजे. स्वातंत्र्याची जयगाथा गाताना नुसती तृप्तीची गुंगी येऊन उपयोगी नाही तर तृष्णेची अस्वस्थताही त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे. असे झाले तरच स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव हा कृतिप्रेरक होऊ शकेल. भारतीय संविधानात आपल्या राष्ट्रपुरुषांची अनेक स्वप्ने ग्रथित झालेली आहेत आणि त्यांचा आपण मागोवा घेऊ लागलो तर अनेक अपुऱ्या स्वप्नांचे भान होऊन तरुणांमध्ये एक सर्जनशील बेचैनी निर्माण होईल. अशी सर्जनशील बेचैनी स्वातंत्र्योत्तर जन्मलेल्या पिढीत कशाप्रकारे पेरता येईल त्याचा विचार स्वातंत्र्य रौप्यमहोत्सवाची आखणी करणाऱ्यांनी केला पाहिजे.

एकात्म भारताची नवनिर्मिती करणे हा आपल्या स्वातंत्र्याच्या चळवळीचा मूळ हेतू होता. अशा एकात्म भारताची निर्मिती करण्यासाठी कोणती पावले उचलावी लागतील, त्याचा आराखडा आपल्या संविधानात दिलेला आहे. लोकशाही, समाजवाद आणि जातिधर्मातीत समान नागरिकता ही आपल्या संविधानाची बुनियाद आहे. लोकशाहीसाठी सुजाण नागरिक तयार करावे लागतात आणि त्यासाठी प्रबोधनाचे अनेकविध प्रयत्न हाती घेतले पाहिजेत. समाजवाद हे सुसंघटित समाजाचेच तत्त्वज्ञान होऊ शकत असल्याने लोकसंग्रहासाठी रचनात्मक कार्याचे भगीरथ प्रयत्न करावे लागतात. गांधीजींनी विधायक किंवा रचनात्मक कार्याची व्याख्याच अशी केली होती, की ज्यातून लोकसंग्रह साधतो ते विधायक कार्य. जातिधर्मातीत समान नागरिकत्वासाठी संसदीय संस्थांतून आणि लोकजीवनातही संघर्ष करण्याची सिद्धता करावी लागते. अनेक वेळा लोकप्रतिनिधीही कर्तव्यच्युत होण्याचा धोका असतो आणि अशा वेळी युवाशक्तीने त्यांना जागे करावयाचे असते. मताची मतलबाशी पडलेली गाठ त्यांना तोडावी लागते.

## चौवेचाळीसाव्या कलमाची उपेक्षा

आपल्या संविधानात राज्याच्या मार्गदर्शक सूत्रात एक ४४ वे सूत्र आहे. हे सूत्र असे सांगते की, 'राज्य सर्व नागरिकांना एक समान नागरी कायदा उपलब्ध करून देण्याचे कर्तव्य बजावील.' घटनेने जे मूलभूत अधिकार नागरिकांना दिले आहेत त्यात समान कायदा आणि कायद्याचे समान संरक्षण देण्याचे आश्वासन आहे.

समान नागरी कायद्याच्या अभावी हे मूलभूत अधिकार छिनावून घेतले जातात. युवकांनी याबाबत गेली पंचवीस वर्षे चाललेली चालढकल थांबवण्यासाठी कंबर कसली पाहिजे. येत्या पंधरा ऑगस्टला हे अपुरे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प त्यांनी जाहीर रीतीने केला पाहिजे. स्वराज्य हा जसा गुलाम देशातील नागरिकांचा जन्मसिद्ध हक्क आणि तो मिळवण्यासाठी निरंतर प्रयत्न करणे हे जसे त्यांचे कर्तव्य, त्याप्रमाणेच लोकशाही, समाजवाद आणि जातिधर्मातीत समान नागरिकत्व यासाठी कटिबद्ध झालेल्या देशात समान नागरी कायदा हा नागरिकांचा मूलभूत हक्क आणि तो प्राप्त करून घेणे हे त्यांचे कर्तव्य होय. युवक हे समाजाचे जागले असतात आणि ज्यांना मतलबाची गुंगी या बाबतीत आली असेल त्यांना जागे करणे व वाटचाल करायला भाग पाडणे हे देखील त्यांचे कर्तव्यच होय. युवकांनाच तात्कालिक लाभाची गुंगी चढली तर स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव हा केवळ उपचार ठरेल.

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी युवकांनी मेळावे घेऊन या अपुऱ्या स्वप्नांच्या पूर्तीचा पाठपुरावा करण्याचा दृढ निश्चय व्यक्त करावा. १५ ऑगस्ट ते २६ जानेवारी-पर्यंत, सर्व लोकशाही संस्थातून केन्द्र सरकारकडे ४४ व्या कलमाची अविलंब अंमलबजावणी करण्याची मागणी करणारे प्रस्ताव केले जातील. यासाठी तरुणांनी प्रयत्न करावे. आम जनतेच्या मनातील मौन–आकांक्षा मुखरित करणे हाही घटनेने दिलेल्या भाषण स्वातंत्र्याचाच एक भाग आहे.! लोकभयादी कारणांनी या स्वातंत्र्याला जनतेला व तिच्या प्रतिनिधींना पारखे व्हावे लागता कामा नये. राष्ट्र-पती व पंतप्रधानांना अशा ठरवांच्या तारा मोठ्या संख्येने गेल्या पाहिजेत. हे स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे अतिशय प्रभावी असे शुभचिंतन ठरेल. लोक-प्रतिनिधींच्या मनावरील दडपण दूर करण्यासाठी सर्व वैध मार्गांचा युवकांनी वापर केला पाहिजे. राष्ट्रीय संकल्पाच्या पाठीमागे लोकशक्तीची प्रभावी कर्तबगारी उभी करणे अत्यावश्यक आहे. डॉ. गजेंद्रगडकरांच्या अध्यक्षतेखाली देशात एक लॉ कमिशन सध्या कार्य करीत आहे. या लॉ कमिशननेही समान नागरी कायद्याचा आराखडा सरकारला सादर केला पाहिजे. लॉ कमिशनने हे काय अविलंब करावे असेही प्रस्ताव सर्वत्र झाले पाहिजेत.

आपल्या संविधानाचाही रौप्य महोत्सव पंचाहत्तरमध्ये देशभर साजरा केला जाईल. आपल्या संकल्पबळाने नागरिकच संविधानात प्राण-शक्तीचा संचार करीत असतात. भारतीय संविधानाला आधारभूत असणारे ४४ वे कलम हे आता केवळ राज्याचे मार्गदर्शक तत्त्व न राहाता व्यवहाराचे सूत्र बनले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर जन्मलेली पिढी याच मार्गाने दास्यमुक्त देशाला कृतार्थ बनवू शकेल.

□ □ □

## मुक्काम पुणे

# ऑपरेशन मेयर इलेक्शन !

## —एक अफलातून रहस्यकथा

एमेम

परवा रिक्षातून जात असताना कोणा एकाची वही रिक्षात विसरलेली पाहिली. उत्सुकतेने उघडली आणि चाटच पडलो. पहिल्याच पानावर लिहिले होते, 'ऑपरेशन मेयर इलेक्शन' (चार खून, बारा आत्महत्या) एक अफलातून रहस्यकथा !

पुण्याच्या महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही कथा बेतली आहे. ही निवडणूक सुरुवातीला इतर निवडणुकांप्रमाणेच गाजली, पण नंतर मात्र एकदम या प्रकरणाला रहस्यमय स्वरूप प्राप्त होऊ लागले. यासंबंधीच्या बातम्या आम्ही वृत्तपत्रात वाचत होतो. पण एवढ्यात या विषयावर कुणी पुस्तक लिहिल असे वाटले नव्हते. पण 'प्रचलित विषयावर वाङ्मय निर्माण करा' या साहित्यसंमेलनाध्यक्षांच्या सूचनेवरून कुणा नवख्या लेखकाने हे धाडस केले असावे. असो !

पहिल्या प्रकरणाला सुरुवात होते महापालिका सभागृहातील मिठ्ठापल्लींच्या भाषणाने ! महापौरपदाच्या खुर्चीसाठी समाजवादी पैलवान निळूभाऊ लिमये यांच्याबरोबर कुस्ती चालू असताना कोणीतरी मिठ्ठापल्लींच्या पाठीत खजोर खुपसून त्यांचा खून केला होता. (अरे एक सांगायचे राहिले, या कथेत खून झालेल्या वा आत्महत्या केलेल्या व्यक्ती नेहमीचे व्यवहार करीतच असतात. खून, आत्महत्या ही केवळ प्रतीके समजावीत ! ) तर मिठ्ठापल्ली सांगत आहेत––" रात्रीचा दोनचा सुमार होता. सर्वत्र शांतता होती. (आता रात्री दोनच्या सुमारास गडबड कुठे असणार ? ) रातकिडे गूं गूं करीत होते. मध्येच एखादे कुत्रे केकाटी. मध्येच एखादी रिक्षा धडधडत जाई. तर मध्येच एखादी मोटार सुळकन जाई. टकटक टकटक असा घड्याळाचा आवाज स्पष्टपणे ऐकू येत होता.–(हे सर्व वर्णन केवळ

वातावरणनिर्मिती 'साठी केलेले आहे. अशा तऱ्हेचे वर्णन जागोजागी आढळेल ! ) लढतीचे विचार माझे मन पोखरत असल्यामुळे मी प्रलंगावर तळमळत होतो. इतक्यात 'ठीश्यूं ठीश्यूं' असे पिस्तुलाचे बार ऐकू आले. मी ताडकन् उठलो. (खरे म्हणजे 'क्रींग–क्रींग, क्रींग–क्रींग' असा फोनचा आवाज येत होता. पण रहस्यकथा म्हटली म्हणज त्यात पिस्तुल ओघाने आलेच ! ) एक काळतोंड्या (म्हणजे टेलिफोन) मला बोलवत होता. मी त्याची गच्कन मानगूट धरल्यामुळे त्याचा आवाज बंद झाला. मग दबत्या आवाजात त्याने मला सांगितले "––इथे एक छोटासा पॉज आहे. कारण इतर सभासदांना उत्सुकतेने कान टवकारण्यासाठी इतका अवधी हवाच ! "तर त्याने मला सांगितले, 'लढतीच्या वेळी तुझ्या पाठीत खंजीर खुपसण्याचा कट शिजला आहे. तर तू 'क्ष' व्यक्तीकडे जा. (इथे लेखकाने कथेची रंगत वाढविण्यासाठी 'क्ष' व्यक्तीला' दि ग्रेट शत्रुघ्न सिन्हा.' असे नाव दिले आहे.) आणि त्या व्यक्तीचे पाय धर !' त्याप्रमाणे मी निघालो. (येथपासून पुढे लेखकाने 'वातावरणनिर्मिती 'साठी अनेक पाने खर्ची घातली आहेत. नायकाच्या सफाईदार हालचालींचे सुब्रक चित्रण केले आहे. म्हणजे सराईतपणे मोटार चालविणे, शत्रुघ्न सिन्हाच्या दारावर स्टायलीशपणे 'टक टक' करणे वगैरे. ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे.) मग शत्रुघ्नने डोळे चोळत चोळत दार उघडले. मी त्याच्या पायावर अक्षरश: लोळण घेतले व म्हणालो, 'मला अभय द्या !' (या ठिकाणी लेखकाने नारायणराव पेशव्यांच्या 'काका मला वाचवा' या उद्गारांचा पार्श्वभूमी म्हणून खुबीदारपणे उपयोग केला आहे.) तेव्हा शत्रुघ्न सिन्हाने हाताची घडी घालून आढ्याकडे नजर लावली व मला सांगितले, 'अभी वेळ टळून गयी है. मागे एकदा माझ्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांना धडा देण्यासाठी मी तुमचा बळी घेणार आहे. तेव्हा तुम्ही आता मरा !" ह्याच्यानंतर अश्रुपातामुळे मिठ्ठापल्लींना पुढचे भाषण करता आले नाही. नतर लेखकाने लढतीचे खुमासदार वर्णन करून खंजीर खुपसण्याचा रोमांचकारी क्षण अचूक टिपला आहे. इथे पहिले प्रकरण संपते. ◻

दुसऱ्या प्रकरणात इंडिकेट तालमीत उडालेल्या प्रचंड खळबळीचे वर्णन केले आहे. तालमीतील बाल पैलवानांनी तालमीपुढे धरलेले धरणे, काहींचे उपोषण, काही ज्येष्ठ पैलवानांना महापालिकेतील आखाड्यात जाण्यास बंदी, त्याहून ज्येष्ठ पैलवानांना मुंबईला कुस्ती खेळण्यास घातलेली बंदी. या सर्वांचे अप्रतीमपणे वर्णन केले आहे. या सर्वांचे मागणे 'शत्रुघ्न सिन्हा व त्यांच्या मदतनीस कोण ? हरामखोरांना कडक शिक्षा झाली पाहिजे !' असे होते. ◻

तिसऱ्या प्रकरणाचे नाव आहे 'बारा आत्महत्त्या', महापालिकेच्या आखाड्यात कुस्ती खेळायला जाणाऱ्या बारा पैलवानांनी हरामखोरांच्या निषेधार्थ आत्महत्त्या केल्या. लेखकाने शेवटी निष्कर्ष काढला की या आत्महत्त्या खरोखर झाल्याच

नाहीत. केवळ नाटक वठविले गेले. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, ‘ इंडिकेट तालमीतील एका खोलीत आत्महत्येची तयारी करण्यात आली, बारा गळफास तयार होते. हे बारा पैलवान बारा स्टुलांवर उभे राहिले व गळफासात त्यांनी मान अडकवली. आता फक्त खालचे स्टूल आपल्या पायांनी ढकलून देणेच बाकी होते. पण कुणालाच धैर्य झाले नाही. अखेर सहा जोडया ठरविण्यात येऊन दोघांनी एकमेकांचे स्टूल ढकलावे असे ठरले. तेव्हा ‘ तू आधी माझे स्टूल ढकल ’ असा गोड हट्ट प्रत्येकानेच सुरू केला. पण यातील गोम प्रत्येकाला वेळीच कळल्यामुळे हाही प्रयत्न फसला. नंतर प्रत्येकाने आपण आत्महत्या केलीच अशी मनाची समजूत घालून गळफासातून मान सोडवून घेतली. ’ पण या आत्महत्या प्रकरणाचा एक मात्र फायदा झाला. रेंगाळणाऱ्या कथेने एकदम गती घेतली. कारण चौथ्या प्रकरणाचे नावच आहे. ‘ खलनायकाचे आगमन ! ’

खलनायकाच्या उर्फ शत्रुघ्न सिन्हाच्या आगमनप्रसंगीचे वर्णन करताना लेखकाची प्रतिभा ठायीठायी ओसंडली आहे. उदाहरणार्थ– ‘ इंडिकेट तालीम. ’ संध्याकाळचा



सात-साडेसातचा सुमार. तालमीसमोरून वहाणाऱ्या नदीतील उथळ पाण्याचा फारच खळखळाट होत होता. सात वाजले असल्यामुळे सूर्याला मावळणे हे क्रमप्राप्त ठरले होते. त्यामुळे सर्वत्र अंधार पसरला होता. समोरच ओंकारेश्वरावर दोन-तीन चिता पेटलेल्या होत्या. अंधारामुळे चितांच्या ज्वाळा सर्पजिव्हेप्रमाणे वळवळत होत्या. एकूण वातावरण (रहस्यकथेला पोषक असे) भीतीप्रद होते.' यानंतर शत्रुघ्न सिन्हाच्या एंट्रीचे वर्णन केले आहे. पण स्थळाअभावी ते देत नाही. शत्रुघ्नने आल्या आल्या कांही मंडळींशी संभाषण सुरू केले. यात नेहमी तालमीत हजर असणारे काही क्रीडावार्ताहरही होते. शत्रुघ्नने त्यांना सांगितले, 'या खुनाबरोबरच पूर्वीच्या तीन खुनांचीही चौकशी झाली पाहिजे. इंडिकेट तालमीचे पैलवान संभाजीराव काकडे यांच्याबरोबरील लढतीत आमच्या रंगराव पाटलांच्या पाठीतही असाच खंजीर खुपसला होता. तसेच स्टँडिंग कमिटीच्या लढतीत बबनराव किराड व शिवरकर यांच्या मस्तकावरही प्रहार करण्यात आले होते. या सर्वांची चौकशी झालीच पाहिजे!' ही बातमी मग इंडिकेट तालमीचे वस्ताद व इंडिकेट पोलीस शाखेचे कमिशनर नामदेवराव रुकारी यांना समजली. आता शत्रुघ्नने खरे नाव जाहीर केले पाहिजे. नाहीतर सर्व लोढणे आपल्याच गळ्यात येईल, या भीतीने त्यांनी आय. जी. पी. मोहन धारियांना दिल्लीला फोन लावला व नाव जाहीर करण्याची परवानगी मागितली. मग रात्री दहा-साडेदहाच्या सुमारास (सर्व वेळा कशा रहस्यकथेला सुसंगत आहेत!) त्यांनी जाहीर केले, 'दि ग्रेट शत्रुघ्न सिन्हा म्हणजे भाऊसाहेब शिरोळे! त्यांनीच आमच्या पैलवानाच्या पाठीत खंजीर खुपसला!' झाले. मग सर्वजण भाऊसाहेबांकडे गेले. भाऊसाहेबांनी एक मोठे निवेदन केले. 'ही सर्व त्या विनोद खन्नाच्या गँगची लाईनबाजी आहे. (विनोद खन्ना = शिवाजीराव ढेरे.) त्यांनी पद्धतशीर कट केला व फोनवरून मिठ्ठापल्लींना माझ्याकडे पाठविले. त्यामुळे सर्वांची समजूत व्हावी, की या सर्वांच्या मुळाशी मीच आहे. मिठ्ठापल्ली माझ्याकडे आले तेव्हा मी त्यांना सर्व समजावून सांगितले. 'हे लोक तुझा बळी घेणार आहेत' असे सांगितले. पण मिठ्ठापल्लींना मराठी भाषा नीट समजत नाही. त्यांना वाटले, मीच त्यांचा बळी घेणार. शेवटी मी त्यांना म्हटले, 'बरं आहे, आता मरा!' मी 'मरा' असे म्हटले कारण मिठ्ठापल्लींचे नाव आहे म. रा. मिठ्ठापल्ली. त्यातील आद्याक्षरे घेऊन मी त्यांना 'मरा' असे म्हटले. पण त्यांना मराठी भाषाच नीट येत नाही. अर्थात त्यामुळे माझा फायदाच झाला. मला निवेदन करायला मिळाले!' (दरम्यान इंडिकेट तालमीतर्फे 'मराठी भाषा : उगम, विकास; काही शोध, बरेचसे बोध' या विषयाचे अभ्यासवर्ग महाराष्ट्राचे वाल्मिकी (की कालीदास!) ग. दि. माडगूळकर व प्राचार्य मंगुडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले असून प्रवेशासाठी भावी लढतीतील पैलवानांची गर्दी उसळली आहे!) भाऊसाहेबांनी आय. जी. पी. धारियासाहेबां-

वरही 'ऑपरेशन बावडा' प्रकरणी काही गंभीर आरोप केले. तसेच प्रतिस्पर्धी पैलवान निळूभाऊंनी इंडिकेटच्या काही पैलवानांची वर्षाच्या खुराकाची सोय केल्यामुळेच त्यांनी ही हरामखोरी केली असाही एक आरोप केला.

पुढील काही प्रकरणात 'मुंबईचा सह्याद्री बंगला', 'तपासाची सूत्रे स्पेशल आय. जी. पी. नाशिकराव तिरपुड्यांकडे सुपूर्द', 'नाशिकरावांना घेराओ' वगैरेचा ऊहापोह केला आहे. पुढच्या 'तो फोन कुणी केला ?' या प्रकरणात तो फोन बबनराव परदेशींनी केल्याचे जाहीर केले. बबनरावांच्या तोंडी 'भाई (भाऊ) हो तो ऐसा' या चित्रपटाची स्टोरी कोंबण्यात आली असून शेवटी 'मानवाचे परिवर्तन (हुश्श !) होऊ शकते हे मला माहिती असल्यामुळेच एक चान्स म्हणून मी मिठ्ठापल्लींना भाऊसाहेबांकडे पाठविले' असे प्रतिपादले आहे. इतके सर्व वाचल्यानंतर वाचकांच्या मनात प्रश्न उद्‌भवतो 'खरा खुनी कोण ?'

'खरा खुनी कोण ?' हेच पुढील प्रकरणाचे नाव. पण आमची दारुण निराशा झाली. शीर्षकाखाली काही मजकूरच नाही. सर्व पानेच कोरी. शेवटी एका पानावर 'समाप्त' अशी अक्षरे असून त्याच्यावर एक परिच्छेद आहे. 'चार खुनांबद्दल चार आरोपींना घेऊन हवालदार वधखुर्चीकडे जात आहेत. सर्व तपास करणारा इन्स्पेक्टर त्या दृश्याकडे कृतार्थ नजरेने पाहत आहे. घाम पुसण्यासाठी तो खिशातून रुमाल काढू लागतो. पण खिशात रुमालच नसतो. एवढ्यात एक देखणी इन्स्पेक्टरीण तिथे येते. 'टेक इट फ्रॉम मी' असे म्हणून ती त्याचाच रुमाल स्वतःच्या पर्समधून काढते. त्याने घाम पुसल्यावर त्याच्या छातीवर डोके टेकून त्याच्या मिठीत विसावते. त्यांचे मधुर मीलन होते. वगैरे वगैरे.'

वा ! काय शेवट आहे, मान लिया ! आम्हांला आधी वाटले, हा लेखक नवोदित असावा, पण या रंगतदार शेवटावरून हा लेखक कसलेला आहे याबद्दल आमची बालंबाल खात्री झाली. हे शेवटचे लफडे बहुधा त्याला कोऱ्या पानात घुसडावयाचे असेल.

असो ! या लेखकाने ही कादंबरी परत एकदा लिहून प्रसिद्ध करावी. वाचकांच्या पुस्तकावर (की लेखकावर ?) उड्या पडतील हे सांगायला ज्योतिष्याची गरज नाही !!

□ □ □

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## ढाक्का डायरी थेके...

बांगला देशाचे पंतप्रधान शेख मुजिबुर रहमान हे आठवड्यातून दोन दिवस – मंगळवारी व शुक्रवारी – सामान्य जनतेचे प्रश्न व तक्रारी समजावून घेण्याच्या उद्देशाने त्यांना गणभवनमध्ये भेटत असतात. त्यामुळे ह्या दोन दिवशी गणभवन-मध्ये सामान्य जनतेची अलोट गर्दी होत असते. ह्यांत रिक्षावाले, पानबिडीवाले, मजूर व ग्रामीण लोक इ. सर्वांचा समावेश असतो. आपल्या आवडत्या वंगबंधूशी शेजारी बसून चर्चा करण्याची संधी त्यांना मिळते. त्यानिमित्ताने हे लोक येताना फुलं, फळं, काई मासे (शेखचे अत्यंत आवडते) इ. वस्तू बरोबर आणतात व भेटी-दाखल शेखसाहेबांना देत असतात.

शेखसाहेब ठीक पाच वाजता आपली अन्य कामे आटोपून गणभवनात प्रवेश करतात. एकदा असेच ते सर्व लोकांशी व्यक्तिगत चर्चा करीत असताना अगदी घरगुती प्रश्न देखील विचारताना आढळले. एका दाढीवाल्या ग्रामीण माणसाला त्यांनी म्हटले –

'काहो मियाँ, तोमार शमश्शा की ? (तुमची समस्या काय आहे सांगा)... तुमच्याजवळ किती जमीन आहे ?... तुमच्या शेतात तांदूळ जास्त होतो की ज्यूट ?... तुम्हांला मुलंबाळं किती ?...'

शेवटच्या प्रश्नाला त्याने उत्तर दिले – 'अल्लाच्या कृपेने नऊ मुले आहेत.' शेखसाहेबांना हे एकून आश्चर्य वाटले. तावडतोब ते म्हणाले – 'मियाँ, यापुढे मात्र होऊ देऊ नका. जरी मलाही सहा मुले आहेत तरीदेखील तुम्हाला मी हे सांगू इच्छितो !'

एके दिवशी एक ६० वर्षे वयाचे मौलाना गणभवनमध्ये येऊन उपस्थित झाले. त्यांची पाळी आली तेव्हा शेखसाहेबांना अभिवादन करून ते म्हणाले –

'जीवनभर मी खूप कष्ट सहन केले – केवळ अवामी लीग पक्षासाठी. पक्षाचे खूप कामही मी केले आहे. पण आता मी थकलो आहे. सुदैवाने देशही स्वतंत्र

झाला आहे. तेव्हा आपण कृपया माझ्यासाठी काहीतरी करावे.'

शेखसाहेबांची प्रतिक्रिया ताबडतोब साकार झाली. आपल्या सेक्रेटरीला त्यांनी 'ती' वस्तू आण म्हणून सांगितले. त्याने आणताच शेखसाहेबांनी ते पॅकेट उघडून स्वतःचे 'फुल साईझ' चित्र मौलानांना अर्पण करून म्हटले – तुम्हांला देण्यासाठी माझ्याजवळ फक्त हेच शिल्लक आहे. स्वीकार करावा.' मौलाना आश्चर्यचकित झालेच. तरीपण त्यांनी भेटीचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार केला व तावडतोब तेथून निघून गेले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही दिवसांनी मौलाना भाषाणी यांनी टांगाईल येथे एक खूप मोठी सार्वजनिक सभा घेतली. टांगाईलमधूनच निवडून आलेले सध्याचे गृहमंत्री श्री. अब्दुल मन्नान हे त्या सभेला हजर होते.

भाषण करतेवेळी मौलाना म्हणाले – "आमची अवामी लीग सरकारला दोन वर्षे संपूर्णतया सहयोग देईल आणि सरकारला सर्व प्रकारे लोकहिताची कामे करण्यास आम्ही संधी देऊ." त्यांनी पुढे असेही म्हटले, की ह्या काळात आम्ही कार्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करणार नाही; किंवा त्यावर टीकाही करणार नाही. या सभेला आलेल्या लोकांना त्यांनी यावर मत विचारताच सर्वांनी एका आवाजात 'हो' म्हणून उत्तर दिले.

आतापर्यंत शांतपणे ऐकत असलेले श्री. मन्नान पटकन म्हणाले – 'मौलाना-साहेब, दोन वर्षांची सवलत तुम्ही शेखसाहेबांना देत आहात खरे पण तो काळ अगदीच अपुरा आहे. थोडा अधिक वेळ दिलात तर बरे होईल.'

मौलाना म्हणाले, 'तुम्हाला जास्त वेळ हवा आहे? ठीक आहे आणखी किती वर्षे हवीत बोला.'

श्री. मन्नान म्हणाले – 'कमीत कमी दोन वर्षे तरी आणखी हवीतच.'

मौलाना उत्तरले – 'ठीक आहे. मुजिबला मी आणखी दोन वर्षांची सवलत देतो. म्हणजे एकूण चार वर्षे. मग तर झालं!'

दुसऱ्या दिवशी सकाळीच श्री. मन्नान ढाक्क्याला आले आणि घाईघाईने शेख मुजिबची भेट घेऊन म्हणाले –

'शेखसाहेब, टांगाईलच्या सभेत मौलानांना व्यक्तिशः विनंती करून मी तुमचं 'लाइफ' दोन वर्षांनी वाढवून घेतलं आहे.' ◻

## टेलिव्हिजनच्या निमित्ताने

मुंबईला म्हणे लवकरच टेलिव्हिजन येणार आहे. जरा उशीरा का होईना, कलकत्त्यालाही तो एक दिवस येऊन धडकेलच. मग तुम्हाला काय, आम्हाला काय, एक नवा विषय...नवे कुतुहल...नवे कार्यक्रम, नवा आनंद! सारं काही नवंच.

कितीतरी फायदा होणार टेलिव्हिजनमुळे. परवा कुणाचा तरी लेखही होता वर्तमानपत्रात, ' शिक्षण क्षेत्रात टेलिव्हिजन ' ह्या शीर्षकाखाली. पुढेमागे टेलिव्हिजनवरच विद्यार्थीही अभ्यासाचे धडे घेणार असतील बहुतेक. कोणजाणे, पण आजतरी आपल्या डोळ्यासमोर टेलिव्हिजनची एकच चकचकीत बाजू आहे. मात्र आज ना उद्या हे टेलिव्हिजनचं नाणं उलटवून पाहिलं म्हणजेच दुसरीही बाजू स्पष्ट होईल.

ज्यांनी टेलिव्हिजनचा खूपखूप अनुभव घेतला आहे आणि आजही घेत आहेत अशा पाश्चात्य लोकांनी त्याबाबतीत आपले अनुभवाचे बोल शब्दबद्ध करून ठेवलेले नुकतेच वाचण्यात आले तेव्हा आश्चर्य वाटले. त्या शब्दात तथ्यांश नक्कीच आहे कारण ते स्वानुभवानंतरच रेखांकित झालेले आहेत. उदा. १९७० साली प्रसिद्ध झालेल्या The Ulysses Factor ह्या पुस्तकात लेखक J. R. L. Anderson म्हणतात–

' सिनेमा आणि टेलिव्हिजन ह्या गोष्टी माणसाच्या दूरदृष्टिला धारदार बनविण्याऐवजी बोथट करून टाकतात. माणसातील कल्पनाशक्तीच्या भरारीची जागा ह्या हीन दर्जाच्या वस्तूनी घेतली आहे; त्यामुळे पुस्तके किंवा जिवंत भ्रमण गाथांचे महत्त्व कमी कमी होत आहे. मध्ययुगीन काळात कुतुहलाच्या जाणिवेने माणसाच्या मनासाठी सुंदर गालिचे विणून काढले पण याउलट टेलिव्हिजनेने मात्र ओबड धोबड आणि दिखाऊ अशा कमी प्रतीच्या निर्मितीने माणसाचे मन जिंकण्याचा प्रयत्न केला आहे. टेलिव्हिजनमुळे माणूस फक्त नेत्रसुखाचाच आस्वाद घेऊ शकतो परंतु एखाद्या विशिष्ट प्रसंगात भाग घेण्याचा आनंद तो लुटू शकत नाही. त्यामुळे एखादा रोमांच उभे करणारा प्रसंग पाहून झाल्यावरही ' तो इतका काही रोमांचकारी नव्हताच ' अशी एक भावना माणसाच्या मनात रेंगाळत राहते. टेलिव्हिजनचे कार्यक्रम ज्या रीतीने सादर करण्यात येतात त्यावरून वाटते की ही भिंतीमधील केवळ एक खिडकी नसून संपूर्ण भिंतच असावी !"

टेलिव्हिजनच्या बाबतीत आपल्यापेक्षा चार पावसाळे जास्त पाहिले आहेत अशांचे बोल खरे ठरणार असतील तर चांगल्याबरोबर वाईटही तितक्याच वेगाने धाव घेईल. नाहीतरी पाश्चात्य वारे वेगाने आपल्याकडे वाहात येत असल्याचे आपण बघतोच आहोत. टेलिव्हिजनमुळे आपल्याकडील माणूस निष्क्रिय तर बनणार नाही ना ?

□ □ □

# पुस्तकांची पेठ

रवींद्र पिंगे

तीस पावसाळे आले–गेले. दरम्यानच्या काळात भरपूर पाऊसपाणी वाहून गेले. वाहात्या पाण्याबरोबर अनेक नवी-जुनी ताठ झाडं अलगद वाहून गेली. त्यांची अवतार समाप्ती कळली, पण जाणवली नाही. कालप्रवाहात खूप गोष्टी तग धरून होत्या. सगळाच काही प्रलय झाला नाही. समाजजीवनात तसा तो कधी होतही नाही. लव्हाळी वाचली. थोडं गवतही माजलं. अंकूर फुटले. पालवी फुटली. पुन्हा एकदा धरित्री हिरवीगार दिसू लागली. काही ढोपराएवढी रोपटी ऊन-पाऊस खाऊन बघता बघता फळाफुलांनी डंवरून आली. पुस्तकांची बाजारपेठ घवघवीत दिसू लागली. नवं पीक आलं. ते रसरशीत मळे पाहून आम्हाला संतोष झाला. पुस्तकांच्या धंद्यात काही वाढीला लागलेलं दिसलं, की आम्हाला स्वत:चाच जय झाल्यासारखं वाटतं. तशात, प्रकाशक कोठावळे हे आमच्याच पंगतीतले. म्हणजे नुसते बैठकीतले नव्हेत. चक्क मांडी ठोकून मजकूर लिहिणारे. त्यांच्या खात्यावर त्यांनीच लिहिलेली चार बुकं आहेत. प्रकाशक हा त्यांचा नंतरचा संपुष्ठावतार आहे. पण लेखक म्हणून ज्याचा एकवार अवतार झाला, तो पुढल्या अवतारांच्या बोजड मुंडावळ्या आज ना उद्या उतरवून ठेवतोच ! कारण लेखकाच्या जिण्यालाही काही और लज्जत आहे. कोठावळ्यांना ती चव ठीक माहीत आहे. लेखक म्हणून कोणे एके काळी त्यांनीही कुंकू लावलेलं आहे. वाटल्यास अबीर लावला आहे म्हणा. आज त्यांनी खांदेपालट केलेला आहे. ज्या अक्षरांच्या बाजारहाटात आम्हा लेखकमंडळींची पैरवी असते, त्याच बाजारातला एक ऐसपैस गाळा अडविणारे हिशोबनिष्ठ दुकानदार हीच काय ती त्यांची एकमेव यत्ता नव्हे. तीस वर्षांची वर्धमान रियासत, चारशे मराठी ग्रंथ प्रकाशात आणण्याचं अमोघ कर्तृत्व आणि 'ललित' मासिकाच्या रूपाने प्रकट होणारं डोळस साहित्यप्रेम ह्यांचा



तीस वर्षांची वर्धमान रियासत
आणि चारशे ग्रंथांचे प्रकाशन
हे केशवरावांचं कर्तृत्व

नकाशा त्यांच्यामागे भिंतीला टांगलेला आहे. म्हणून लेखकांची आणि त्यांची अंगत-पंगत होते. लेखक त्यांना out-sider समजत नाहीत.

ओळीनं तीस वर्षं मी ह्या माणसाला गिरगावच्या नाक्यावर पाहिलेला आहे. मॅजेस्टिक चित्रपटाच्या शेजारी औदुंबराच्या छायेत त्यांचं पुस्तकविक्रीचं दुकान आहे. पूर्वीही ते तिथेच होतं. त्याच्या अगोदर ते फूटपाथवर जुनी पुस्तकं विकत उभे राहिलेले असत. शाळा सुटल्यानंतर भटकताना तिथे रेंगाळणं हा आमचा रोजचाच विरंगुळा होता. त्याच्याही पूर्वी ते काळाबाजारवाल्यांना लायनी पकडून सिनेमाची तिकीटं काढून देणं, पेपर विकणं, शिकवण्या करणं, वगैरे फालतू उद्योग करीत होते म्हणतात. पण त्या काळात पोटापाण्यासाठी असले किरकोळ धंदे सगळेच कोकण्ये मुंबईत करीत असत. सुदैव इतकंच की, साहेबाच्या रामराज्यात ते रेशनिंगमध्ये चिकटले नाहीत. कदाचित त्यांचं निव्वळ 'व्ह. फा.' आडवं आलं असेल. काही का असेना, ते पुस्तकांच्या धंद्याला लाभले हे बरं झालं. एकदा लाभल्यानंतर तीस वर्षं झेंडे रोवून टिकले हे त्याहीपेक्षा बरं झालं. त्यांनी सणसणीत धनसंचय केला. ह्या धनदौलतीबद्दल आम्ही त्यांचा हेवा, मत्सर वगैरे करून दांड्याच्या तरीवर त्यांच्याकडून टिफीन उकळायची तेव्हा उकळू. प्रश्न तो नाही. सवाल आहे तो ग्रंथविक्री आणि ग्रंथप्रसिद्धी ह्या क्षेत्रातील त्यांच्या डोळस अनुभवाचा. तो अनुभव चांचपावा म्हणून मी त्यांना विचारलं,

'मराठीमधली प्रकाशन व्यवसायाची पंचवीस तीस वर्षांपूर्वी काय परिस्थिती होती?'

'मी त्यावेळी ह्या धंद्यात इतका छोटा माणूस होतो, की त्या वेळच्या धंद्याशी

असा माझा फारसा संबंध आलाच नाही. अगदी सुरुवातीपासून जुनी पुस्तकं विकणं हाच माझा व्यवसाय होता. सेकंड हॅंड पुस्तकं नव्हेत. जुनी पुस्तकं. म्हणजे समजा, की जुन्या काळात काही पुस्तकं प्रकाशित झाली असतील, तर त्यांच्या विकल्या न गेलेल्या प्रतींचे गठ्ठे मिळवायचे नि त्या सुटचा गिऱ्हाइकं शोधून खपवायच्या.'

'उदाहरण म्हणून अशा एखाद्या जुन्या प्रकाशकाचं सांगाल ?'

'सांगतो. पन्नास वर्षांपूर्वी मराठी वाङ्मयात सावळाराम दामोदर यंदे ह्या मान्यवर प्रकाशकाचा फार मोठा दबदबा होता. ठाकुरद्वारात त्यांचं गुदाम होतं. त्यांची कीर्ती मोठी असली तरी धंद्यात त्यांना अपयश आलं. त्यांचं दिवाळं निघालं. तेव्हा त्यांच्या प्रकाशनाचे लॉट कमी किमतीत कोर्ट रिसिव्हरच्या मार्फत विक्रीला निघाले. त्यातली काही पुस्तकं मी दहा रुपयांना विकत घेतली नि माझ्या धंद्याला सुरुवात केली. पुढे नंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'माझी जन्मठेप' ह्या ग्रंथोत्तमाच्या हजारो प्रती एक रुपयाला एक ह्या ठोक भावाने मी लॉटमध्ये विकत घेतल्या. कारण त्याचा मूळ प्रकाशकही धंदा आवरून बसला होता. त्या सगळ्या लॉटची मी नव्याने मोठी ठळक जाहीरात करून पाच रुपयाला एक ह्या भावाने विक्री केली. त्या सगळ्या प्रती संपल्या नि माझ्या हातात चळचळीत रक्कम आली.'

'कुठल्या स्वरूपाच्या पुस्तकांना गिऱ्हाईक उत्तम लाभतं ?'

'उपयुक्त पुस्तकांचा खप फार होतो. मी सामान्य माणसाला इंग्रजी शिकायला उपयोगी होतील अशी पुस्तकं काढली. उदा. 'मॅजेस्टिक इंग्लिश' वगैरे. त्यांचा खप उत्तम झाला नि अजूनही होत आहे. उपयुक्त धार्मिक पुस्तकंही फार खपतात. ललित वाङ्मयाच्या खपाबाबत बोलायचं तर जुन्या दर्जेदार लेखकांना अजूनही उत्तम गिऱ्हाईक आहे. उदा. नाथमाधव. त्यांना उदंड खप आहे. ग्रंथालये ती विकत तर घेतातच पण वाचकही नाथमाधवांची पुस्तकं अजूनही मोठ्या चवीने वाचतो. नाथमाधवांची लोकप्रियता संशयातीत आहे.'

'सध्या कुठला मराठी लेखक खपाच्या दृष्टीने लोकप्रिय आहे ?'

'गो. नी. दांडेकरांच्या पुस्तकांना चांगली मागणी आहे. त्यात चढ आहे. उतार नाही. पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, रणजीत देसाई, बाबासाहेब पुरंदरे, श्री. ना. पेंडसे, ह्यांची पुस्तकं सतत खपत असतात. त्यांच्या नावाला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. म्हणून पेंडशांची कादंबरी लोक विकत घेणारच. बाळ कोल्हटकर, चंद्रकांत काकोडकर, नारायण धारप, बाबा कदम, चंद्रप्रभा जोगळेकर, वगैरेंची पुस्तकंही त्या मानाने चांगली खपतात. त्यांचा म्हणून काही वेगळ्या स्तरावरला वाचक आहेच.'

'पुस्तकाच्या किंमती कमी केल्या तर विक्री वाढेल ?'

'सध्या कागद, छपाई वगैरेंचे दर इतके अव्वाच्या सव्वा भडकलेले आहेत की इच्छा असूनही कमी किंमतीत पुस्तक काढणं प्रकाशकाला धंद्याच्या दृष्टीने शक्य होणार नाही. बरं, इतकंही करून पुस्तक स्वस्त ठेवलं म्हणून ते खपेल असंही नाही. स्वस्त पुस्तक म्हणजे भरपूर गिऱ्हाईक. असं समीकरण होऊ शकत नाही. प्रकाशकाने आपण एरव्ही महाग पडणारे पुस्तक खरोखरीच स्वस्त किंमतीला देत आहोत ह्या बद्दल जाहीरात करून वाचकांची खात्री करून दिली पाहिजे. भरपूर जाहीरात करून वाचकांची स्वस्ताईबद्दल खात्री पटली तरच त्या पुस्तकाचा खप होईल. 'स्वस्त पुस्तक योजने'ची पूर्वी लाट आली होती. 'स्वामी' वगैरे कादबऱ्या स्वस्त योजनेत उत्तम खपल्या. पण नंतर प्रकाशकांनी पुस्तकं वेळेवर प्रकाशित न करणं, प्रकाशनांचा दर्जा न संभाळणं, वगैरे धरसोडीच्या गोष्टी केल्या. त्यामुळे गिऱ्हाईक कंटाळलं. आता ती स्वस्त पुस्तक योजनेची लाट मागे गेली आहे. ह्याशिवाय पुस्तकांचं म्हणून काही भाग्य असतं. काणेकरांची काही पुस्तकं अशी भाग्यवान आहेत. ती छान खपतात. काही काही पुस्तकं गुणमंडीत असूनही उण्या दैवाची असतात. त्यांच्या दहा प्रती खपणं मुष्कील होतं. बाजारात अशाच दैवहीन पुस्तकांची गर्दी असते, हे खरं मरण आहे. म्हणून नव्या आणि होतकरू प्रकाशकांना माझा अनुभवसिद्ध सल्ला आहे की बाबा, कमी पुस्तकं प्रकाशित कर. दहा प्रकाशित करणार असशील तर सहा कर. सात कर. पण पुढे पस्तावायचं नसेल तर आत्ता मोह आवर!'

'गुणांनी उत्तम पण व्यवहारात रखडलं, अशा ललित पुस्तकाचं एखादं उदाहरण सांगा.'

'माधव मनोहरांची 'एक आणि दोन' ही रम्य कादंबरी. किती उत्तम दर्जाचे गूण आहेत तिच्यात! खरं तर 'गारंबीचा बापू' सारख्याच तिच्या आवृत्या निघायला हरकत नव्हत्या. पण लेखनगूण असूनही कुठे तरी काही तरी कमी पडलं नि तिच्या शेवटच्या प्रती खपवताना फारच प्रयास पडले. मीच त्या शेवटच्या प्रती मोठ्या शिकस्तीने पण प्रेमाने खपवल्या.'

'नवीन पिढीत खपाऊ लेखक आहेत ?'

'नारायण धारप वगैरे मंडळी नवीनच की. जयवंत दळवींची पुस्तकं छान जातात. कर्णिक, मंत्री वगैरेंच्या पुस्तकांनाही बरी मागणी आहे.'

'नव्या पिढीतल्या लेखकांची पुस्तकं काढताना तुम्हाला विशेष उमेद वाटते ?'

'नवं पुस्तक काढताना संमिश्र भावना असते. सुदैवाने माझे सगळेच लेखक माझे मित्र आहेत. अगदी गो. नी. दांडेकरांपासून दळवी-कर्णिकांपर्यंत. तेव्हा पुस्तक

प्रकाशन हा आनंदाचाच भाग असतो. परंतु मराठीतल्या काही प्रकाशकांना मात्र नवे लेखक ओरबाडण्याचा प्रयत्न करतात असं कानावर येतं. ह्याबाबतीत मला असं म्हणायचं आहे की लेखकांनी प्रकाशकांच्या अडचणी स्नेहभावनेने लक्षात घेतल्या पाहिजेत. पूर्वीच्या पिढीतले कै. चिं. वि. जोशी प्रकाशकांना फार जिव्हाळ्याने सांभाळून घेत. आजचे माझे लेखक मला खरोखरच सांभाळून घेतात. खेळीमेळीने वागतात. ते माझे हितचिंतकही आहेत. त्यामुळे पुस्तक काढणं हे व्यक्तिशः मला तापदायक वाटत नाही.'

'जुन्यांपैकी सर्वच लेखक अजूनही खूपच खपतात काय?'

'जुन्या पिढीतले गाजलेले लेखक म्हणजे अत्रे, खांडेकर, फडके, माडखोलकर, काणेकर. ह्या सर्वांना चांगली मागणी आहे. अत्र्यांची नाटकं उत्तम गेली. शाळा कॉलेजांना लागलेले निबंध संग्रहही उत्तम खपले. इतर संकीर्ण पुस्तकं मात्र तेवढी तेजीत गेली नाहीत. फडके-खांडेकर आजही आघाडीवर आहेत. माडखोलकरांच्या ललित पुस्तकांची विक्रीही त्यांच्या गतीने होतच आहे. मात्र एके काळी ज्यांचा फार उदो उदो होता असे लेखक म्हणजे ना. म. जोशी, माटे मास्तर, साने गुरुजी य. गो. जोशी, मो. ग. रांगणेकर ह्यांच्या पुस्तकांचा खप फारच मंदावला आहे. हे जसं लेखकांचं झालं तसं काही पुस्तकांचंही असतं. काही काही लेखकांचं एकच पुस्तक छान खपतं. उदा. श्री. ज. जोशींचं 'आनंदी गोपाळ'. त्यांनी त्याच ताकदीचं दुसरं पुस्तक लिहीलं असतं तर त्याचा फायदा दोन्ही पुस्तकांच्या खपाकडे झाला असता. 'युद्धनेतृत्व' छान खपलं. 'मृत्युंजय' उत्तम खपलं. पण ह्या लेखकांनी फक्त एकेक षटकार मारला. त्यांची दुसरी पुस्तकं कुठे आहेत? शिवाय प्रत्येक लेखकाचा म्हणून काही एक कालखंड असतो. उदा. ग. ल. ठोकळ यांच्या त्या काळात त्यांची पुस्तकं छान खपली. पारितोषिक मिळालेली पुस्तकंही चांगली खपतात.'

'ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद ह्या पुस्तक प्रकाशनाच्या धंद्यात शिरला आहे काय?'

'अजिबात नाही. पुस्तक विक्रेते आणि ग्राहक ह्यांच्यामध्ये हा वाद धुडगूस घालीत नाही. ग्राहक हा लेखक कुठल्या जातीचा आहे ह्याचा खरेदीच्या वेळी विचार करीत नाही.'

'वर्तमानपत्रातल्या पुस्तक परिक्षणांचा परिणाम ग्रंथांच्या खपावर होतो?'

'फारसा होत नाही. मात्र ठळक वर्तमानपत्रातून ठळकपणे परिक्षण छापून आलं तर लेखकाच्या नावाचा थोडासा बोलबाला होतो. मात्र त्याचा ग्रंथ विक्रीवर परिणाम होईलच असं नाही. लेखकाला मात्र व्याख्यानाची बोलावणी वगैरे येऊ शकतील. माझा एक अनुभव सांगतो. जयवंत दळवींच्या एका पुस्तकावर 'महाराष्ट्र

टाईम्स' मध्ये अर्धा पान सचित्र परिक्षण आलं होतं. त्याच परिक्षणाच्या खाली टोकाला मीच प्रसिद्ध केलेल्या द. शं. केळकर ह्यांच्या ज्योतिषविषयक पुस्तकावर चार पाच ओळींचा माहितीवजा मजकूर छापलेला होता. विक्रीच्या दृष्टीने अनुभव असा आला की केळकरांच्या ज्योतिषविषयक पुस्तकांना ग्राहकांच्या मागण्या आल्या, पण दुसऱ्या पुस्तकाचा उठाव लक्षात येण्याइतका नव्हता. म्हणजे पुन्हा, उपयुक्त पुस्तक खपलं आणि ललित ग्रंथ रेंगाळला. हो, सांगायचं राहून गेलं, केळकरांची ज्योतिषविषयक पुस्तकं त्यांचा काळ होता तेव्हा छान खपली. आता त्यांची विक्री मंदावली आहे. तरीसुद्धा वर्तमानपत्रांत परिक्षणं झळकलीच पाहिजेत.. त्यामुळे वातावरण जरा चेतवलं जातं.'


'नाटकाची पुस्तकं किती खपतात ?'

'नाटक चालू असतं तेव्हा नाटकांची पुस्तकं फारच चांगली खपतात. वसंत कानेटकरांची पुस्तकं उत्तम खपतात. हौशी नाटकवाल्यांना सोईस्कर नाटकं लिहिली तर तीही खपतात. कै. गोपाळकृष्ण भोबेंचे 'धन्य ते गायनी कळा' चांगलं खपलं, कारण ते नाटक व्यवस्थित चालू होत. आता ते नाटक बंद आहे. आता त्या पुस्तकाची विक्री होणार नाही. 'खडाष्टक'चे प्रयोग सध्या मंदावले आहेत. साहजिकच त्या पुस्तकाची विक्री मंदावली आहे. बाळ कोल्हटकरांची नाटकं छान चालतात नि त्यांच्या मागोमाग नाटकाची पुस्तकंही चांगली खपतात.'

'मराठी प्रकाशन व्यवसायात लक्षणीय आणि आपल्या वेगळेपणाने उमटून दिसणारे प्रकाशक कोण आहेत ?'

'वा. वि. भट आणि हरिभाऊ मोटे. ह्या दोघांनी निव्वळ बाजारीपणा कधीही केला नाही. त्यांना वाङ्मयाची एक जाण आहे. वाङ्मयीन गुणांकडे पाहण्याची त्यांची स्वतःची अशी नजर आहे. ह्या दोघांनीही प्राथमिक धोका स्वीकारून नव्या लेखकांची नवी गुणी पुस्तकं प्रकाशित केली. म्हणून ह्या दोघांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे.'

मराठी पुस्तक प्रकाशनाचं आजचं जग हे असं आहे. अशा ह्या धकाधकीच्या जगात केशवराव कोठावळे गेली तीस वर्षं पाणी कापीत आहेत. धंदा करणारे नि गबर होणारे खूप असतात. कोठावळ्यांचा गाळा पुस्तकांच्या पेठेत आहे म्हणून आम्हाला त्यांच्याविषयी ममत्व आणि हेच ह्या स्नेहगप्पांचं प्रयोजन.



५ ऑगस्ट १९७२

# गैरसमज दूर व्हायला हवेत !

# मनोविकारशास्त्र

डॉ. प्रकाश साठे

मनोविकारशास्त्र (Psychiatry) औषधशास्त्राची (Medicine) एक शाखा! तिला प्रगत देशात आज मानाचं स्थान आहे. अमेरिकेत तर असं म्हणतात, की वर्षातून एकदा दंतवैद्याला दाखवायचं तर मनोविकारचिकित्सकाला दोनदा! दुर्दैवानं आपल्या देशात मात्र या शास्त्राला तोंड लपवून वावरावं लागतं. एकदोन मासलेच सांगतो....

माझा एक मित्र. दिसायला देखणा. एकुलता एक मुलगा. घरची जबाबदारी काही नाही. लग्नाला उभा राहिला. डॉक्टर म्हणून खूप स्थळं यायला लागली. अक्षरश: रीघ लागली. पण तो मनोविकारचिकित्सक होतोय असं कळल्यावर ही मंडळी पळ काढू लागली. मनोविकारतज्ज्ञ होणं हे त्याचं disqualification ठरू लागलं. (नंतर लग्न होऊन तो आता एका मुलाचा बाप झाला आहे ही गोष्ट वेगळी.)

दुसरं उदाहरण माझंच देतो. मी प्रॅक्टिस सुरू केली तेव्हाची गोष्ट! माझे दोघं तिघं डॉक्टर मित्र म्हणाले आता तुला रस्त्यात ओळख दाखवायची चोरी, लोकांना आम्ही किंवा आमच्या आप्तांपैकी कुणी तुझे पेशंट असल्याचा संशय यायचा! यातला एक गंमतीचा भाग सोडून द्या. पण अशा प्रकारचा अनुभव नंतर आला. ऐन उमेदीतले दोन तीन तरुण मुलगे माझ्याकडे उपचारासाठी आले किंवा आणले गेले. मानसिक रोगाच्या अडचणीत असताना ते स्वत: त्यांचे नातेवाईक माझ्याशी अतिशय आपुलकीनं वागायचे. 'त्यांच्या लग्नाला' तुम्ही यायलाच पाहिजे. आमच्या घरी तुम्ही अवश्य येऊन जायला हवं' वगैरे म्हणायचे. पण पेशंट रोगमुक्त झाल्यावर हे चित्र बदललं. रस्त्याच्या एका बाजूनं मी जात

असलो तर ही मंडळी तो ओलांडून पलीकडच्या बाजूने जातात. हस्तिदंती करून ओळख दाखवणं दूरच राहिलं. मनोविकारचिकित्सकाची ही अवस्था, तर रोग्यांची समाजात काय परिस्थिती होत असेल त्याची कल्पना करा.

मनोविकारचिकित्सक म्हणजे वेड्यांचा डॉक्टर हे समीकरण लोकांच्या डोक्यात अगदी पक्कं बसलेलं असतं. त्याच्या कन्सल्टिंग रूमवर प्रत्येक रोगी हा कपड्यांची शुद्ध नसलेला, शिव्या देणारा, दगड मारणारा असणार याबद्दल त्यांना काहीच शंका नसते.

आपल्या देशात अज्ञान, अंधश्रद्धा, भोळसट समजुती या गोष्टींमुळे माणसाचं बदललेलं वागणं हे मेंदूच्या किंवा मानसिक रोगामुळे असेल हा विचार कुणाच्या मनाला शिवत देखील नाही. त्या माणसाचं विचित्र वागणं हे त्याला भूतपिशाच्चाची बाधा झाल्यामुळे असेल किंवा त्याच्यावर कुठल्या तरी देवदेवतांचा कोप झाल्या-मुळे असेल असंच त्याच्या आसपासच्या लोकांना वाटतं. मग उपासतापास सुरू होतात. कोंबडी किंवा बकरी बळी दिली जातात. या गोष्टींनी फरक पडला नाही म्हणजे मग कुठल्यातरी मांत्रिकाकडे नाहीतर भगताकडे त्याला नेतात. तिथे अंगारे उधळणे, वेळप्रसंगी गुरासारखे मारणे, डागणे इत्यादी सोपस्कार सुरू होतात. त्या 'देवानं' किंवा 'भुतानं' कशालाच दाद दिली नाही म्हणजे मग डॉक्टरची आठवण होते, तोपर्यंत रोगानं चांगलाच पाय रोवलेला असतो, तो जुना झालेला असतो. डॉक्टरी उपचारांना फारसं यश येत नाही आणि तो रोगी बिचारा वेड्याच्या इस्पितळातल्या जुनाट रोग्यांच्या वार्डात जाऊन पडतो.

आपल्याकडे एखादी वाईट गोष्ट (अपघात, मृत्यू, आजार) घडली की, ती कुणीतरी आपल्या वाईटावर असल्यामुळंच झाली असं मानलं जातं. मग कुणाची तरी दृष्ट लागली म्हणून दृष्ट काढली जाते. कुणीतरी करणी वा भानामती सारखी जादू केली असेल, मग त्याच्या बंदोबस्ताला सुरुवात होते.

एखाद्या वाईट, विचित्र किंवा लज्जास्पद गोष्टीचा दोष माणूस स्वत:कडे कधीच घेत नाही. इतर कुणाची तरी चूक झाली त्यामुळे असं झालं म्हणून दुसऱ्या-वर त्यांचं खापर फोडून तो मोकळा होतो. या परदूषणवृत्तीचं प्रमाण आपल्या संस्कृतीत फारच आहे. तुलसीरामायणातला एक प्रसंग पहा ! प्रभु रामचंद्र आणि सीता यांची उद्यानातली पहिली भेट. एकमेकांना पाहिल्यावर 'पाहिले तयाक्षणीच आपुले न राहिले' असं झालं. दोघंही वेळकाळाचं भान विसरून पहातच राहिले एकमेकांकडे. आता हा तारुण्याचा दोष म्हणावा की अनुरक्त झाल्यामुळे परस्परांना एकटक न्याहाळत राहिले म्हणावं. पण देव लोकांना असं कसं म्हणता येईल ? मग तुळशीदास म्हणतात, 'पापण्यांची उघडझाप करण्याचं काम ज्याच्यावर सोपवलं गेलं आहे, तो निमिष नावाचा राक्षस (त्याला डोळ्यांची उघडझाप करण्यासाठी लागणाऱ्या वेळेच्या निम्म्या भागाला निमिषार्ध असं म्हणतात)

आपलं काम करायला चुकला आणि म्हणून या दोघांना डोळ मिटता आले नाहीत. ते उघडेच राहिले. अशा तऱ्हेने त्यांच्या या एकमेकांकडे पहात रहाण्याच खापर बिचाऱ्या निमिषाच्या डोक्यावर फोडलं गेल. असो.

आपल्याकडचं आणखी एक वैशिष्टच म्हणजे भोंदूगिरी ! (Quackery) अंगारा, ताईत, गंडेदोरे, पाणी, निरनिराळी 'यंत्रे' वगैरे गोष्टी मंतरून देणारी महाराज, भगत, देवी आणि वैद्यराज मंडळी आपल्याकडे मुबलक आढळतात. शरीराच्या ज्या भागाला त्रास होत असेल त्या भागाला डाग देणारे काही वैद्य प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या उपचारामुळे जखमांचं सेप्टिक झालेलं आणि काहींना तर धनुर्वात झाल्याचं मी पाहिलं आहे. शहरातल्या (पुण्यासारख्यादेखील) किंवा शहराजवळच्या कुठल्याही दर्ग्यावर तुम्ही गेलात तर ससून हॉस्पिटलच्या ओपीडीत काय गर्दी असते अशी गर्दी तुम्हाला तिथे सकाळ-संध्याकाळ दिसेल. अशा या उपायांचा गुण Psychiatryत ज्यांना Hysterical disorders म्हणतात त्यांना निश्चित येतो (कदाचित काही केलं नाही तरी ते नाहीसे होण्याची शक्यता असते) या गोष्टीचा परिणाम मात्र ही अंधश्रद्धा वाढण्यात होतो हे निश्चित !

हे चित्र पाहिलं म्हणजे वाटतं आपल्या देशातली ही परिस्थिती केव्हा बदलणार आहे कुणास ठाऊक ? प्रगत देशांमध्ये आजच्या काळात या शास्त्राला मानाचं स्थान आहे. अमेरिका, कॅनडासारख्या देशांत मनोविकार चिकित्सकांना सर्वात जास्त पगार मिळतो आणि त्यांना मागणीही खूप आहे.

## विवंचनेचं शतक

सतरावं शतक प्रबोधनाचे (enlightenment) युग समजलं जातं, अठरावं बुद्धिवादाचे, (reasoning), एकोणिसावे प्रगतीचं, तर हे चालू शतक विवंचनेचं ! आजचं आधुनिक जीवन जसजसे वेगवान, धकाधकीचं, गुंतागुंतीचं होत चाललंय तसतशा दैनंदिन विवंचना वाढताहेत. अणुशास्त्राची प्रगती, यांत्रिक प्रगती, त्यातनं होणारे अपघात, लढायांची टांगती तलवार या गोष्टींमुळे वैयक्तिक जीवनच नाही-तर सामाजिक जीवनही विसकटलं जात आहे. जातिभेद, वर्णद्वेष या गोष्टींमुळे हेवेदावे वाढत चालले आहेत. कुटुंबपद्धती बदलत चालल्यामुळे निरनिराळ्या जबाब-दाऱ्या अंगावर पडताहेत. गृहिणीचं आयुष्य चूल व मूल इतकं मर्यादित राहिलेलं नाही. ती घरातनं बाहेर पडल्यामुळे तिच्या इतर कामात पुरुषाला हातभार लावावा लागतो. घरात मुलांकडे पहायला कुणी नसतं. शिवाय स्त्रीच्या बाहेर पडण्यामुळे निर्माण होणारे बाहेरचे प्रश्न वेगळेच ! आईवडिलांना लक्ष द्यायला फुरसत नसल्याने मुलं एकतर खुरटतात, कुढी बनतात, नाहीतर अवाजवी मोकळीक मिळाल्यामुळे वाहवत जातात. त्यांना सिनेमा, नाटकं आणि हलकी पुस्तकं मदत करतात. त्यातून समाजकंटक निर्माण होतात, जीवन असुरक्षित होऊं लागत आणि या सर्वांची परिणती मानसिक स्वास्थ्य नष्ट होण्यात होते. सुबत्ता येते पण स्वास्थ्य

नाहीसं होतं. मग माणूस या सर्वांपासून दूर जाण्यासाठी, रोजच्या विवंचना विसरण्यासाठी मद्यपानासारख्या व्यसनाच्या किंवा औषधांच्या आहारी जातो. अशा प्रकारे वाढती असुरक्षितता, भीती, दैनंदिन विवंचना या गोष्टीमुळे मानसिक रोगांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललं आहे.

मानसिक रोगांविषयी आणखी गैरसमज आहेत. मानसिक रोग म्हटला की तो आनुवंशिकच असतो हा एक मोठा गैरसमज आहे आणि दुसरा म्हणजे सेक्स ! प्रत्येक मानसिक रोगाचं मूळ लोक सेक्समध्ये शोधायचाचा प्रयत्न करतात. 'तिचं किंवा त्याचं लग्न करून टाका म्हणजे सगळं व्यवस्थित होईल' असा सल्ला देणारे डॉक्टरसुद्धा मी पाहिले आहेत.

कुटुंबात एखाद्याला टायफॉईड किंवा न्युमोनिया झाला तर लगेच डॉक्टरकडे जाऊन औषध आणलं जातं. रोग्याला भेटायला लोक येतात, तसं मानसिक आजारात होत नाही. एखाद्याला मानसिक त्रास सुरू झाला की सगळ्या कुटुंबांचं स्वास्थ्य नष्ट होतं. होणारा त्रास लपवून ठेवायचे प्रयत्न केले जातात. कुटुंबातली माणसं तोंड चुकवून वावरू लागतात. तो रोग 'अंगात' मुरू लागतो. मग परिस्थिती अगदीच हाताबाहेर गेल्यानंतर नाइलाजाने डॉक्टरकडे जातात. त्यानं पाठवलं तर मनोविकार चिकित्सकाकडे जावे लागतं तोपर्यंत हे काम अवघड झालेलं असतं. गुण येत नाही, आला तर चटकन् दिसत नाही. या शास्त्रावरचा (आधीच नसलेला) विश्वास उडू लागतो.

हे चित्र बदलायला हवं. मानसिक रोगाला सामाजिक मान्यता मिळायला हवी: रोग्यांना लवकरात लवकर उपचारांसाठी मनोविकार चिकित्सकाकडे आणले गेलं पाहिजे. सामाजिक आरोग्याचा फार मोठा भाग मानसिक स्वास्थ्यावर आहे याची जाणीव व्हावयाला हवी आणि हे होण्यासाठी या शास्त्रविषयींचे अज्ञान, गैरसमज आधी दूर व्हायला हवेत. म्हणजे मग प्रतिबंधक उपायांचा विचार करता येईल.


यौवनलतिके, तू किती सुंदर आहेस!
तारुण्यपीटिकांमुळे तुला कोणताही न्यूनगंड बाळगण्याचं कारण नाही.
पुटकुळ्यांवर योग्य उपचार
नितल
औषधियुक्त पिंपल क्रीम
पुटकुळ्यांवर गुणकारी, व्हिटॅमिन 'एफ' युक्त औषधी क्रीम. आल्हाददायी सुगंध, पुटकुळ्यावर संपूर्ण आणि त्वरित इलाज.
व्हिटॅमिन 'एफ' पुटकुळ्यांचे डाग नाहीसे करून त्वचा मुलायम आणि सतेज बनविते.
उत्पादक :
कोचीन पाम प्रायव्हेट लि.
मुंबई २१. कोचीन २.
वितरक :
युनि-डिस्ट्रिब्यूटर्स प्रायव्हेट लि.
मुंबई २१. कोचीन २.
सर्व प्रमुख औषध विक्रेत्याकडे मिळते.
3 BROTHERS/MAR

# कविता

## भासमय भासू नको . . .

(गझल)

विलय विश्वाचा घडो, त्यांची तमा मजला नको
नभनिळया नयनांसवे नभदूर तू राहू नको
घनकृष्ण कुंतल विखरुनी वाऱ्यावरी बेछूट दे
ताराफुलांचा शर्वरीला गंध तू चोरू नको
चांदण्याचा पदर हलके घेउनी खांद्यावरी
तू जवळ ये, येऊ नको; तू दूर जा, जाऊ नको
शायरीच्या तारकाला दे दिशा नेत्रातुनी
पापण्या मिचकावुनी तारे निळे विझवू नको
कंकणांच्या किणकिणी ऐकून वारा थांबला
रक्तात अग्नी पेटला, त्याला पुन्हा जाळू नको
मुडपुनी ओठी गुलाबी पाकळया हासू नको
अन् काढुनी उपनेत्र माझे भासमय भासू नको

—शिरीष चिंधडे

## कलंदर

मी मुक्त प्रवासी; मला न कसले बंध
बेबंद मी कैफी ! मी माझ्यातच धुंद
नच हृदयिचे कुणि, नसे कुणाचा स्नेह
नच प्रेय मला वा विश्रमण्याला गेह
निल अंबर बाहे क्षितिजाच्या हातांनी
गति वाचुन दुसरा अर्थ न काही जिवनी
मी उधळुन दिधले जीवन वाऱ्यावरती
रे वृथाच ! नाण्यावाचन लटकी प्रीती ! !

—उत्तम कांबळे

## मलमपट्ट्या खूप झाल्या . . .

शक्य होईल तेव्हा आम्हीही आमचे ताजमहाल उभे करू
पण त्यासाठी कुणापुढे रांगत जाणं मंजूर नाही
खुज्या दारातून शिरताना लाखदा टेंगळे आली तरी चालेल
पण अगतिकतेने आता माथा कुणासमोर नमणार नाही
जाणतो; दिवसेंदिवस जगणे कठिण होत चालले आहे
गर्भारबाईसारखेच अवघडल्या पायांनी चालायचे आहे !
फुटक्या कौलांसारखीच आहेत खिशालाही छिद्रे ठाऊक आहे
पण आता कोणत्याही दारात टाचा झिजविणे जमणार नाही
खूप पाहिले, साहिले, श्रमलो उदंड. मिळाले काहीच नाही
बंद, झिंदाबाद; निष्पन्न शून्य; मतपेटीच भोंगळ आहे ! !
कुणीतरी म्हणालं; " भाववाढीलानियंत्रण करायला पाहिजे "
मलमपट्ट्या खूप झाल्या आता ऑपरेशनच पाहिजे आहे ! !

—उत्तम कांबळे

## आस्वाद

संथ भावार्त चाल आणि दर्दभरा आशय ही गझल या काव्यप्रकाराची दोन प्रमुख वैशिष्टचे. शिरीष चिधडे यांनी ' भासमय भासू नको ' या गझलीत ही दोन्ही वैशिष्टचे आणण्याचा प्रयत्न केला आहे. विश्वाचा विलय घडला तरी प्रीतीच्या आर्ततेमध्ये कवीला त्याची तमा वाटत नाही. नभनिळे नयन आणि नभदूर न राहण्याची विनवणी यांतील समदृश्यता जशी आल्हादक आहे तशीच 'जवळ ये, येऊ नको : दूर जा, जाऊ नको ' यांतील विरोधलयही सौंदर्याचे अर्थ उलगडणारी आहे. या कवितेतली प्रेयसीची चित्रे मोठी सुखसंवेद्य आहेत. ती वाऱ्यावर घनकृष्ण कुंतल विखरून बेछूट बनली आहे. तिने चांदण्याचा पदर हलकेच खांद्यावर घेतला आहे. तिच्या कंकणांच्या किणकिणीने वाराही थांबला आहे. या सगळ्या रम्य-चित्रात ' तारवाला ' व ' उपनेत्र ' हे शब्द मात्र खटकतात. विरसतात.

उत्तम कांबळे यांची ' कलंदर ' ही कविता रूपकात्मक रीतीने एक स्वभाववृत्ती सांगताना दिसते. कवी म्हणजे एक मुक्त प्रवासी आहे. आपल्या प्रवासाच्या कैफा-तच तो धुंद आहे. खरे म्हणजे त्याला आपल्या जीवनप्रवासात कुणाचाही स्नेह

लाभलेला नाही. पण निळे आकाश नील हातांनी आपल्याला बोलावत आहे असे त्याला वाटते. या एकाच जाणिवेत कवींच्या काव्यमयतेचे सगळे रंग उमटलेले आहेत. अव्यक्त सौंदर्याच्या आकर्षणाला रूप प्राप्त झाले आहे. गतीवाचून कवीच्या जीवनाला दुसरा अर्थच उरलेला नाही. कारण व्यवहारी जगाच्या कठोरपणाची त्याला पुरतीच ओळख पटलेली आहे. 'नाण्यावाचून लटकी प्रीती' हे त्याला उमगले आहे. या दोन भिन्न जाणिवा म्हणजे कवीच्या प्रवासवाटांच्या दोन कडा आहेत.

याच कवीची दुसरी कविता 'मलमपट्टया खूप झाल्या ..' ही वास्तव जगाचे दर्शन जास्त कठोरपणे घडविताना दिसते. त्या वास्तव दर्शनाला स्वात्म अस्मितेच्या तेजस्वी जाणिवेची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे कवीच्या भाषेला एकप्रकारचा आवेश प्राप्त झाला आहे. म्हटले तर हे जगाशी भांडण आहे, म्हटले तर समाजातील अप-प्रवृत्तींशी आहे. पण स्वात्म अस्मितेची उज्ज्वलता त्यात असल्यामुळे हे विधायक भांडण आहे. कवीची आत्मनिष्ठ शैली नव्या प्रतिमाभाषेशी संलग्न आहे. आपण आपले ताजमहाल उभारणे, खुज्या दरवाजातून शिरताना टेंगळे येणे ही अर्थव्याप्त प्रतीके, गर्भारबाईसारखे अवघडल्या पायांनी चालणे, फुटक्या कौलांसारखी खिशाला छिद्रे असणे दृश्यरूप उपमा ही या शैलीची उदाहरणे.

— रसिक

# सलामी वर्गणीदारांसाठी....

सलामी योजनेतील दुसऱ्या गटातील तीन पुस्तके तयार आहेत. ज्या वर्गणीदारांनी पुस्तके समक्ष नेणार असल्याचे कळविले आहे त्यांनी, ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात रविवार व्यतिरिक्त सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळात 'माणूस' कार्यालयातून पुस्तके नेण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

व्यवस्थापक



# मोर

तिठ्यावर मी जीप थांबवली. खाली उतरलो. जरा दूर वडाच्या सावलीत विसावलेला बाबालाल मला पाहताच लगबगीनं पुढं आला. पटक्याचा शेमला छातीवर घोळवत त्यानं नमस्कार केला व म्हणाला, " का उशीर केला यायला ?"

मी काही बोलायच्या आधीच बाबालालनं जीपमधली माझी एअर बॅग उचलली.

खांद्याला अडकवली. बंदूक माझ्या हाती दिली आणि पुढं होत म्हणाला, ' चला.

डोक्यावर हॅट आणि उजव्या खांद्यावर बंदूक तोलत मी त्याच्या मागोमाग निघालो.

वाट शेताच्या बांधाबांधानं जात होती. ओलं हिरवं लुसलुशीत गवत पायांना गुदगुल्या करीत होतं. दोन्ही बाजूंना शेंगा जोंधळ्याची रानं होती. अजून हवेत सकाळचा गारवा होता. शेंगाची पिवळीधम्मक फुलं उन्हात हसत होती. हिरव्या कंच पोपटांचे थवे पिकावरून उडत होते. कलकलाट करीत होते.

ओढा ओलांडून वर आलो तसं मी बाबालालला विचारलं, " आधी मळ्याकडेच जाऊया म्हणतोस ? हे बघ, आज मला चहा-जेवण काही नसलं तर चालेल. पण शिकार मिळालीच पाहिजे. "

" त्याची काळजी नको, साहेब. " मळ्याकडे वळत तो म्हणाला, " मोर काय हो, वाट्टेल तेवढं मिळतील. इथं रानभर त्यांचाच धुडगूस असतोय. आधी घरी जाऊ. जरा बसा. चहा घ्या. मग पडूच बाहेर. "

---

## सुंदर, दिमाखदार, मोरासारखी. मोरासारख्या कुरुप पायांची. . . .जैतुन.

### विनोद कुलकर्णी

---

बाबालालचा उसाचा फड जवळ आला. तसं एक कुत्रं भुंकत समोर आलं. धन्याला पाहून त्याच्या पायात घोटाळू लागलं. हा कोण आज नवा पाहुणा आलाय म्हणून पुनः पुन्हा मागं वळून पाहू लागलं. उगाच गुरकू लागलं.

घराबाहेरच्या पडवीत बाबालालनं बाज टाकली होती. त्यावर कांबळं आंथरलं. बंदूक भिंतीला टेकवून बाजेवर बैठक मारली. बुटाचे लेस सैल केले. दुरून कुठून तरी ऐकू येणारी मोराची हाक ऐकत बसून राहिलो.

दाराशी कुणाची तरी चाहूल ऐकू आली. वळून पाहिलं आणि पाहतच राहिलो. निळसर डोळ्यांची, गोऱ्यापान अंगाची, शेलाटया देहाची ही पोर कोण ते कळेचना. तिनं दिलेला चहा घेतला. ती आत गेली आणि सगळं रान पहिल्या पावसानंतरच्या मादक गंधानं दाटून गेल्यासारखं वाटलं.

दहा-पंधरा मिनिटांनी बाबालाल बाहेर आला. म्हणाला, ' चला. '

आम्ही बाहेर पडलो.

बांधावर उभं राहून बाबालालनं चोहोबाजूंना नजर टाकली. हनुवटीवर अंगठा चोळून अदमास घेतला. पायातले नाला मारलेले जाडे वहाण बाभळीखाली ठेवले आणि सावध पावलानी मिरच्यांच्या रांगातून तो निघाला. मी त्याचा मागोवा घेतला.

दोन तीन शेतं मागं पडली. पण मोरांचा कुठं ठिकाणा नव्हता. मधाशी ऐकू यणाऱ्या त्यांच्या हाका कानावर येत नव्हत्या. काळ्या मातकट चिमण्या होत्या. पिवळ्या चोचींच्या साळुंक्या होत्या. मधूनच गर्द पानसंभारात दडणारा भारद्वाज दिसत होता. निमिषार्धात बांधावरून पिकात दडणारे मुंगूस होते. पण मला हवा होता मोर. कुणीसं सांगितलं होतं, की त्याचं मास एकदा खाऊन पहाच राव–वा, जवाब नही.

पुढं निघालेला बाबालाल एकदम थबकला. खाली वाकला. अर्धा हात लांबीचं दिमाखदार मोरपीस माझ्या हातात देत म्हणाला, " पाहिलंत. अशी इथं तिथं पडलेली असतात ही पंखं. आमच्या जैतूननं यांचा पंखा तयार केलाय झकास. "

जैतून ? त्यानं दिलेलं मोरपीस मी अलगद गालावरून फिरविलं. त्या पिसातल्या निळ्या डोळ्यासारखेच त्या पोरीचे डोळे होते. झगमगणारे. नजर खिळवणारे.

" एकटीच पोर तुला ?" मी विचारलं.

" होय. " उसासा टाकत तो म्हणाला. " या पोरीला जलम दिला नि त्यातच आई गेली तिची. आता ही पोर आणि मी. "

बाबालालचे शब्द ओले ओले वाटत होते.

आता ऊन तापू लागले होते. शेताच्या बांधावरून, कधी पिकातून आम्ही जात होतो. नजरेनं सावज टिपत होतो. पण निराशाच होत होती. तो झगमगता डोळ्यांचा पिसारा असलेला पक्षीराज कुठं दिसत नव्हता. माणसांच्या एवढ्याशा चाहुलीनं कावऱ्या बावऱ्या होणाऱ्या त्याच्या माद्या कुठं गडप झाल्या कळत नव्हतं.

सगळी रानं पालथी घातली. पाय थकले. इतका वेळ केलेली पायपीट फुकट जाणारसं वाटू लागलं. बाबालालचा चेहरा अपराधी दिसू लागला. इतकं फिरूनही एकसुद्धा मोर दिसत नाही. शिकार गावत नाही याचा दोष आपलाच असं तो वाटून घेऊ लागला. उगाचच पाखरांच्या त्या जातीला शिव्या मोजू लागला.

एका डेरेदार आंब्याच्या सावलीला तो थांबला. धोतराच्या सोग्यानं कपाळ टिपत म्हणाला, " आता परत फिरू, सरकार, मळ्यावर जाऊन जेवण घेऊ. ऊन उतरलं म्हणजे सांजचं पुन्हा बाहेर पडू. आलाय तसे आज राहा इथं वस्तीला. मोकळ्या हातानं नाही जाऊ देणार मी तुम्हांला. "


आम्ही मळ्याची वाट धरली. स्वतःच्याच सावल्या तुडवत आम्ही मुकाट निघालो होतो.

आणि चालता चालताच बाबालाल एकदम थांबला. दोन पावलं मागं सरकला. मला जरा बाजूला घेत म्हणाला, " ते बघा. तिकडं वेळूबनात. अमात् या हं. "


ओढ्याच्या काठानं वेळूची गर्द बनं होती. उंचच्या उंच. हिरवीगार. त्यांच्या गार सावलीत एक मोर आणि तीन माद्या होत्या. मधून खाली वाकून काहीबाही टिपत होत्या. इकडची तिकडची चाहूल घेत होत्या. मोराचा पिसारा भुईला टेकला

# तुमच्यावर आमचा विश्वास आहे !

म्हणजे काय ?
म्हणजे असं, की
आम्ही तुमच्यासाठी
एक स्पर्धा योजलेली आहे.
कशी असेल ही स्पर्धा ?
नमुन्यादाखल
हे कोडंच पहा.



आकृती १ मधील फक्त तीन चेंडू तुम्ही कोठेही हलवून आकृती २ तयार करा.



चित्रातील सातही वस्तु फक्त तीन रेषा मारून स्वतंत्र करा.

हे कोडं कसं सोडवायचं ?
प्रथम तुम्ही विचार करा.
फार नाही, फक्त दहा मिनिटं
अकराव्या मिनिटाला पान चार पहा.
तिथे तुम्हाला याची उत्तरे मिळतील.
पण दहा मिनिटांनंतर पहा !
नऊ मिनिटांनंतर नाही !

**म्हणून तर म्हणतो
तुमच्यावर आमचा
विश्वास आहे**

# तर अशी असेल आमची स्पर्धा

इतकी छोटी, इतकी सोपी.
तुमचा फार वेळ न घेणारी
तुम्हाला फार त्रास न देणारी
तरीपण तुमच्या बुद्धीला थोडेसे
आव्हान देणारी.
या स्पर्धेत सगळ्यांसाठी
सगळं काही असेल.
लहान मुलांसाठी चित्रं असतील,
मोठ्यांसाठी व्यंगचित्रं, छायाचित्रं,
साहित्य, राजकारण असेल.
स्त्रीयांसाठी काही खास . . .
म्हणजे स्वयंपाकपाणी, फॅशन्स...इ. इ.
थोडक्यात ही स्पर्धा सर्वांसाठी
म्हणजे सहकुटुंब, सहपरिवार
इष्टमित्र (मैत्रिणीं)साठी आहे.




**अशी ही स्पर्धा 'माणूस'च्या
१५ ऑगस्ट विशेषांकापासून
सुरू होईल आणि**

# आणि माणूस दिवाळी अंकापर्यंत चालेल

म्हणजे एकूण अकरा अंक चालेल.

## तुम्ही काय करायचं ?

तुम्ही फक्त ' माणूस 'च्या अकरा अंकातील अकरा स्पर्धापत्रकं आमच्याकडे पाठवायची. एकही पत्रक कमी पाठवले तरी तुम्ही या स्पर्धेतून बाद ठरवले जाल. याचा अर्थ अकराच्या अकरा कोडी तुम्ही सोडवलीच पाहिजेत असा नाही, अकरापैकी कितीही कोडी सोडवलं तरी चालू शकेल, फार तर काय होईल ? तुमची गुणसंख्या कमी होईल व त्या विशिष्ट गटाचे बक्षिस तुम्हाला मिळू शकणार नाही पण दुसऱ्या एखाद्या गटाचे बक्षिस तुम्हाला मिळू शकेल.



या प्रत्येक अंकात एक नवी स्पर्धा असेल. ती काळजीपूर्वक वाचायची शांतपणे विचार करून सोडवायची व ही अकरा स्पर्धापत्रकं दिवाळीनंतर एकत्रित आमच्याकडे पाठवायची.

## आणि तुम्ही यशस्वी झालात तर...

**तर
तुम्हाला
एकूण
१०,०००
रुपयांची
बक्षिसे
मिळतील**

ती काय असतील ?
केव्हा दिली जातील ?
कशी दिली जातील ?
यासाठी आणि स्पर्धेच्या
सविस्तर माहितीसाठी
माणूस १५ ऑगस्ट
विशेषांकाकडे लक्ष ठेवा.


---


**स्पर्धा क्रमांक १**

**माणूस**

**१५ ऑगस्ट विशेषांक**

---





होता. शिरावर तुरा होता. तिन्ही माद्या त्याच्या आगंमागं होत्या. मधूनच त्याला खेटत होत्या.

हलक्या पावलानं मी पुढं आणि मागून बाबालाल असे ओढ्याकाठाने जाऊ लागलो. मी बंदूक सरसावली होती. ही शिकार हातची जाऊ देऊन चालणार नव्हते. मोराचं लुसलुशीत मांस...झगमगणारे तेजस्वी निळेगार डोळे...अलीकडच्या वेळूच्या कुंजाआड आम्ही उभे होतो आणि पलीकडे ते चार जीव सुखात, आनंदात हरवले होते. एक क्षणभर माझी चापावरची बोटं जड झाली—पण दुसऱ्याच क्षणी त्यांच्यात विजेची हालचाल झाली. बार उडाला आणि दिमाखानं मान उंचावून इकडे तिकडे पाहणारा तो मोर दोन-तीन फूट उंच उडाला. खाली पडला. सारं बळ एकवटून ओढ्यात त्यानं झेप घेतली. वाट फुटेल तिकडे माद्या पळाल्या. चमत्कारिक आवाज करीत दिकपाल झाल्या. बाबालालनं काठावरून ओढ्यात उडी घेतली. ओढ्याच्या प्रवाहाचं निवळशंख पाणी चिळकांड्यासारखं उडालं. धावणाऱ्या मोरावर त्यानं झडप घालायचा प्रयत्न केला. पण तो निसटला. एका दमात उंच उडाला आणि पलीकडचा काठ गाठला. तिथल्या काटेरी झुडुपातून जोंधळ्यात जाऊ लागला. पण बाबालालनं त्याला गाठलंच. दोन्ही हातांनी त्याला त्यानं वर उचललं आणि काळविटासारख्या उड्या मारत तो माझ्यापुढं येऊन उभा ठाकला.

तो जखमी, मृतःप्राय मोर त्यानं माझ्या हातात दिला. त्याची मान कलली होती. डोळे विझत होते. पिसारा विस्कटला होता. चोच जरा वासली होती.

आम्ही आता खुशीनं, शिळा घालत, बडबडत मळ्याकडे चालू लागलो.


घरी आलो. बाबालाल म्हणाला, "सरकार, खाना तयार आहे. हातपाय धुऊन घ्या." त्यानं बादलीभर पाणी बाहेर आणून ठेवलं.

तोंड धुतलं. टॉवेलनं हात पुसत चापीवर बसलो. बाबालालनं थाळी आणली. सुंदर साजूक चपात्या. लसणीची झणझणीत चटणी. घट्ट दही. तेलाचा तवंग असलेली उसळ. जीभ पाणावली.

जेवण आटोपलं. बाहेर पडवीतल्या बाजल्यावर अंग टाकलं. उसावरून येणारा गार वारा जोजवू लागला. डोळे मिटता मिटता बाबालालला म्हटलं, "जरा पडतो बाबा. उन्हं उतरली म्हणजे उठव हं मला. संध्याकाळी पाच-सहापर्यंत निघायला हवं."

पण त्यानं उठवण्याआधीच केव्हातरी मला जाग आली. सकाळचा पहिल्या पावसानंतरचा मातीचा गंध पुन्हा जाणवत होता. मी उठलो. सहज माझं लक्ष दारातून आत गेलं—तिथं ती होती. जैतून. निळ्या डोळ्यांची. आपल्या गोऱ्यापान बोटांनी मोरपिसांचा पंखा विणणारी. मघाशी मारलेल्या मोराच्या अंगावर हात फिरवत ती बसली होती. त्याच्या मृत डोळ्यात खोल डोकावून पाहत होती.

छोट्या नायकाला प्रेरणा देणारी साठे माल्टेक्स बिस्किटे




पहिल्या पासूनच मी लढाऊ वृत्तीचा. लुटुपुटीची बंदूक घेऊन फिरण्याची व खेळण्याची भारी हौस. मध्येच भूक लागली तर खायला माल्टेक्स बिस्किटे! माल्टेक्स बिस्किटे माझी तब्येत ही अशी तुस्त राखतात. कारण त्यातील माल्ट व पौष्टिक घटक पूर्णपणे उत्साह वाढविणारी आहेत.




heros' SBC-38A

तिनं दबकून मागं वळून पाहिलं. मी एकटक तिच्याकडे पाहत होतो, हे जाणून ती विलक्षण लाजली. बावरली. आत पळाली...

हळूहळू उन्हे उतरली. पिवळी पडू लागली. सांजवारं वाहू लागलं. आता निघायला हवं होतं. तिठ्यावर पोचायलाच अर्धा तासभर चालावं लागणार होतं. तिथून तासभर जीपनं की आलंच घर.

मी बाबालालला म्हटलं, "निघूया रे आता."

त्यानं माझं सामान आवरलं आणि आम्ही बाहेर पडलो.

मळचाला वळसा घालताना मी मागं वळून पाहिलं. वाटत होतं, कदाचित जैतून उभी असेल दारात. एका दिवसाच्या या पाहुण्याला निरोप द्यायला. पण तिथं कुणी नव्हतं. दारात फक्त दाणे टिपणाऱ्या कोंबड्या. मला या पोरीचं मोठं कुतूहल वाटत होतं.

जाता जाता मी बाबालालला विचारलं, "यंदा काय पोरीची शादी आहे की नाही रे? मला बोलवायला विसरू नकोस हं."

क्षणभर त्याची पावलं अडखळली. पण स्वतःला सावरत तो म्हणाला, "शादी तर कधीच झालेय तिची!"

"आं? मग पोर तुझ्या घरी कशी काय रे?"

"काय करायचं, सरकार. नांदवूनच घ्यायला तयार नाहीत ते लोक."

"का बरं?"

"पोरीच्या पायावर कोड फुटलंय. आधी काहीही नव्हतं हो. त्यांचं म्हणणं असं की, फसवून पोरगी गळ्यात बांधली. शादी होऊन सहा महिन्यांनी म्हणजे मार-मारून परत पाठविली तिला त्यांनी." त्याचा गळा भरून येत होता.

"मग काही समजूत वगैरे काढली नाहीस त्यांची?"

"भलती मुडदाड माणसं आहेत ती. म्हटलं, एकटी पोर आहे. मला काही जड नाही. राहील इथंच माझ्याजवळ."

आम्ही तसेच चालत राहिलो. माझ्या डोळ्यासमोरून जैतून हटत नव्हती. सुंदर. दिमाखदार. मोरासारखी. मोरासारख्या कुरूप पायांची. लाजणारी. बावरणारी. मनातनं कुढणारी.

तिठ्यावर आलो. बाबालालनं सामान ठेवलं. मी त्याला दहाची नोट दिली. ती त्यानं पैरणीत ठेवली. नमस्कार केला. रस्त्याच्या कडेला उभा राहिला.

मी जीप स्टार्ट केली. माझ्या मागच्या सीटवर तो मोर पिसारा विस्कटून पडला होता. प्रकाश सरत होता. जांभळी रात्र हलकेच पसरत होती आणि दूर रानातून पाच-सहा मोरांचा करुण टाहो ऐकू येत होता. काळीज भेदून जात होता.

□ □ □

# पुस्तके

## आमचे गोंय आमका जाय !

जयवंत चुनेकर

श्री. सुभाष भेंडे विनोदी लेखक म्हणून वाचकांना सुपरिचित आहेत. त्यांचे हे विनोदी लेखन कथा स्वरूपातील आहे. कथेकडून कादंबरीकडे वळताना मात्र त्यांनी आपली आजवरची प्रतिमा एकदम पालटून टाकली आहे.

भेंडे यांची ही पहिलीच कादंबरी 'गंभीर' आहे. लक्षणीय बाब ही की, जितक्या सहजपणे श्री. भेंडे यांनी विनोदी लेखन केले आहे, तितक्याच सहजपणाने त्यांनी ही गंभीर आशय असलेली कादंबरी लिहिली आहे. सातत्याने विनोदी लेखन केल्यानंतर एकदम गंभीर सूर पकडताना सारेच लेखन फसण्याचा धोका होता. स्वतःच्या लेखनासंबंधी विश्वास असल्याशिवाय असा धोका लेखक पत्करणार नाही. श्री. भेंड्यांनी तो पत्करला आणि आत्मविश्वासाने त्यांनी या क्षेत्रात पाऊल टाकले आहे, हे ही कादंबरी वाचल्यानंतर निश्चितपणे जाणवते. पहिलीच कादंबरी असूनही भेंडे यांच्या लेखनात नवखेपणा आढळत नाही, यातच त्यांच्या या कादंबरीचे निम्मे अधिक यश आहे.

रूढार्थाने पाहिले तर, या कादंबरीत नायक-नायिका-खलनायक नाहीत. या कादंबरीचा खरा नायक-खलनायक जो कोणी आहे, तो 'संक्रमण' आणि तो तीन वेगवेगळ्या स्तरांवर वावरतो आहे. राजकीय, सामाजिक नि सांस्कृतिक कादंबरीचा विषय आहे, गोव्याच्या मुक्तीचा गोमंतकाची मुक्ती ही या कादंबरीतील केंद्रस्थानी असणारी घटना. तिच्या एका बाजूला आहे. गोमंतकातील निरनिराळ्या थरातील व्यक्तींचे मुक्तिपूर्व जीवन आणि दुसऱ्या बाजूला त्यांचे मुक्तीनंतरचे जीवन. या दोन्ही बिंदूंना जोडणारा क्रांती हा दुवा.

पोर्तुगीजांच्या दृष्टीने त्यांची सत्ता संपुष्टात आणणारे हे राजकीय 'संक्रमण' आहे; तर एक संस्कृती जाऊन दुसरी येणार, म्हणून ते गोमंतकीयांच्या दृष्टीने सांस्कृतिकही आहे. गोवे स्वतंत्र झाल्यावर भाटकार आणि मिनेरांचे वर्चस्व संपून मुंडकारांना आणि सर्वच वर्गांना स्वातंत्र्य मिळेल, हाही या संक्रमणामधला एक धागा म्हणून ते सामाजिकही आहे. अशा तीन स्तरांवर हे संक्रमण घडते आहे. आणि ते ज्यांच्या आयुष्यात घडते आहे त्या प्रमुख व्यक्ती आहेत श्रीपाद, घाणेकर,

मारिया-आंतोन, प्रिया डॉक्टर अंतुले. निरनिराळ्या थरातली ही माणसे. यातल्या प्रत्येकाच्या जीवनाचे धागे एकमेकाच्या जीवनात गुंफले जातात आणि त्यांच्या विणीतून या कादंबरीचा पट तयार होतो. 'आमचे गोवे आम्हाला हवे,' या पार्श्वभूमीवर.

या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात वरवर पाहता व्यक्तिगत अशा घटना घडत राहतात. परंतु बदलत्या वातावरणात त्यांचे वैयक्तिक स्वरूप पाहाता पाहाता पुसले जाते आणि एका वैशिष्टयपूर्ण चळवळीशी त्यांचा धागा जोडला जातो. त्यांच्या आतापर्यंतच्या 'सुशेगाद' जीवनात प्रचंड खळबळ माजून जाते.

## प्रमुख व्यक्तिरेखा

घाणेकर ही या कादंबरीतील एक प्रमुख व्यक्ती. मुळात साध्या, सरळ, भित्र्या, बुजऱ्या असणाऱ्या या दरिद्री माणसाच्या जीवनात 'नशिबाचं चक्कर' फिरवून टाकणारा एक दिवस उजाडतो, घाणेकर 'स्मगलिंग' चा धंदा करू लागतो आणि पाहाता पाहाता गोव्याच्या राजकीय सामाजिक वर्तुळातील तो एक बडी आसामी होऊन बसतो. तो पार बदलून जातो. इरसाल बनतो. इतका की राष्ट्रभक्ती हाही त्याच्या दृष्टीने मोबदला देऊन करायचा एक व्यापार होतो.

मारिया आंतोनाची पत्नी. आंतोन पैसा मिळवण्यासाठी दूर आंगोलाला गेलेला. एका वर्षी त्याची वाट पाहून पाहून मारिया कंटाळते आणि एका पाखलोकडे राहू लागते. गोव्याच्या मुक्तीनंतर तो पोर्तुगालला पळून जातो आणि मारियाच्या आयुष्याचाच विस्फोट होतो. तिच्याबरोबर तिच्या आई मुलीचाही !

श्रीपाद, शेवंती गोवेकरणीचा मुलगा. सळसळत्या रक्ताचा. आईचं जीवन पाहून त्या जीवनाबद्दल घृणा निर्माण झालेला. आपल्या मावसबहिणीचा–कस्तुरीचा–शेज विधी होऊ नये, यासाठी तो धडपडतो पण घाणेकर त्याला 'जयहिंदवाला' या आरोपाखाली अटक करवतो. (व शेवंतीला आपल्या जाळ्यात ओढतो). श्रीपाद तुरुंगातून बाहेर पडतो तो मुक्तिचळवळीचा एक प्रमुख कार्यकर्ता. तिथून पुढे त्याच्या आणि घाणेकरच्या 'कर्तृत्वाची' स्पर्धा सुरू होते. तो निवडणूक जिंकून घाणेकरचा पराभवही करतो.

या झाल्या या कथानकातील प्रमुख व्यक्तिरेखा, त्यांखेरीज बाबाय वेरेकर, मारियाची माय, वैकुंठबाब, राणू कामत, आप्पा गायतोंडे, परैरा या दुय्यम व्यक्तिरेखा. यांच्याही आयुष्याचे धागे प्रमुख व्यक्तिरेखांच्या आयुष्याशी गुंतले गेल्यामुळे बदलत्या वातावरणाचा हीही माणसे एक भाग झाली आहेत.

गोव्याच्या मातीतल्या माणसांचे जीवन ज्या वातावरणात घडले–बदलले ते वातावरण हीही या कादंबरीतील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. किंबहुना असे म्हणायला प्रत्यवाय नाही की लेखकाने निरनिराळ्या थरातल्या या व्यक्तींच्या जीवनाचा पट विणताना हे वातावरणच अधोरेखित केले आहे.

एक संस्कृति–राजकीय वा सामाजिक किंवा दोन्ही क्षेत्रांतील–पुसली जाऊन

दुसरी तिची जागा घेते. पण तिच्या बदलत्या स्वरूपाशी सर्व समाजाची मने एकरूप होतीलच असे नाही. गोव्यातील पोर्तुगीज राजवट आणि संस्कृति जाऊन भारतीय राजवट आणि संस्कृतीने ती जागा घेतली. श्रीपाद, केंकरे यासारख्या व्यक्तींनी (आणि बाबय वेरेकर सारख्यांनी त्यांच्यापरीने) या बदललेल्या वातावरणाचे स्वागत केले तरी घाणेकर वैकुंठबाब यांसारख्या व्यक्ती मात्र त्या संस्कृतीचे स्वागत खुल्या मनाने करू शकलेल्या नाहीत; आपला एक प्रकारे झालेला पराभव स्वीकारू शकल्या नाहीत.

या दोन्ही वातावरणातला बदल लेखकाने बारीक सारीक प्रसंगांतून अधोरेखित केला आहे. घाणेकरांनी केलेले पिएदादचे स्वागत, पणजी फेरीबोटीच्या धक्क्या-वरले संवाद या दोन उदाहरणांचा यादाखल उल्लेख करता येईल. याबरोबरच श्रीपादला जाणवणाऱ्या काही प्रश्नांतून आणि गोवा मुक्तीनंतरच्या काही प्रसंगा-तूनही स्वातंत्र्य मिळवल्यानंतर ते टिकवणं अधिक गुंतागुंतीचे कसे आहे. त्याचेही मार्मिक चित्रण लेखकाने केले आहे.

गोव्याच्या समाजजीवनातील परिवर्तनाचा हा सारा आलेख उत्कटतेने काढताना लेखक कुठेही भावनाविवश होत नाही. अलिप्तपणाने त्याने लेखन केले आहे, (आणि तेच भेंडयांचे सामर्थ्य आहे.) म्हणूनच त्या लेखनात अनुभवाचा सच्चेपणा जाणवतो, त्यांची उत्कटता जाणवते. (मात्र या साऱ्या वातावरणात प्रिया–अंतुले प्रेमप्रकरणाचा सांधा कुठे जुळत नाही, यांचीही नोंद केली पाहिजे. प्रिया ही घाणे-करच्या आयुष्याचा–पर्यायाने त्याच्याभोवतीच्या वातावरणाचा–एक घटक असली आणि म्हणून तिच्या आयुष्याची शोकांतिका होते, असे मानले, तरीही हा सांधा बरोबर जोडला गेला आहे असे वाटत नाही.)

कादंबरी गोमंतकाच्या प्रादेशिक वातावरणात घडत असली, तरी प्रादेशिकता ही केवळ एक लकब, टुम म्हणून वापरलेली नाही. तर त्या प्रदेशाने घडवलेल्या व्यक्तींच्या आयुष्यांतील चढउतारांचा आलेख दाखवण्यासाठी कथानकाचा एक अपरिहार्य घटक म्हणून ते येते. म्हणूनच त्यात अकारण, पसारा वाढवणारी निसर्ग वर्णने नाहीत. किंवा त्या वातावरणात वाढलेल्या व्यक्तींच्या स्वभावदर्शनासाठी ओढून ताणून आणलेले घटना प्रसंग नाहीत, श्री. भेंडे यांनी पाळलेला हा संयम स्पृहणीय आहे.

प्रामुख्याने रंजन प्रधानता नजरेसमोर ठेवून आणि विशिष्ट वर्गाच्या वाचका-साठी गुळगुळीत भाषेत अद्यापही लिहिल्या जात असलेल्या सध्याच्या मराठी कादं-बरीच्या क्षेत्रात निःसंशयपणे वाचनीय अशी एखादी कादंबरी हाताला लागावी, हेही काही कमी नाही ! ◻

**आमचे गोंय आमका जाय ! : सुभाष भेंडे : मॅजेस्टिक, मुंबई ४ : कि. सात रुपये.**

# मध्यंतर

दोन फार्स :

## बायको नसावी शहाणी । रात्र थोडी सोंगं फार

पुष्पा भावे


एक काळ असा होता, की श्री. आत्माराम भेंडे व श्री. बबन प्रभू या दोन नावांचा आणि मराठी रंगभूमीवरील फार्सचा अविभाज्य संबंध होता. आज काळ असा आला आहे, की ही दोन नावे आपल्या श्रेयनामावलीत मिरवणारे एखादे नाटक पहायला जावे आणि त्या प्रयोगात फार्सच्या शैलीचा मागमूसही नसावा; इतकेच काय पण व्यावसायिक रंगमंचावर येणाऱ्या नाटकात अपेक्षित असणारी किमान सफाईदेखील नसावी. श्री. ना. ग. करमरकर यांचे 'बायको नसावी शहाणी' हे नाटक म्हणे श्री. आत्माराम भेंडे यांनी दिग्दर्शित केले आहे. एखाद्या महाविद्यालयीन स्नेहसंमेलनातील नाटकमुद्धा या नाट्यप्रयोगापेक्षा अधिक नेटके होते.

मुळात रूपांतरकार श्री. करमरकर यांचे संवाद विनोदी नाटकाची लय पकडणारे नाहीत; कथानकाला फारशी गती नाही. पात्रांची निरर्थक गर्दी या फार्समध्ये आहे आणि या गर्दीची चतुर विरचना करणाऱ्या दिग्दर्शनाची संपूर्ण वाण आहे. संवादसांग्याचे (प्रॉम्टरचे) संहितावाचन प्रेक्षागृहात ऐकू येणे, पात्रांनी थांबत थांबत संवाद म्हणजे, निरर्थक हालचाली करणे, कंटाळवाण्या संथ गतीने नाटक चालू असणे हे सर्व प्रमाद एकाच नाट्यप्रयोगात क्वचितच दिसतात. एकटे श्री. शरद तळवलकर तो नाट्यप्रयोग सावरण्याचा यत्न करीत होते. श्री. बबन प्रभु यांनी व्यावसायिक रंगमंचावर चढताना, आपण प्रेक्षकांचे काही देणे लागतो याचा विचार करणे आवश्यक आहे. किमानपक्षी, 'झोपी गेलेला जागा झाला'च्या स्मृती ज्या पिढीच्या मनात आहेत त्या पिढीवर तरी बेजबाबदार अभिनयाचे (!) अत्याचार करू नयेत. अशा नाटकाचे कथानक सांगायचे कशाला आणि कोणी वाचायचे तरी कशाला ? श्री. कुलकर्णी नामे कोणी नवा निर्माता याप्रकरणी बळी जाणार असे दिसते.

सुदैव असे की नाटकाला जाण्याविषयी मनात दहशत निर्माण व्हावी असा वरील प्रयोग पाहिल्यानंतर थोडयाच दिवसात 'अभिषेक' या संस्थेचा 'रात्र थोडी सोंगं फार' हा फार्स बघण्याचा योग आला. या फार्सच्या मराठी रूपाचे कर्ते श्री. दत्ता केशव यांच्याविषयी मनात एक जुनी आठवण अशी की 'अति शहाणा त्याचा' नामे एक झकास विनोदी मराठी चित्रपट त्यांनी काही वर्षांमागे सादर केला होता. त्या पटकथेत दिसणारी विनोदाच्या स्वतंत्राची जाणीव मराठी चित्रपटात क्वचितच दिसते. त्याही वेळेला अनेक चित्रपटसमीक्षकांनी त्या चित्रपटाची जातकुळी न जाणता चुकीचे व्यवहारी प्रश्न त्यास विचारले होते.

बायकोच्या धाकात राहणाऱ्या आणि कधीतरी त्या धाकापासून दूर पळण्याचे स्वप्न पाहाणाऱ्या एका विसराळू प्राध्यापकाची, त्याच्या मित्राची तारांबळ हा या फार्सचा मूळ कथाभाग. तसे पाहिले तर नेहमीप्रमाणे मृत्युपत्र, फसवणूक, संशयकल्लोळ याच वर्तुळात फिरणारे हे नाटक दिग्दर्शनकौशल्यामुळे आणि पात्रांच्या शैलीदार अभिनयामुळे निर्भर विनोदाचा प्रत्यय देते. एखादा फार्स सादर करताना नाट्यसंहिता निमित्तमात्र असते. प्रयोगाला दिग्दर्शकाने दिलेली गती, फार्सची व्यवहारापासून अलिप्त अशी अतिशयोक्त शैली, अभिनयाचे सहेतुक कृत्रिम स्वरूप यामुळेच प्रयोगाला खरे रूप प्राप्त होते. 'काका किशाचा' या नाटकाच्या दिग्दर्शनामुळे प्रकाशात आलेल्या श्री. किशोर प्रधान यांनी त्यानंतर फार्सची शैली खरोखरच आत्मसात केली आहे. या नाटकातील त्यांचा अभिनयही वाखाणण्याजोगा होता. या नाट्यप्रयोगातील नटवर्गापैकी श्री. विजय दत्त यांचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. अमराठी रंगमंचावरून येऊनही त्यांनी मराठी प्रयोगात सहजपणे अभिनय केला. श्री. कमलाकर नाडकर्णी यांना 'काका किशाचा' या नाटकापासूनच आपल्या अभिनयाची स्वतंत्र शैली नेमकी सापडली आहे. वकीलाच्या छोटया भूमिकेतही आपल्या हालचाली. मुद्राभिनय हास्योत्पादक करण्याची त्यांची किमया विलक्षण होती. गंभीर भूमिकेचा तोल सांभाळणे एकवेळ सोपे परंतु येथे फार्सिकल तोल त्यांनी सहजपणे सांभाळला आहे. मराठी रंगमंचावरील अभिनेत्री बहुधा मनमोकळेपणे विनोदी अभिनय करीत नाहीत. हा मनमोकळेपणा सौ. शोभा प्रधान यांच्या अभिनयात निश्चित आहे. मात्र त्यांनी आपल्या आवाजावर काही संस्कार करणे इष्ट आहे. ध्वनिक्षेपकावरून येणारा त्यांचा आवाज कर्णकटु वाटतो. नाटकाच्या प्रसन्न प्रतिक्रियेत तो बाधक ठरतो. इतर साहाय्यक पात्रांनी आपापली कामे योग्य वठवली आहेत. एक संघ म्हणून या नाटकातील विविध पात्रांनी एकमेकाला सुजाण सहकार्य दिले आहे. नाटककाराने नाटकाचा विस्तार व पात्रांची गुंतागुंत कमी केल्यास हा फार्स अधिक नेटका होऊ शकेल.

नेपथ्य देखणे होते; त्यातील विभागकाचा नाट्यपूर्ण उपयोग केला होता. तरी काही ठिकाणी सामानाची गर्दी पात्रांच्या मुक्त हालचालीत व्यत्यय आणीत होती असे वाटले. हे काही क्षुल्लक दोष वगळले तर 'रात्र थोडी सोंग फार' या नाटकाचा प्रयोग मन प्रसन्न करणारा आहे. ◻



क्यूबातील क्रांती पूर्ण झाली होती....
पण फिडेल कास्ट्रोने
ज्या क्रांतीची अभिवचने दिली होती
ती तर अजून सुरू व्हायची होती

# फिडेल चे आणि क्रांती

**अरुण साधू**

क्रांती म्हणजे प्रस्थापित समाजव्यवस्था तळापासून ढवळून काढून नवी, न्यायी, सर्वांना समान वागणूक देणारी समाजव्यवस्था निर्माण करणे. क्रांतीमध्ये पूर्ण बदल अपेक्षित असतो; जुनी बांधणी पाडताना झंझावाती जोर अपेक्षित असतो, त्याचप्रमाणे पुनर्रचनाही अपेक्षित असते आणि या पुनर्रचनेमध्ये सर्वांचा सहभाग गृहीत धरलेला असतो. क्रांतीमध्ये जीवनपद्धतीत मूलभूत बदल अपेक्षित असतो

जानेवारी १९५९ मध्ये फिडेल कास्ट्रोच्या हाती सत्ता आली तेव्हा क्रांतीची नुकती कुठे सुरवात झाली होती. केवळ एक जुलमी राजवट नाहीशी झाली होती. समाजव्यवस्था तीच कायम होती. फिडेल कास्ट्रोने ज्या " क्रांती "चे अभिवचन दिले होते ती अजून सुरू व्हायची होती.

ज्या बंडखोर गनिमी सैनिकांनी बाटीस्टाला पदभ्रष्ट केले होते ते सर्व तरुण होते. राज्यकारभाराचा, सत्तेचा त्यांच्या अनुभव शून्य होता. क्रांतिकारकांच्या नेत्यांमध्ये सर्वांत वयस्कर होता फिडेल कास्ट्रोच. वय वर्षे बत्तीस ! चे गव्हेरा होता एकोणतीस वर्षांचा. बाकी सगळे तीसाच्या आतले. फिडेलच्या संमतीने तात्पुरते सरकार स्थापन झाले असले तरी खरी सत्ता

# फिडेल लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर होता.

## लेखांक । दहा-अकरा

होती या उसळत्या रक्ताचा नव्या दमाच्या स्वप्नाळू तरुणांच्या हाती. हे तरुण ध्येयवेडे निश्चित होते. परंतु त्यांच्या पाठीशी शिस्तबद्ध आणि विशिष्ट राजकीय ध्येयाशी बांधलेला असा कोणताही पक्ष नव्हता.

सुरुवातीचे जे तात्पुरते सरकार स्थापन झाले होते त्याचा अध्यक्ष डॉ. मन्युअल उरुटीया यास फिडेलने सिएरा मेस्त्रा-मध्येच निवडले होते. सरकारातील इतर मंत्र्यांची निवड फिडेलची नव्हती. मध्यमवर्गीय देशभक्तांचे असे हे सरकार होते. डॉ. जोझे मिरो कार्डोना हा प्रधानमंत्री होता. फिडेल आणि त्याच्या बरोबरच्या सिएरा मेस्त्रा गटातील एकाचाही या सरकारात समावेश नव्हता.

ही अशी परिस्थिती फार काळ चालणे शक्य नव्हते. फिडेल लोकप्रियतेच्या अत्युच्य शिखरावर होता. आपल्या सर्व समस्या सोडविण्याची जादूची कांडी फक्त फिडेल जवळच आहे असे सर्वांना वाटत होते. सर्व प्रश्नांचे निर्णय अखेर फिडेलवरच सोपविले जात होते. क्यूबात जणू दोन सरकारे निर्माण झाली होती. एक अध्यक्ष उरुटिया आणि प्रधानमंत्री कार्डो यांचे, तर दुसरे फिडेल कास्ट्रोचे पण फिडेल एका ठिकाणी होताच

कुठे. लोकप्रियतेच्या लाटांवर झोके घेत, लष्कराची पुनर्रचना करीत. देशाच्या या भागातून त्या भागात असा हिंडत, क्यूबन क्रांतीची आणि भविष्यातील समृद्ध विषयीची स्वप्नाळू भाषणे देत होता. त्यांच्या शब्दावाचून तर सरकारला काम करणे अशक्य झाले होते.

आणि इकडे अमेरिकन सरकार अणि क्यूबन जनता व क्रांतिकारक यांच्या मनात परस्परांविषयीचे संशय पिशाच्च दिवसा दिवसाला वाढून प्रचंड भेडसाविणारा आकार धारण करीत होते. फिडेल आणि त्याचे क्रांतिकारक हे स्वत: कम्युनिस्ट नाहीत याची अगदी सी. आय. ए ने खात्री दिली असली तरी फिडेलने वेळोवेळी बोलून दाखविलेले आर्थिक विचार पुरेसे जहाल होते. आणि अमेरिकन भांडवलदाराचे हात क्यूबन राजकारणात एवढे गुंतले होते की कोणताही जहाल विचारांचा माणूस तेथे राज्यावर येणे त्यांना सोयीचे नव्हते.

म्हणून अमेरिकन सरकारचा जवळ जवळ अगदी शेवटपर्यंत बाटीस्टा सरकारला पाठिंबा होता. बाटीस्टाच्या राजवटीत क्यूबनांचे काय हाल झाले याची अमेरिकनांना चिंता नव्हती. पण फिडेल सत्तेवर येतो आहे म्हणताच अमेरिकन खडबडून जागे झाले. अगदी शेवटच्या क्षणीही अमेरिकनांनी लष्कराला सत्ता काबीज करता यावी म्हणून जनरल कँटिलो यास मदत केली असा क्यूबनांना संशय होता.

विजयाच्या पहिल्या दिवशी हॅवानामधील जनतेने जी निदर्शने केली ती बघून अमेरिकन भांडवलदारांचे धाबे दणावले. हॅवानातील झुंडींची पहिली प्रतिक्रिया होती शहरातील रस्त्यावरील पार्किंग मीटर्स फोडणे, टेलिफोन तारा तोडणे आणि धूतगृहांची लुटालूट करणे. कारण या तीनही गोष्टी म्हणजे अमेरिकन आर्थिक वर्चस्वाची प्रतीके होती. हॅवानात हे प्रकार चालू झालेले पाहताच अमेरिकन सरकारने लगबगीने तीन प्रचंड विनाशिका आणि दोन पाणबुड्या हॅवाना बंदराकडे रवाना केल्या. बंदरापासून थोड्याच अंतरावर त्या नांगर टाकून उभ्या राहिल्या. याचा अर्थ उघड होता. आणि सर्व क्यूबन जनतेतच अमेरिका विरोधी संतापाची लाट अधिकच तीव्र झाली.

अमेरिका आणि क्यूबा यांच्यामध्ये परस्पर संशयाची आणि अविश्वासाची बीजे अशा रीतीने फार पूर्वीपासूनच पेरली गेली होती. क्रांतिकारकांच्या विजयानंतर तर प्रत्येक दिवशी या दोन राष्ट्रातील संबंध अधिकाधिक बिघडत चालले.

'अमेरिकन जनतेमध्ये क्यूबन क्रांतिविषयी अविश्वास आणि गैरसमज निर्माण होण्यास अगदी सुरुवातीच्याच काळात निमित्त मिळाले. ते म्हणजे बाटीस्टाला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यावर भरलेले क्रांतिकारी खटले आणि त्यांना दिलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षा.

फिडेलचा आणि क्रांतिकारकांचा अनावश्यक रक्तपाताला प्रथमपासूनच विरोध होता. बंडखोर, सैन्य एकामागून एक शहरे काबीज करीत असताना फिडेल कास्ट्रो

रेडिओवरून वारंवार एक आवाहन जनतेला करीत होता, कायदा हाती घेऊ नका, रक्तपात करू नका, लोकांच्या बाटीस्टाविरोधी असंतोषाला हिंसात्मक वळण लागता कामा नये. युद्ध संपताच प्रतिक्रांतिकारी गुन्हेगारांवर त्वरित खटले भरून न्याय देण्यात येईल. फिडेलच्या या आवाहनामुळे बराच रक्तपात टळला आणि कित्येक जुलूमी, भ्रष्ट अधिकारी जमावांच्या कोपाला बळी पडले असते ते वाचले.

त्याप्रमाणे अत्याचारी, खुनी आणि ज्यांनी पूर्वी कैद्यांचे हालहाल करून ठार मारले अशा अधिकाऱ्यांवर खटले भरून त्यांच्यावरील आरोप सिद्ध होताच त्यांना गोळ्या घालून ठार मारण्यात येऊ लागले. सूडाने पेटलेल्या लोकांना तेवढेच समाधान. परंतु अमेरिकेत मात्र या प्रकारावर प्रखर टीका होऊ लागली. अशा खटल्यांच्या योग्यायोग्यतेबाबत संशय घेतले जाऊ लागले.

## सोसा ब्लाको खटला

हे बघताच फिडेल कास्ट्रोने एक अगदी जाहीर खटला भरण्याने ठरविले. त्यामुळे तरी अमेरिकनांचा गैरसमज दूर होईल अशी त्यांची कल्पना होती. त्याप्रमाणे सोसा ब्लाको या अत्यंत अपकीर्ति झालेल्या एका दुष्ट अधिकाऱ्यावर एका मोठ्या पटांगणावर खटला भरला. त्यासाठी खास चारशे अमेरिकन वार्ताहरांना आणि अमेरिकन काँग्रेसच्या दोन सदस्यांना पाचारण केले. सुमारे अठरा हजार लोकांच्या उपस्थितीत आणि कैक टेलिव्हिजन कॅमेऱ्यांच्या झोतात हा खटला भरला. ब्लाको दोषी ठरला आणि त्याला गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा झाली.

परंतु फिडेलला वाटले त्याच्या बिलकूल उलट प्रतिक्रीया या खटल्यामुळे अमेरिकेत झाली. बाटीस्टाच्या राजवटीत एकेक अवयव तोडून हाल हाल करीत हळूहळू बंडखोरांना ठार मारणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर असे जाहीर खटले भरून गोळ्या मारून ठार मारणे हे बेकायदेशीर आणि रानटीपणाचे आहे असे अमेरिकन वृत्तपत्रांचे मत पडले. बाटीस्टाच्याच्या राजवटीत पाच वर्षांत सुमारे वीस हजार विरोधकांना अनन्वित हाल करून ठार मारण्यात आले होते. त्या भयानक प्रकारांना मुळीही प्रसिद्धी न देणाऱ्या अमेरिकन वृत्तपत्रांना आत्ताच मानवतावादाचा पुळका आलेला बघून क्यूबनांना त्यांची घृणा वाटली नसती तरच नवल. असे खटले भरले नसते तर क्यूबन जमावांनी अक्षरशः हजारो अधिकाऱ्यांना आणि पोलिसांना शोधून काढून ठेचून चेचून रस्त्यावर ठार केले असते. या उलट खटले भरलेल्या सुमारे दीड हजार अधिकाऱ्यांपैकी ४५० जणांना मृत्यूची शिक्षा झाली. परंतु ही बाब अमेरिकनांपुढे आलीच नाही आणि गैरसमज वाढत गेले.

दरम्यान राज्यकारभाराची परिस्थिती अशी निर्माण झाली होती, की कोणत्याही राजकीय अधिकारपदी नसतानाही सर्व सत्ता आपोआप फिडेलच्या हाती केंद्रित झाली होती. तेव्हा प्रधानमंत्री मिरो कार्डोना यास अशक्यच झाले तेव्हा त्याने १३ फेब्रुवारी रोजी राजीनामा दिला ती जागा कास्ट्रोने स्वीकारणे क्रमप्राप्तच

होते. त्याप्रमाणे १६ फेब्रुवारी रोजी फिडेल कास्ट्रो क्यूबाचा प्रधानमंत्री झाला. पुढील चौदा महिन्यातच त्याने हळूहळू सर्व सरकारची रचना आमूलाग्र बदलून टाकली आणि सर्व महत्त्वाच्या पदांवर सिएरा मेस्त्राच्या विश्वासू सहकाऱ्यांना एकेक करून बसविले. चे गव्हेरा, कॅमिको, शेनफुगोस, राऊल कास्ट्रो, जुआन अल्मैडा, आर्मांडो हार्ट, रामिदो वालदेस, फोस्तिनो पेरेझ, सेलिया सांचेझ वगैरे. एवढे प्रामाणिक ध्येयवेडे आणि संपत्तीविषयी घृणा असलेले राज्यकर्ते क्यूबाच्या इतिहासात प्रथमच सत्तेवर आले होते. याबाबतीत त्यांचे अमेरिकन शत्रू देखील त्यांना मानतात.

विजयानंतर लगेच नव्या सरकारला नवे कार्यक्रम हाती घ्यावे लागले. सिएरा मेस्त्रामधून वेगवेगळ्या भाषणांमधून, जाहीरनाम्यांमधून दिलेली आश्वासने पूर्ण करण्याची वेळ आली होती. या ध्येय वेड्या क्रांतिकारकांची उद्दिष्टे चांगली असली तरी त्यांना संघटना नव्हती आणि राज्यकारभाराचा अनुभव नव्हता. ठेचकाळात, चुका करीत आणि त्या दुरुस्त करीत पुढे जाण्याशिवाय मार्ग नव्हता.

अध्यक्ष रुटिया हा प्रामाणिक माणूस होता. प्रामाणिक आणि भोळा. राजकारणाची त्याला फारशी जाण नव्हती. अमेरिकन प्रभावाखाली असलेल्या त्या वेळच्या क्यूबन उच्चवर्गीयाप्रमाणेच जे काय करायचे ते चालू चौकटीत करायचे असे त्यांचे मत होते. क्रांतीची व्याप्ती आणि महत्त्व समजावून घेण्याची त्याची कुवत नव्हती. फिडेलच्या जहाल विचारामुळे हळूहळू तो त्याच्यापासून दूर जाऊ लागला. अमेरिकनांनी फिडेलविरुद्ध कम्युनिस्ट "बोगी" उठविली तेव्हा तोही बळी पडला. अखेर जुलै १९५९ मध्ये त्यालाही आपले पद खाली करावे लागले. त्याच्या जागी फिडेलने ओसवाल्डो नेर्टिकोज टोराडो यास अध्यक्ष नेमले.

क्रांतिकारकांसमोर कार्यक्रम होता तो साम्यवादाचा नव्हे तर समाजवादाचा, न्यायाचा, आर्थिक स्वातंत्र्याचा आणि उत्कर्षाचा, आर्थिक गुलामगिरी नष्ट करण्याचा, दारिद्र्य, बेकारी नष्ट करण्याचा आणि सर्वांना प्रगतीची समान संधी देण्याचा, ही सर्व असंदिग्ध उद्दिष्टे होती. समोर निश्चित मार्ग नव्हता. पण वाटेत येतील ती संकटे पार करून ती साध्य करण्याची जिद्द मात्र निश्चित होती. शेतीविषयक कोणत्याही सुधारणा करताना चांगल्या प्रस्थापित सरकारलाही मोठ्या विरोधामुळे जड जाते. क्यूबाच्या नुकत्याच स्थापन झालेल्या सरकारला तर ते आणखीच कठीण जाणार होते. विशेषत: क्यूबातील शेतीमध्ये आणि सबंध क्यूबन अर्थव्यवस्थेत जबरदस्त अमेरिकन हितसंबंध गुंतलेले असल्याने कोणत्याही आर्थिक सुधारणेला अमेरिकन भांडवलदारांचा आणि पर्यायाने अमेरिकन सरकारचा जोरदार विरोध होणार होता.

फिडेलचे विचार प्रथमपासूनच जहाल आणि डाव्या बाजूचे होते. त्यात सर्व

क्यूबनाप्रमाणे तोही पूर्ण अमेरिकन द्वेष्टा होता. त्यातल्या त्यात बाटीस्टाच्या राजवटीला निःशंक पाठिंबा देणारे अमेरिकन सरकार प्रथमपासून त्याच्या डाव्या विचारसरणीमुळे त्याच्याबद्दल संशयी होते. त्यात फिडेल कम्युनिस्ट असल्याच्या अमेरिकेत वावड्या उठत होत्या. फिडेल लोकप्रियतेच्या किती उंच शिखरावर चढलेला आहे हे अमेरिकन सरकार समजावूनच घेत नव्हते. उलट क्यूबामधून पळून आलेल्या मूठभर लोकांच्या गप्पावर विश्वास ठेवून फिडेल अंतर्गत प्रचंड विरोध असून लवकरच मोठे बंड होऊन फिडेल कोसळेल अशी स्वप्ने अमेरिकन सरकार पाहू लागले. फिडेलच्याविरुद्ध कट रचणाऱ्यांना गुप्तपणे मदत करू लागले. अमेरिकन आणि क्यूबा यांचे संबंध असे बिघडू लागले.

सिएरा मेस्त्राच्या सुरुवातीच्या काळात क्यूबन कम्युनिस्टांनी सव्वीस जुलै चळवळीला विरोध केला होता हे मागेच दिलेच आहे. पुढे कम्युनिस्टांनी दिशा बदलली आणि फिडेलशी जुळवून घेतले. सत्तेवर आल्यानंतर फिडेलला जेव्हा अनुभवी कार्यकर्त्यांची आणि कुशल संघटकांची गरज भासली तेव्हा आजूबाजूला कम्युनिस्टाशिवाय दुसरे कोणतेही प्रामाणिक कार्यकर्ते नव्हते. त्यामुळे फिडेलचे व कम्युनिस्टांचे सहकार्य वाढू लागले. ते वाढू लागले तसे अमेरिकेच्या डोळ्यात ते अधिकच खुपू लागले. फिडेल कम्युनिस्टांच्या हातची बाहुली बनत आहे असा प्रचार होऊ लागला आणि अमेरिकन किनाऱ्यापासून अवघ्या नव्वद मैलांवर एक कम्युनिस्ट राष्ट्र निर्माण होते की काय या भीतीने कम्युनिस्टांना अघोरी राक्षस समजणाऱ्या अमेरिकनांची झोप उडाली.

## अमेरिका अस्वस्थ झाली

अमेरिकन सी. आय. ए. झपाटयाने कामाला लागले. प्रतिक्रांतिकारक म्हणून ज्यांच्या शोधात फिडेलचे सरकार होते अशांना शस्त्रास्त्रांची मदत करणे, फिडेलविरुद्ध उठाव करण्याची इच्छा दर्शविणाऱ्या क्यूबनांना शस्त्रास्त्रे देऊन क्यूबन किनाऱ्यावर उतरविणे असले उद्योग सी. आय. ए. ने सुरू केले. परतु फिडेलने पुनर्रचना केलेली लोकसेवा या सर्व उचापतींना पुरून उरत होती. पण क्यूबात अमेरिकाविषयी तिरस्कार त्यामुळे अधिकच वाढत होता.

जून १९५९ मध्ये क्यूबन वायुदलाचा एक अधिकारी मेजर पेड्रो डायझ क्यूबाचा त्याग करून अमेरिकेत पळून गेला आणि क्यूबा कम्युनिस्ट बनत असल्याच्या प्रचाराला त्याने सुरुवात केली. सी. आय. ए. ला असा माणूस हवा होताच. सी. आय. ए च्या मदतीने त्याने एक विमान घेऊन ऑक्टोबरमध्ये हॅवानावर भराऱ्या मारून प्रचारपत्रके टाकली. विमानविरोधी तोफांनी त्याचे विमान पाडण्याचा निष्फळ प्रयत्न केला. त्याच्या विमानातून काही बॉम्ब् पडले आणि हॅवानातील दोन माणसे ठार होऊन कित्येक जखमी झाली. ती क्वचित विमानविरोधी तोफगोळयांच्या कवचांनीही जखमी झाली असतील, पण या प्रकरणाचे क्यूबात जोरदार

पडसाद उठले. अमेरिकाविरोधी भावना अधिकच चेतवल्या.

त्याच सुमारास क्रांतिकारकांपैकीच एक लष्करी अधिकारी मेजर दूबर्ट माटो हा फिडेलविरोधी एक कट रचीत असल्याचे लक्षात आले. त्याला अटक करून वीस वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली. हा धक्का ओसरतो न ओसरतो तोच फिडेलचा एक निकट सहकारी कॅमिलो शेनफुगोस हा एका विमानातून जात असता विमानासकट बेपत्ता झाला. विमानही सापडले नाही आणि त्याचे शरीरही सापडले नाही.

चे गव्हेराप्रमाणेच कॅमिलो हादेखील रोमँटिक क्रांतिकारकाचे जणू मूर्त प्रतीक होता. लोकांमध्ये तो खूपच लाडका झाला होता. सिएरा मेस्त्राच्या सहकाऱ्यांमधील फिडेलच्या आवडत्या साथीदारांपैकी तो होता. त्याच्या मृत्यूमुळे क्रांतिकारकांवर शोकाची दाट छाया पडली. फिडेललाही वाईट वाटले, पण मृत्यूच्या या रहस्यमय प्रकारामुळे फिडेलच्या शत्रूंना, विशेषतः अमेरिकन आश्रयाला गेलेल्या क्यूबनांना, त्याच्यावर आरोप करण्याची संधी मिळाली.

इकडे अमेरिकन विमानतळावरून छोटी छोटी विमाने येऊन क्यूबात अधूनमधून ठिकठिकाणी बाँबवर्षाव करू लागली. ज्या अर्थी अमेरिकेची सामर्थ्यवान संरक्षण व्यवस्था आणि रडार व्यवस्था ओलांडून ही विमाने क्यूबापर्यंत येऊ शकतात त्याअर्थी अशा कृत्यांना अमेरिकेचा पाठिंबा आहे याविषयी क्यूबनांना शंका उरली नाही. क्यूबाच्या मोठमोठ्या शहरांमधूनही गोळीबाराचे काही प्रकार घडले. अमेरिकन शस्त्रे त्यात गुंतली होती असे आढळून आले होते. त्यामुळे तर अमेरिकन सरकार क्यूबन राजवट उलथून पाडण्याच्या कोणत्याही प्रयत्नांना उघड पाठिंबा देत आहे हे उघड झाले.

क्यूबाच्या क्रांतीकारक सरकारने आर्थिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कसकशी पावले टाकली आणि अमेरिकन सरकारने काय काय केले याचे विस्तृत विवेचन करण्यापेक्षा संगतवार घटनांचे क्रम दिले तरी इतिहासाचा प्रवाह एकूण कोणत्या दिशेकडे वाहत होता हे लक्षात येईल :

## घटना अशा घडत गेल्या

जानेवारी १६, १९५९, : संयुक्त राष्ट्र संघटनेने क्यूबात बाटीस्टाच्या अधिकाऱ्यांवर भरलेल्या खटल्यांची तपासणी करावी अशी मागणी अमेरिकन काँग्रेसमध्ये करण्यात आली.

जानेवारी २८ : युद्धगुन्हेगार म्हणून क्यूबा सरकारने घोषित केलेला बाटीस्टाचा सहकारी जनरल रोलँगे मासफेरेर यास अमेरिकेत आश्रय देण्यात आला.

फेब्रुवारी २ : द्यूतगृहांविषयी क्रांतिकारी सरकारने नवीन नियम केले त्यानुसार फायद्याचा ६० टक्के भाग सरकारच्या समाजकल्याण कार्यक्रमासाठी दिला गेला.

फेब्रुवारी ५ : ओरियेन्ते प्रांतातून नव्या शेतीविषयक सुधारणांची घोषणा.

मार्च १ : बाटीस्टाला पाठिंबा देणाऱ्यांच्या जमिनी सरकारने ताब्यात घेण्याचा कायदा संमत झाला.

मार्च २ : सर्व देशातील विजेचे दर कमी करून ते हॅवानातील दराबरोबर आणण्यात आले.

मार्च ३ : सर्व घरांची भाडी पन्नास टक्क्याने कमी करण्यात आली. रिकाम्या प्लॉट्स्‌वर मालकांनी घरे तरी बांधावीत किंवा प्लॉट्स् विकावेत असा नियम.

मार्च ४ : अमेरिकन मालकीची क्यूबन टेलिफोन कंपनीचे राष्ट्रीयीकरण.

मार्च ८ : बाटीस्टाच्या सरकारात असणाऱ्या सर्व मंत्र्यांच्या आणि राजकारण्यांच्या जमिनी जप्त.

मे १ : राऊल कास्ट्रो सांगतो, मी किंवा चे गव्हेरा कम्युनिस्ट नाही. असतो तर घराच्या छपरावरून ओरडून सांगितले असते.

मे १७ : शेतीसुधारणा कायद्याची घोषणा.

साखर कारखानदार संघाचा या कायद्यावर प्रखर हल्ला. " गंभीर आर्थिक परिणाम होतील. " अशा इशारा.

मे २१ : कास्ट्रोचो कम्युनिस्टांवर प्रतिक्रांतिकारक म्हणून टीका.

मे २४ : कम्युनिस्टांची कास्ट्रोवर टीका. कम्युनिस्ट विरोधी असल्याबद्दल.

जून ३ क्यूबन शेतीविषयक कायद्याबद्दल अमेरिकन भांडवलदारांमध्ये चिंता आणि विरोध व निषेध.

जून ११ : शेतीसुधारणा कायद्याबद्दल अमेरिकन सरकारचा क्यूबन सरकारला खलिता. जमीन ताब्यात घेताना तिची योग्य किंमत तात्काळ मिळाली पाहिजे असा इशारा.

जून १६ : जमिनीच्या भरपाईबद्दलच्या अमेरिकन सरकारच्या सूचनेला क्यूबाचा नकार.

जुलै ४ : बाटीस्टाला अमेरिकेत आश्रय द्यावा अशी मागणी अमेरिकन सेनेटमध्ये. सेनेटच्या अंतर्गत सुरक्षा समितीत क्यूबातून पळून आलेल्या क्यूबन वायुदल अधिकारी डायझ याची साक्ष. क्यूबात तीव्र संताप.

जुलै १३ : डायझची साक्ष घेऊन अमेरिका क्यूबाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करीत असल्याचा कास्ट्रोचा आरोप.

जुलै १४ : क्यूबा कम्युनिस्टांच्या पूर्णपणे ताब्यात गेल्याचा एका महत्त्वाच्या अमेरिकन नौदल अधिकाऱ्याचा आरोप.

जुलै २७ : क्यूबा कम्युनिस्टांच्या ताब्यात जात असल्याबद्दल अमेरिकन सेनेटमध्ये इशारा.

ऑगस्ट १७ : अमेरिकेतून आलेल्या खाजगी विमानांचे क्यूबावर अनेक ठिकाणी बॉंबहल्ले.

सप्टेंबर ५ : क्यूबातील शेतीकायदा आणि अमेरिकन मालकीच्या क्यूबन इलेक्ट्रिक कंपनीत क्यूबन सरकारचा हस्तक्षेप यांच्या निषेधासाठी अमेरिकन राजदूताला मायदेशी बोलावणे.

ऑक्टोबर १७ : इंग्लंड क्यूबाला जेट विकणार या वातम्यांवर अमेरिकन सरकारचा निषेध.

ऑक्टोबर २१ : डायझ अमेरिकन विमानातून हॅवानावर पत्रके व क्यूबन आरोपानुरूप बॉम्ब् टाकतो.

ऑक्टोबर २७ : कास्ट्रोची बाँब हल्ल्याबद्दल अमेरिकेवर तीव्र टीका.

नोव्हेंबर २ : क्यूबन सरकार अमेरिकन मालकीच्या जमिनी ताब्यात घेते.

डिसेंबर २ : ब्रिटन आपण जेटस् विकणार नसल्याचे क्यूबाला कळविते.

डिसेंबर १० : आपापसातील समस्यांवर चर्चा करण्याचा प्रयत्न उधळून लावल्याचा अमेरिकेचा क्यूबावर आरोप.

जानेवारी २२, १९६० : क्यूबातील साखरेचा कोटा कमी करण्याबाबत अमेरिकेत सरकार कॉंग्रेसला परवानगी मागते.

फेब्रुवारी ५ : क्यूबा-सोव्हिएत रशिया आर्थिक देवघेवीचा करार.

फेब्रुवारी १९ : अमेरिकेतून आलेले शस्त्रास्त्रे व बॉम्ब् घेऊन चाललेले अमेरिकन विमान हॅवानाजवळ कोसळते.

फेब्रुवारी २१ : अमेरिकन खाजगी विमानातून हॅवानावर बाँबहल्ला.

फेब्रुवारी २६ : क्यूबाला लष्करी मदत न देण्याचा अमेरिकन संकल्प.

मार्च ४ : हॅवाना बंदरातील दारूगोळा भरलेल्या फ्रेंच जहाजाचा स्फोट ! अमेरिकन घातपाताचा संशय.

मार्च १७ : योग्य वेळी क्यूबन क्रांतिकारक सरकारविरुद्ध कारवाई करण्यासाठी क्यूबन निर्वासितांची सशस्त्र फौज उभारण्याच्या योजनेला अमेरिकन अध्यक्षांची गुप्त संमती.

मार्च २५ : क्रांतिकारक सरकारच्या मंत्रिमंडळातील सर्व मंत्री पगाराच्या दहा टक्के भाग देशाच्या औद्योगीकरणाच्या कार्यक्रमाला देण्याचे ठरवितात.

एप्रिल ११ : अमेरिकन सरकारचे क्यूबावर वातावरण तंग करीत असल्याचे आरोप.

एप्रिल १९ : अमेरिकेच्या गंटानामो तळावरील अधिकारी क्यूबातील प्रतिक्रांतिकारकांना मदत करीत असल्याचा-कास्ट्रोचा आरोप; अमेरिकेचा इन्कार.

एप्रिल २० : क्यूबातील ९० टक्के वृत्तपत्रे नियंत्रित असल्याचा अमेरिकन सरकारचा आरोप.

एप्रिल २३ : क्यूबावर आक्रमण करण्याचा अमेरिकेचा इरादा असल्याचा कास्ट्रोचा आरोप.

मे ४ : क्यूबा रशियन पंजाखाली गेल्याचा अमेरिकन आरोप.

मे, ७ : क्यूबा आणि सोव्हिएत रशिया यांच्यात अधिकृत राजनैतिक संबंधाची स्थापना.

मे १४ : क्यूबन पेट्रोल बोटीतून अमेरिकन पाणबुडीवर गोळीबार झाल्याचा आरोप.

मे २४ : रशियातून विकत आणलेले तेल क्यूबातील अमेरिकन मालकीच्या तेलशुद्धीकरण कारखान्यातून शुद्ध करून घेण्याचे क्यूबाचे प्रयत्न.

मे २८ : क्यूबाला दिली जाणारी सर्व तांत्रिक मदत रद्द करून तंत्रज्ञाना परत बोलाविण्याची अमेरिकेची घोषणा.

जून ४ : अमेरिकेची बदनामी करीत असल्याचे कास्ट्रोवर अधिकृत अमेरिकन आरोप.

जून ७ : अमेरिकन ऑईल कंपन्या रशियन तेल स्वीकारण्यास नकार देतात.

जून १६ : अमेरिका आक्रमणाची तयारी करीत असल्याचे क्यूबन आरोप, अमेरिकन नकार.

—अमेरिकन दूतावासातील दोघांची हकालपट्टी. (हे दोघेजण एफ्. बी. आय. चे एजंट असल्याचे अमेरिकन सरकारने पुढे कबूल केले.)

जून १८ : क्यूबन दूतावासातील दोघांची अमेरिकेतून हकालपट्टी.

जून २६ : हॅवानातील दारूगोळा कोठारात प्रचंड स्फोट. घातपात संशय.

जून २९ ते जुलै, ६ : अमेरिकन तेल कंपन्यांचे क्यूबात राष्ट्रीयीकरण.

जुलै ६ : अमेरिकेची क्यूबाच्या साखरेच्या कोटयात कपात.

जुलै ७ : कपात म्हणजे आर्थिक आक्रमण असा कास्ट्रोचा आरोप.

जुलै १६ : क्यूबन राष्ट्रीयीकरण कायद्याविषयी अमेरिका अधिकृत निषेध करते.

जुलै २१ : क्यूबातील तीन अमेरिकन साखर कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण.

ऑगस्ट ११ : क्यूबा आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीच्या ताब्यात जात असेल तर अमेरिकेने काहीतरी केलेच पाहिजे, असे अमेरिकन अध्यक्ष आयसेनहॉवर यांचे निवेदन.

सप्टेंबर १ : तीन अमेरिकन रबर कंपन्यांचे क्यूबात राष्ट्रीयीकरण.

सप्टेंबर १७ : तीन अमेरिकन बँकांचे क्यूबात राष्ट्रीयीकरण.

सप्टेंबर २९ : क्यूबन सरकार कम्युनिस्ट चीनला मान्यता देते.

—क्यूबातील अमेरिकनांनी आपापली कुटुंबे मायदेशी पाठवावी, असा अमेरिकन सरकारचा सल्ला.

ऑक्टोबर ६ : अमेरिकन मदतीने २७ प्रतीक्रांतिकारकांचा बोटीने ओरियेन्ते प्रांतात सशस्त्र उतरण्याचा प्रयत्न. त्यात दोन अमेरिकन्स.

ऑक्टोबर १३ : क्यूबात सर्वंकष राष्ट्रीयीकरण.

ऑक्टोबर १९ : क्यूबाची आर्थिक नाकेबंदी जाहीर. क्यूबन 'स्वातंत्र्ययोद्ध्यां'नी कास्ट्रोला उलथून पाडावे असे अमेरिकन आवाहन.

ऑक्टोबर २४ : सर्व अमेरिकन कंपन्यांचे क्यूबात राष्ट्रीयीकरण.

डिसेंबर २१ : क्यूबा व सोव्हिएत रशिया यांच्यात नवा व्यापारी करार. रशियाची क्यूबात शंभर कारखाने उभारून देण्याची तयारी.

जानेवारी २, १९६१ : अमेरिकेवर पुन्हा आक्रमणाची तयारी करीत असल्याचा आरोप. क्यूबात आणीबाणी. अमेरिकन दूतावासातील नोकरवर्ग कमी करावा अशी कास्ट्रोची मागणी.

जानेवारी ३ : अमेरिका क्यूबाशी राजनैतिक संबंध तोडते.

जानेवारी २१ : क्यूबातील आणीबाणी समाप्त. अमेरिकेशी नव्याने मैत्री स्थापण्याचा कास्ट्रोचा मनोदय.

फेब्रुवारी १२ : सी. आय. ए. आणि अमेरिकन स्टेट डिपार्टमेंट यांनी कास्ट्रोला सत्ता मिळू न देता कास्ट्रोविरोधी सरकार १९५८ च्या शेवटास स्थापन करण्याचे प्रयत्न केल्याचे अमेरिकेत जाहीर होते.

मार्च १९ : अमेरिकन आक्रमणाच्या धोक्याबद्दल संयुक्त राष्ट्रसंघात चर्चा करण्याची क्यूबाची मागणी.

एप्रिल ३ : अमेरिकन स्टेट डिपार्टमेंट क्यूबाप्रकरणी एक विस्तृत निवेदन करते.

एप्रिल ५ : ग्वाटेमाला आणि फ्लोरिडातून अमेरिका प्रतिक्रांतिकारकांना आक्रमणासाठी पाठविण्याची तयारी करीत असल्याचे क्यूबाचे आरोप.

एप्रिल ११ : क्यूबावरील आक्रमणाला मदत करावी वा न करावी याबद्दल अमेरिकन सरकारात चर्चा चालू असल्याच्या अमेरिकन वृत्तपत्रात बातम्या.

एप्रिल १७ : क्यूबात कोणत्याही तऱ्हेचा हस्तक्षेप करीत असल्याचा अमेरिकेचा नकार. त्याच दिवशी अमेरिकन सी. आय. ए. ने तयार केलेली क्यूबन निर्वासितांची प्रचंड फौज अमेरिकेतून येऊन आक्रमणाच्या इराद्याने क्यूबन किनाऱ्यावर उतरते.

वर जी घटनांची क्रमवार यादी दिली आहे ती अमेरिकन पुस्तकामधूनच घेतलेली आहे. क्यूबाला आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होऊ देणे हे अमेरिकन भांडवलदारांच्या हिताचे नव्हते. त्यामुळे फिडेलच्या क्रांतीकारी सरकारवर अमेरिकेची नाराजी असणे स्वाभाविक होते. फिडेल कास्ट्रोला कम्युनिस्ट ठरवून त्याला खुद्द क्यूबातच बदनाम करणे, दरम्यान क्यूबावर आर्थिक दडपणे आणणे, क्यूबातून पळून आलेल्या नाराज निर्वासितांना चेतवून क्यूबावरील आक्रमणासाठी त्यांची जय्यत फौज तयार करणे आणि त्याचवेळी क्यूबाविरुद्ध कट रचीत असल्याच्या आरोपाचा इन्कार करणे असा अमेरिकन धोरणाचा दुटप्पीपणा या घटनांवरून स्पष्ट होतो. अमेरिकेच्या गैरसमजुतींवर आधारलेल्या भडकू धोरणामुळेच फिडेल कास्ट्रोला आपली क्रांती अधिक जहाल करावी लागली आणि रशियाची मदत मागावी

लागली असे अनेक स्पष्टवक्त्या अमेरिकनांनी सांगितले आहे. सतरा एप्रिल १९६१ पूर्वी सी. आय. ए. च्या पाठिंब्याने बारीक सारीक उठावाचे प्रयत्न अनेक झाले होतेच. पण सतरा एप्रिलचा प्रकार म्हणजे मोठ्या प्रमाणावरील आक्रमणच होते. या आक्रमणाची वासलात फिडेल कास्ट्रोच्या क्यूबाने कशी लावली हे बघायलाच हवे.

सोळा एप्रिलची रात्र अगदी गडद अंधारी होती. आकाशात चंद्र नव्हता आणि मध्य क्यूबाच्या दक्षिण किनाऱ्यावरील "बे ऑफ पिग्ज" या लहानशा उपसागरातील एका बारीक खाडीत एक छोटीशी बोट त्या अंधारातच किनाऱ्याच्या दिशेने पुढे सरकत होती. अचानक ती होडी एका खडकावर आपटली. या भागात किनाऱ्याजवळ खडक आहेत. याची त्या होडीतील पाच जणांना कल्पना देण्यात आली नव्हती. अखेर त्यांनी होडीचे एंजिन बंद केले आणि वल्हयांच्या सहाय्याने खडकातून मार्ग काढण्यास सुरुवात केली.

एवढ्यात किनाऱ्यावरील रस्त्याने जाणारी एक जीप गर्रकन वळली. तिच्या दिव्यांच्या प्रकाशात ती होडी एकदम उजळून निघाली. त्या पाचही जणांनी लगोलग पाण्यात झेप घेतली. पाणी उथळच होते. दुसऱ्याच क्षणी त्यांनी किनाऱ्यावरील त्या जीपवर आपल्या हातातील बंदुकीतून गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. जीपमधल्या एका क्यूबनाचा मुडदा पडला. पण या गोळागोळीने आजूबाजूच्या वस्तीला जाग आली होती. अखेर ती पाच माणसे कशीबशी किनाऱ्यावर पोचली आणि त्यांनी मागून येणाऱ्या मोठ्या बोटींना संदेश देण्यास सुरुवात केली. इतक्यात जमिनीवरून त्यांच्यावर गोळीबार सुरू झाला. थोड्याच वेळात त्या किनाऱ्यावर एका मोठ्या लढाईला तोंड लागले.

## केनेडींचा ग्रीन सिग्नल

लढाईची अगदी तपशीलवार योजना सी. आय. ए. ने तयार केली होती. पेंटॅगॉनने तिला संमती दिली होती आणि खूप विचार करून अध्यक्ष केनेडी यांनी हिरवा दिवा दिला होता. अमेरिकेतील सुमारे चौदाशे क्यूबनांना त्यासाठी खडतर शिक्षण दिले गेले होते. शस्त्रे पुरविली गेली होती. बोटी आणि विमाने व शस्त्रास्त्रे दिली गेली होती. लढाईच्या सुरुवातीच्या काळात अमेरिकन लष्कराने मुळीहो भाग घ्यायचा नाही अशी सक्त ताकीद अध्यक्ष केनेडींनी दिली. क्यूबन प्रतिक्रांतीकारकांची फौज किनाऱ्यावर उतरल्यावर त्यांनी क्यूबाचे तात्पुरते सरकार स्थापन केल्याचे जाहीर करायचे आणि अमेरिकेची मदत मागायची व अमेरिकेने ताबडतोब त्या सरकारला मान्यता देऊन लढाईत भाग घ्यायचा अशी योजना होती.

सी. आय. ए. च्या आणि पेंटॅगॉनच्या फिडेल कास्ट्रोविषयी फार चुकीच्या कल्पना होत्या. फिडेलच्या कम्युनिस्ट धार्जिण्या विचारसरणीमुळे त्या राजवटीला क्यूबात प्रचंड विरोध असून एक धक्का मारण्याचा अवकाश की त्याचे सरकार कोसळून पडेल असा गोड गैरसमज सी. आय. ए. ने करून घेतला होता. त्यामुळेच

साऱ्या योजना फसल्या आणि या प्रकरणात अमेरिकेची पुरेपूर नाचक्की झाली.

या योजनेत अमेरिकनांचे पहिलेच पाऊल चुकले. आक्रमणाच्या दोन दिवस आधी हॅवानाच्या लष्करी विमानतळावर हल्ला करून क्यूबाचे सर्व हवाई सामर्थ्य नष्ट करून टाकायचे असा इरादा होता. त्याप्रमाणे चार विमानांनी हॅवानावर बाँब हल्ला करण्याचा प्रयत्न केला. अमेरिकनांनी भाग घेतलेला नाही असे दाखविण्यासाठी जुनी विमाने वापरली गेली आणि क्यूबन सरकारने संयुक्त राष्ट्रसंघात आरडाओरडा सुरू करताच फुटीर क्यूबन वैमानिकांनीच हे बाँब हल्ले केले असा प्रचार अमेरिकेने सुरू केला आणि त्यामध्ये अमेरिकेचा मुळीच हात नाही असे पुन्हा पुन्हा सांगितले गेले, यावर अर्थातच कुणाचाच विश्वास बसला नाही.

विमान हल्ल्याचे उद्दिष्ट साध्य झाले नाहीच. कास्ट्रोची काही दोन-चार विमाने नष्ट झाली. बाकीची इतर ठिकाणी विखरून ठेवली होती. जेव्हा बे ऑफ पिग्जच्या लढाईला तोंड लागले तेव्हा या विमानांनी धुमाकूळ घालून आक्रमकांचे कंबरडेच मोडून टाकले.

बोटीमधून आक्रमक किनाऱ्यावर उतरत असतानाच थोडे आत सुमारे दीडशे हवाई सैनिक उतरविले गेले. परंतु आक्रमक केवळ काही मैल आत येण्याच्या आधीच फिडेल कास्ट्रोच्या ग्रामीण सेनांनी त्यांच्यावर हल्ले करायला सुरुवात केली. थोडयाच वेळात हॅवानाहून ताजी लष्कराची कुमक आली. रणगाडे आले. फिडेलच्या विमानांनी आक्रमकांच्या मोर्च्यांवर आणि बोटींवर बाँब वर्षाव करायला सुरुवात केली.

आक्रमकांजवळ १६ अमेरिकन विमाने होती. पण अमेरिकेशी संबंध नको म्हणून साडेसातशे मैलावरील निकारागुआ देशातील एका विमानतळावरून ही विमाने येत होती. या लांब अंतरामुळे विमानांना बाँब वर्षाव करण्यास अवघ्या चाळीस मिनिटांचा अवधी मिळे. त्यामुळे या विमानांचा प्रभावी उपयोग झाला नाही. दरम्यान कास्ट्रोच्या विमानांनी आक्रमकांसाठी शस्त्रास्त्रे आणि तेल घेऊन येणारे एक जहाज बुडवून टाकले.

आक्रमकांजवळचा दारूगोळा संपत आला होता. वायुदलाची मदत संपली होती. एक-दोन गावे घेऊन तात्पुरते सरकार स्थापन केल्याची घोषणा करण्याचे तर दूरच राहिले. आता त्यांना गरज होती प्रत्यक्ष अमेरिकन लष्करी मदतीची. आतापर्यंत फक्त अमेरिकन सल्लागार आणि वैमानिक तेवढे त्यांना मदत करीत होते. अठरा एप्रिलला दुपारी बे ऑफ पिग्ज्पासून जवळच अमेरिकेची एक प्रचंड विमानवाहू लढाऊ नौका समुद्रात दाखल झाली. आक्रमकांना मदत करणारे अमेरिकन वैमानिक त्या जहाजाला संदेश देऊ लागले, " मे–डे–मे-डे-धोका–धोका, आम्ही अमेरिकन्स् आहोत मदत करा. " जहाजावरून संदेश गेला. "सॉरी, युद्धात भाग घेण्याचे आम्हाला हुकूम नाहीत. "

इकडे जमिनीवरील लढाई अंगाशी येत आहे असे पाहताच आक्रमकांचा सेनानी पेपे रोमन याने आपल्या अमेरिकन सल्लागारांना रेडिओवरून वारंवार इशारे धाडले "मदत धाडा, लष्कर धाडा, नाहीतर माघार घ्यावी लागेल." पलीकडून उत्तर आले, 'सॉरी, तुम्ही चांगले लढलात; शाबास. आता लढाई थांबवा आणि चारी दिशांनी फुटा. गुड लक. पुन्हा संदेश धाडू नका.'

पेपे रेडिओ-मायक्रोफोनमध्ये गरजला, 'डुकरांनो, आम्हाला तुमची शाबासकी नको, तुमची विमाने धाडा.'

पण रेडिओ बंद पडला होता.

एप्रिल १९ ला लढाई संपली तेव्हा कास्ट्रोच्या सैनिकांच्या हाती मोजून १,११३ आक्रमक कैदी सापडले होते.

थोड्याच वेळात फिडेलने क्यूबन रेडिओ आणि टेलीव्हीजनवर घोषणा केली,

"आक्रमकांचा धुव्वा उडाला आहे. क्रांती पुन्हा विजयी झाली आहे. अमेरिकेच्या साम्राज्यशाही सरकारने शिकवून शस्त्रसज्ज केलेल्या आक्रमकांचा अवघ्या बहात्तर तासात निःपात झाला आहे."

## महागात गेलेले प्रकरण

बे ऑफ पिग्ज् प्रकरणी अमेरिकेची सगळ्या जगभर नाचक्की झाली ती अमेरिकन प्रतिनिधी खोटे बोलले म्हणून नव्हे, तर अमेरिकन योजना फसली म्हणून. कास्ट्रोचा पराभव झाला असता आणि आपल्या मताचे सरकार क्यूबात प्रस्थापित करण्यात अमेरिका यशस्वी झाले असते, तर सगळे खोटे बोलणे पचून गेले असते. परंतु गैरसमजुतीच्या आणि चुकीच्या माहितीच्या आधारावर विसंबून अमेरिका क्यूबात गुंतून गेली. एकूण प्रचार असा होता की क्यूबा कम्युनिस्टांच्या ताब्यात चालले आहे. वेळीच तेथील सरकार उलथून पाडले नाही, तर सबंध अमेरिकेला धोका उत्पन्न होईल. आणि फिडेल कास्ट्रोला खाली खेचणे अगदी सोपे आहे. कारण बहुसंख्य जनतेचा त्याला मुळीच पाठिंबा नाही. ही समजूत किती चुकीची होती हे बे ऑफ पिग्ज् मध्ये सिद्ध झाले. तेव्हा क्यूबन्स लढले ते कम्युनिस्ट म्हणून नव्हे, किंवा आंतरराष्ट्रीय साम्यवादाच्या संरक्षणासाठी म्हणूनही नव्हे, तर स्वातंत्र्य आणि सन्मान यासाठी. हीच चूक पुढे अमेरिकेने व्हिएतनाममध्ये केली आणि तिथे अमेरिका अधिकाधिक गुंतत गेले.

बे ऑफ पिग्जच्या अपयशाबद्दल अध्यक्ष केनेडींना आंतरराष्ट्रीय टीकेबरोबरच घरच्या टीकेलाही तोंड द्यावे लागले. आक्रमकांना पुरेशी मदत दिली नाही आणि आक्रमकांचा पराभव होतो आहे असे पाहताच अमेरिकनांनी पळ काढला अशी ही टीका होती. अमेरिकेतील आश्रयार्थी क्यूबन्स तर ऐनवेळी दगा दिला म्हणून अमेरिकन सरकारवर कडू जहर ओकीत होते.

खरे म्हणजे अशा तऱ्हेच्या आक्रमणाची योजना अध्यक्ष आयसेन हॉवरच्या

काळात संमत झालेली. आक्रमक फौजेचे प्रशिक्षणही त्याच काळात सुरू झालेले. केनेडी अध्यक्षपदी आल्यावर अवघ्या तीन महिन्यात हा प्रसंग घडला. पण तरीही केनेडींनी या अपयशाची जबाबदारी स्वत:च स्वीकारली.

कास्ट्रोच्या हाती १,११३ कैदी सापडले होते. ते सोडवून घेण्याची जबाबदारी केनेडींनी स्वीकारली. फिडेल हे कैदी सहजासहजी जाऊ देणार नव्हता. खूप चर्चा झाल्या, बोलणी झाली. फिसकटली. अखेर पावणेदोन वर्षानंतर अमेरिकनांकडून भरमसाठ दंड उकळून कैद्यांना परत केले गेले. प्रत्येक कैद्याच्या बदल्यात क्यूबाला सुमारे १७ हजार पौंडस म्हणजे सुमारे साडेतीन लाख रुपये एवढी भरपाई कास्ट्रोने मिळविली.

बे ऑफ पिग्ज प्रकरण एवढ्यावर संपले पण त्याचे परिणाम पुढे होणार होतेच. क्यूबातील क्रांतीकारी राजवट उलथून पाडण्यास अमेरिका किती अधीर झाले आहे हे स्पष्ट झाले आणि हे साध्य करण्यासाठी अमेरिकन सरकार वाटेल तो मार्ग पत्करेल याची क्यूबनांना खात्री पटली आणि या गोष्टीची स्वाभाविक प्रतिक्रिया झाली. स्वसंरक्षणासाठी जास्तीत जास्त शस्त्रास्त्रे जमविण्यास फिडेल कास्ट्रोने सुरुवात केली आणि थोड्याच दिवसात क्यूबा म्हणजे रशियन अण्वस्त्रांचे एक प्रचंड कोठार बनले. आणि त्यातूनच १९६२ चा जागतिक आणीबाणीचा प्रसंग उद्‌भवला. ◻

"बे ऑफ पिग्ज्" च्या प्रकरणात कास्ट्रोने अमेरिकेला धडा शिकविला. त्याचप्रमाणे तो स्वत:ही चांगलाच धडा शिकला. अमेरिकेच्या संभाव्य आक्रमणापासून क्यूबाचे संरक्षण करण्यासाठी कोणतीही कसूर करायची नाही असे क्यूबन सरकारने मनोमन ठरवून टाकले. अमेरिकेकडून शस्त्रास्त्रे मिळविणे तर आता शक्यच नव्हते. अमेरिकेच्या धाकाने ब्रिटन आणि फ्रान्ससारखी राष्ट्रेही क्यूबाला शस्त्रास्त्रे पुरविण्यास घाबरत होती. शस्त्रे मिळविल्याशिवाय जगणे तर शक्यच नव्हते. अमेरिकेने आर्थिक नाकेबंदी तर आधीच घातली होती. अमेरिकेने केलेल्या या लष्करी व आर्थिक कोंडीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग आता क्यूबाला शिल्लक उरला होता. तो म्हणजे रशियाच्या मैत्रीचा.

लष्करी दृष्ट्या आणि व्यापारी दृष्ट्या अमेरिकेला क्यूबा हे अत्यंत महत्त्वाचे बेट वाटत होते यात शंका नाही. अमेरिकन लष्करी दृष्टीकोनातून क्यूबन द्वीपकल्पावर मित्रराष्ट्राचाच अंमल असणे आवश्यक होते. क्यूबाच्या दक्षिण किनाऱ्यावर ग्वंटानामो येथे या शतकाच्या सुरुवातीपासून अमेरिकेने आपला नाविक तळ ठेवला आहे तो यामुळेच. अमेरिकेत एकंदर प्रचाराची जी आघाडी उघडली होती त्यावरून

अमेरिकन सरकार आपल्याला सुखासुखी जगू देणार नाही हे क्यूबन क्रांतिकारकांना स्पष्ट दिसत होते.

जीवनमरणाच्या या मूलभूत प्रश्नाशिवाय आणखी काही महत्त्वाच्या समस्या फिडेल आणि त्याच्या क्रांतिकारक साथीदारांपुढे उभ्या होत्या. स्वत: फिडेल, चे गव्हेरा, राऊल कास्ट्रो आणि त्यांचे अनेक साथीदार हे अत्यंत जहाल आणि टोकाच्या डाव्या विचारसरणीचे होते. आपल्याला अभिप्रेत असलेली सामाजिक आणि आर्थिक क्रांती क्यूबन लोकशाहीच्या चौकटीत होऊ शकेल की नाही हा त्यांना भेडसावणारा महत्त्वाचा प्रश्न. स्पेनच्या साम्राज्यात नांदलेल्या क्यूबनांना लोकशाहीचा फारसा चांगला अनुभव नव्हता. क्यूबामध्ये लोकशाहीचा अविष्कार मचाडो आणि प्रोयो यांच्या भ्रष्ट हुकूमशाहीत झाला होता. त्यामुळे लोकशाही अत्यंत बदनाम झालेली. अशी भ्रष्ट लोकशाही क्रांतीला अपायकारकच ठरली असती आणि ध्येयहीन हुकूमशाही हीदेखील क्रांती पुढे रेटू शकणार नाही याची खात्री होती.

## एकच तोडगा

आणि इतरही अनेक प्रश्न होते. संघटनेचे, शिस्तीचे, कार्यकर्त्यांच्या उपलब्धतेचे. या सर्व प्रश्नावर फिडेल कास्ट्रोला एकच तोडगा दिसत होता. क्यूबामधील कम्युनिस्टांचा संपूर्ण पाठिंबा मिळवायचा, म्हणजे त्यांची संघटना क्रांतीसाठी राबविता येईल आणि रशियाशी पक्की मैत्री जोडून शस्त्रास्त्रे संपादन करायची आणि अमेरिकेच्या संभाव्य आक्रमणाला प्रभावीपणे तोंड देण्याची तयारी करून ठेवायची.

आपल्या क्रांतीचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून फिडेलला रशियाचा पाठिंबा मिळवायचा होता. कुठल्याही आंतरराष्ट्रीय वादाच्या दावणीला आपली क्रांती बांधून घेणे तर त्याला मुळीच पसंत नव्हते. क्यूबन क्रांतीचे स्वतंत्र, जहाल आणि बंडखोर व्यक्तिमत्त्व गमाविणे शक्य नव्हते.

मागेच सांगितल्याप्रमाणे स्वत: फिडेल किंवा त्याचे सहकारी कोणीही कम्युनिस्ट पक्षाच्या कर्मठ शिस्तीत बसण्यासारखे नव्हते. ते स्वत: कम्युनिस्ट नव्हते याचा अर्थ कम्युनिस्ट द्वेष्टे होते असाही नव्हे. त्याचबरोबर क्यूबन कम्युनिस्टांनाही कास्ट्रो आणि त्याच्या सहकाऱ्यांविषयी फारसे प्रेम होते असेही नव्हे, कम्युनिस्टांचा राजकीय भाविकपणा, विचारांची बंदिस्ती आणि संघटनात्मक शिस्त आणि फिडेलच्या कार्यकर्त्यांची बेशिस्त व वैचारिक अराजक यात महदंतर होते. त्याचप्रमाणे कम्युनिस्टांकरवी धडे घेण्याएवढा कास्ट्रोही दूधखुळा नव्हता. दोघांचेही संबंध व्यवहारी पातळीवर होते. कास्ट्रोला त्यांची संघटना वापरायची होती, पण त्यांना फार शक्तीमान होऊ द्यायचे नव्हते. तर कम्युनिस्टांना राज्यकारभारात घुसून सत्ता काबीज करायची होती.

## कम्युनिस्टांची त्यावेळची परिस्थिती

या वेळी संपूर्ण लॅटिन अमेरिकन कम्युनिस्ट चळवळीत एक प्रकारची मरगळ आली होती. या खंडातल्या देशांतील कम्युनिस्ट पक्षांचा उदय साधारणत: १९३० च्या आसपासचा. हे सर्व पक्ष रशियन कम्युनिस्ट पक्षाशी एकनिष्ठ. म्हणजे पर्यायाने रशियन धोरणे पुढे रेटणारे, कुणाच्याही धोरणाची पर्वा न करता क्रांतीची मशाल हाती घेऊन दक्षिण अमेरिकन रान पेटविण्याची धमक एकाही कम्युनिस्ट पक्षाने दाखविली नव्हती. रशियाशी एकनिष्ठ असल्याने रशियन कम्युनिस्टांचे हितसंबंध राखणे व त्यांच्या हुकुमानुसार चालणे हे त्यांचे प्रमुख कर्तव्य. त्यामुळे स्थानिक राजकारणाचा सखोल अभ्यास न करता मॉस्कोहून हुकूम आल्यावर प्रखर आक्रमक पवित्रा घेऊन सर्व पक्षांशी संबंध तोडणे आणि दुसरा हुकूम येताच तावतोब पवित्रा बदलून काल गद्दार ठविलेल्यांच्या गळ्यात गळा घालणे अशी केविलवाणी नाटके सर्व दक्षिण अमेरिकेतील कम्युनिस्ट पक्षांना करावी लागत. त्यामुळे हे पक्ष कधीच लोकप्रिय झाले नाहीत. राजकीय वजन कमावून राजकीय सौदेबाजीत भाग घेणे एवढीच त्यांची भूमिका राहिली. आक्रमक क्रांतीचा पवित्रा घेऊन सत्ता काबीज करण्याकडे या पक्षांचा कलच उरला नाही. या प्रवृत्तीमध्ये भर घालणारी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे उत्तर अमेरिकेचा प्रखर कम्युनिस्ट विरोध. समजा एखाद्या दक्षिण अमेरिकन देशात कम्युनिस्ट क्रांती झाली तर त्या देशाला उत्तर अमेरिकेचे शत्रुत्व ओढवून घ्यावे लागणार हे उघड होते. मित्रत्वाने मदत करणारा सोव्हिएत रशिया त्यामानाने खूप दूर आहे, हेही मानसिक दडपण होतेच.

तेव्हा अशा दडपणाखाली वाढलेल्या या कम्युनिस्ट पक्षांतील पुढाऱ्यात खऱ्या क्रांतीविषयी पूर्ण उदासीनता, संधीसाधूपणा आणि सुखासीनता निर्माण न झाली तरच नवल. माफक कडवेपणा धारण करायचा आणि माफक राजकीय वजन मिळवून सुखात आयुष्य काढायचे अशी वृत्ती निर्माण झाली.

याचा परिणाम असा झाला की, डाव्या विचारसरणीचे कडव्या विचारांचे जहाल तरुण कम्युनिस्ट पक्षापासून दूर गेले. आपले वेगळे क्रांतिकारक गट अथवा पक्ष स्थापू लागले. कम्युनिस्ट शिस्तीचा वारसा न लाभल्याने या क्रांतिकारक गटात वैचारिक अराजक होते पण कडवेपणा होता. दक्षिण अमेरिकेतील अनेक देशात पुन्हा पुन्हा होणाऱ्या अयशस्वी सशस्त्र उठावामागे असेच कडवे गट होते.

फिडेलचा क्रांतिकारकांचा गट मात्र क्यूबात सशस्त्र क्रांती घडवून आणण्यात यशस्वी झाला होता. सबंध लॅटिन अमेरिकेत त्याचे निश्चित पडसाद उमटत होते.

क्रांतीपूर्व काळात या क्रांतिकारकांचे साम्यवाद्यांशी चांगले संबंध नव्हते. पण वैचारिक दृष्ट्या इतर कोणत्याही पक्षापेक्षा कम्युनिस्ट पक्षाशीच त्यांचे नाते जवळचे होते हे उघड होते. सिएरा मेस्त्राच्या शेवटच्या काळात कार्लो राफाएल रौड्रिग्जसारखे काही तरुण साम्यवादी नेते फिडेल कास्ट्रो आणि चे गव्हेरा यांच्या

व्यक्तिमत्त्वाने भारावून गनिमी सैन्यात सामील झाले होते. त्यामुळे सत्तेवर येताच कम्युनिस्ट पक्षाचा आणि संघटनेचा पाठिंबा कास्ट्रोला लाभला होता. कम्युनिस्ट पक्षातील बरेच नेते कास्ट्रोच्या सरकारात जबाबदाऱ्यांच्या जागावर कामे करीत होते. आणि कम्युनिस्ट पक्ष हळू हळू आपले जाळे पसरवीत होता.

फिडेल कास्ट्रोला मार्क्सिस्ट लेनीनीस्ट विचार जवळचे वाटू लागले होते खरे. पण कम्युनिस्ट पक्षाने सत्ता काबीज करून मॉस्कोच्या तालावर क्यूबाचा कारभार चालविणे त्याला पसंत नव्हते. मॉस्कोचा लष्करी पाठिंबा तर हवा होताच पण त्याचबरोबर क्यूबाची सत्ता स्वतःच्या सिएरा मेस्त्रा सहकाऱ्यांच्याच हाती कायम ठेवायची होती. त्यासाठी त्याने एक विलक्षण पवित्रा घेतला. कम्युनिस्ट जगतात अशी घटना कधी घडली नव्हती.

क्रांतीच्या विजयानतर कास्ट्रोच्या विचारांमधील जहालपणा अधिकाधिक स्पष्ट होऊ लागला. तसतसा तो कम्युनिस्टांच्या आहारी जात असल्याचे अमेरिकेत आरोप होऊ लागले. परिस्थिती उलट होती. क्यूबन कम्युनिस्ट कास्ट्रोच्या आहारी जात होते आणि कास्ट्रोच कम्युनिस्टांचा वापर करीत होता. १६ एप्रिल १९६१ रोजी, म्हणजे बे ऑफ पिग्ज् च्या आक्रमणाच्या आदले दिवशी, क्यूबन क्रांती ही समाजवादी क्रांती आहे असे त्याने घोषित केले. क्रांतिच्या विजयानंतर तब्बल दीड वर्षाने, म्हणजे मे १९६० मध्ये क्यूबा आणि सोव्हिएत रशिया यांच्यात राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. तोवर या दोन सरकारांचा काहीही संबंध नव्हता. क्यूबाचा प्रखर अमेरिका विरोध रशियनांना मैत्री ठेवायला पुरेसा होता.

परंतु साध्या मैत्रीने फिडेल कास्ट्रोचे समाधान होणार नव्हते. अमेरिकेने आक्रमण केले तर रशिया, सर्व धोके पत्करून आपल्याला पूर्णपणे सहाय्य करेल अशी परिस्थिती त्याला निर्माण करायची होती. रशियाच्या शस्त्रास्त्र पुरवठ्याने केवळ ही गोष्ट साध्य होणार नव्हती. संभाव्य युद्धात आपल्या बाजूने रशियाला पूर्णपणे ओढण्यासाठी रशियनांच्या कंपूत जाणेच आवश्यक होते.

## महत्वपूर्ण निर्णय

हे ओळखून फिडेलने निर्णय घेतला. १९६१ साली त्याच्या भाषणांवरून हे स्पष्ट होऊ लागले की तो कम्युनिस्ट विचार प्रणालीकडे उघड उघड झुकत आहे. क्रांतिविषयक स्वतःच्या कल्पना वास्तवात उतरविताना आपण अपरिहार्यपणे साम्यवादी तत्त्वांचा वापर करीत असल्याचे त्याच्या लक्षात आले. क्यूबासारख्या लहानशा देशात सर्व सत्ता हाती असताना बंदिस्त राजवटीचे आकर्षण वाटणे साहजिकच होते. सैल आणि लवचिक लोकशाही नंतर सोयीनुसार प्रस्थापित करता येईल असे त्याला वाटत होते.

अखेर १ डिसेंबर १९६१ रोजी टेलिव्हिजनवरील भाषणात फिडेल कास्ट्रोने जाहीर केले, 'मी मार्क्सिस्ट लेनीनीस्ट आहे, आणि मरेपर्यंत तसाच राहीन.'

कास्ट्रोवर कम्युनिस्टांनी पूर्ण ताबा मिळविल्याच्या बातम्या अमेरिकेत पसरल्या.. त्याने क्रांतीला दगा दिल्याचेही आरोप होऊ लागले. पण त्याच्या या भाषणाने क्यूबन कम्युनिस्टांना आणि मॉस्कोला मात्र चांगलाच धक्का बसला. त्यांच्या हिशेबी कास्ट्रो किंवा त्याचे बंडखोर साथीदार हे कम्युनिस्ट होऊच शकत नव्हते. ते सारे जहाल मतवादी बूर्ज्वा होते. कास्ट्रो जो साम्यवाद आणू बघत होता तो रशिया आणि चीन यांनी स्वप्नातही पाहिला नव्हता. फिडेलचा 'मार्क्सिझम लेनीनीझम' हा खऱ्या अर्थाने 'फिडेलीझम' आहे हे कम्युनिस्टांना आणि अमेरिकेला कळायला खूप वेळ लागला.

क्रांतीच्या विजयापासून केवळ आपल्या हाती सत्ता काबीज करण्याची क्यूबन कम्युनिस्टांची धडपड चालू होती. फिडेलच्या भाषणानंतर त्यांना कळून चुकले की फिडेलच्या 'मार्क्सिस्ट लेनीनीस्ट' रचनेला सत्तेमध्ये स्थान मिळाले असले तरी मॉस्कोवादी कम्युनिस्ट मात्र सत्तेपासून अद्याप दूरच आहेत. सत्ता अजून फिडेल कास्ट्रो आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या हाती आहे. फिडेलच्या मागोमाग अर्थातच त्याच्या सर्व सहकाऱ्यांनीही आपली 'मार्क्सिस्ट–लेनीनीस्ट' निष्ठा जाहीर केली. जे कम्युनिस्ट फिडेलशी एकनिष्ठ होते तेवढेच सरकारात टिकले. पुढे काही महिन्यांनी फिडेलने आपल्या सव्वीस जुलै चळवळीलाच क्यूबन कम्युनिस्ट पक्ष असे नाव दिले आणि क्यूबन कम्युनिस्टांना पार गिळून टाकले.

आपल्या 'साम्यवादाच्या'च्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाबद्दल मास्कोचे गैरसमज नकोत म्हणून काही आठवड्याच्या आतच कास्ट्रोने टेलिव्हिजनवरील एका भाषणात सत्तेच्या जागा काबीज करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कम्युनिस्टांवर सडकून हल्ला केला. आमची खुषी म्हणूनच आम्ही मार्क्झिस्ट-लेनिनीस्ट आहोत हे त्याने पक्के बजावले. साम्यवाद हा केवळ मॉस्कोचाच मक्ता नाही. युगोस्लाव्हियाचा आणि चीनचाही वेगळा साम्यवाद आहे. मॉस्कोच्या साम्यवादापेक्षा अधिक गतिमान आणि अधिक क्रांतीकारी. त्याच धर्तीवर लॅटिन अमेरिकन साम्यवाददेखील असू शकतो हेच जणू कास्ट्रो पटवून देत होता.

कास्ट्रोच्या या अवतारामुळे सुरुवातीला सोव्हिएत रशिया दचकला. रशियन कम्युनिस्ट आणि चिनी कम्युनिस्ट यांच्यात क्यूबावर प्रभुत्व मिळविण्याची स्पर्धा होती. आता पेकिंग पुढे सरकले.

परंतु स्वभावतःच फिडेल हा मॉस्कोच्या किंवा पेकिंगच्या तालावर चालणे शक्य नव्हते. हे जेव्हा रशियनांना कळून चुकले तेव्हा त्यांनी आपले पवित्रे बदलले. मॉस्कोहून क्यूबन कम्युनिस्टांच्या हाती फिडेलला हुकूम पाठविणे बंद केले. क्यूबातील आपला राजदूत बदलला. कास्ट्रोला सबंध क्यूबाचा पाठिंबा आहे हे त्यांना माहिती होते. आणि कास्ट्रोच जर सबंध क्यूबासह आपल्या कंपूत येत असेल तर क्यूबन कम्युनिस्टांनीच सत्ता काबीज केली पाहिजे असा आग्रह धरण्यात अर्थ नाही. आणि कास्ट्रोने आपल्या बाहुल्यासारखेच वागले पाहिजे असाही हट्ट का म्हणून धरायचा.

कास्ट्रो पुरेसा डाव्या विचारसरणीचा आहे, आणि क्यूबा अमेरिकेपासून अवघ्या ९० मैलांवर आहे. तिथे एक लष्करी तळ मिळाला तरी पुरे. कास्ट्रोला तरी आणखी काय हवे होते ?

## मदतीचा ओघ सुरू झाला

अशा रीतीने मॉस्को ताळ्यावर येते आहे असे बघताच फिडेल कास्ट्रोने आपले टीकेचे सत्र थांबविले. लगाम जरा ढिला सोडला. कास्ट्रोवर उपकाराचे ओझे लादण्याची संधी साधण्यासाठी टपून बसलेल्या मॉस्कोकडून त्यामुळे मुक्तपणे मदतीचा ओघ वाहू लागला. बोटी भरभरून शस्त्रास्त्रे येऊ लागली, विमाने येऊ लागली. तंत्रज्ञांच्या तुकडया उतरू लागल्या.

सोव्हिएत रशिया आणि क्यूबा यांचे स्नेहसंबंध अशा रीतीने दृढ होत असतानाच सबंध दक्षिण अमेरिका खंड म्हणजे उत्तर अमेरिका आणि रशिया यांच्यातील शीत युद्धाचे रणांगण बनले होते. दक्षिण अमेरिकेतील विषमता आणि दारिद्र्य हे अमेरिका व रशियालाही आवाहन देणारेच होते. रशियाचे प्रधानमंत्री निकिता क्रुश्चेव्ह यांनी १९६० सालीच म्हटले होते, की लॅटिन अमेरिका म्हणजे धगधगता ज्वालामुखीच होय. लॅटिन अमेरिकेच्या नकाशात रशियाला आता क्यूबामध्ये स्थान तर प्राप्त होत होतेच. रशियाची पुढची दृष्टी होती व्हेनेझुएला, ब्राझील आणि ब्रिटिश गिनीवर.

उत्तर अमेरिकेनेही केनेडींच्या नेतृत्वाखाली लॅटिन अमेरिकेत जोराची आघाडी उभारली होती. 'अलायन्स फॉर प्रोग्रेस' नामक लॅटिन अमेरिकन देशांची १९६१ मध्ये एक संघटना स्थापून साम्यवादी लाटा अॅटलांटिकच्या किनाऱ्यावरच थोपविण्यासाठी उत्तर अमेरिकेने ही भरभक्कम भिंत उभारली होती. वीस देश या संघटनेत सामील झाले होते. लोकशाहीची वृद्धी आणि आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणणे ही या संघटनेची ध्येये. या संघटनेला पुढील दहा वर्षांत दोन हजार कोटी डॉलर्सची मदत देण्याचे उत्तर अमेरिकेने कबूल केले. एका दृष्टीने हा फिडेल कास्ट्रो आणि क्यूबा यांचाच विजय होता. कारण क्यूबन क्रांतिमागची कारणे ओळखूनच अमेरिकेने हा पवित्रा घेतला होता. कास्ट्रोच्या मार्गाने दुसरे कोणतेही या खंडातले राष्ट्र जाता कामा नये, हा खरा त्यामागील हेतू होता.

एवढ्या प्रचंड मदतीचे आश्वासन देऊनही या 'प्रोग्रेस ऑफ अलायन्स'चे भवितव्य १९६२ मध्ये अनिश्चितच दिसत होते. या अलायन्समुळे एक मात्र साधले होते. अख्ख्या अमेरिकन खंडात क्यूबा अगदी एकटा पडला होता. क्यूबाचे कोणाशीही संबंध नव्हते. अशा एकाकी अवस्थेत सोव्हिएत रशिया क्यूबाच्या मदतीला धावून येत होता. त्यामुळे क्यूबाला रशियन मदत ही पर्वणीच वाटत असली पाहिजे. उत्तर अमेरिकेच्या प्रचंड लष्करी छायेत वावरणाऱ्या क्यूबाला तो एक दिलासा होता.

परंतु अजूनही, म्हणजे १९६२ पर्यंत क्यूबनांनी उत्तर अमेरिकेविषयीच्या सर्वच

आशा सोडल्या नव्हत्या. अमेरिका सतत आपल्या डोक्यावर राहणार तेव्हा केव्हा-तरी अमेरिकेशी जुळवून घ्यावे लागणे हेच व्यवहार्य आहे हे क्यूबन विसरले नव्हते. चे गव्हेराने ही कल्पना एका अमेरिकन पत्रकाराला बोलूनही दाखविली होती. फिडेलचे नेतृत्व आणि फिडेलची तत्त्वप्रणालीच क्यूबाला मान्य आहे हे चेने स्पष्ट केले. त्याचप्रमाणे आर्थिक क्षेत्रात क्यूबाला बसलेल्या धक्क्याची कबुलीही त्याने दिली. अमेरिकेशी क्यूबाचे संपूर्ण सामंजस्य निर्माण होणे कठीण असले तरी कोणत्या तरी प्रकारचे कामचलाऊ संबंध ठेवण्यास काय हरकत आहे, असा चेने सवाल केला होता. त्यासाठी चेने काही सूचनाही केल्या होत्या.

परंतु अमेरिकन सरकारने त्याकडे फारसे गंभीरतेने बघितले नाही. परिणाम म्हणजे फिडेल कास्ट्रोचे जानेवारी १९६२ चे वक्तव्य– 'फाशीचा फंदा आणि तीमध्ये अडकलेला माणूस किंवा शृंखला व गुलाम यांच्यात सामंजस्य कसे निर्माण होऊ शकेल ? साम्राज्यवाद ही शृंखला आहे. सामंजस्य अशक्य आहे......आम्ही एवढे वेगळे आहोत, की आमच्यात काहीही देणे घेणे नाही......पुढे कधीतरी आमच्यात संबंध निर्माण होतील–जेव्हा अमेरिकेत क्रांती होईल तेव्हा–'

## रशिया–क्यूबा महत्त्वाचा करार

आणि अशा परिस्थितीत रशिया क्यूबाच्या मदतीला आला. २ जुलै १९६२ रोजी राऊल कास्ट्रो, क्यूबाचा संरक्षणमंत्री मॉस्कोत आला आणि त्याच सुमाराला सोव्हिएत आणि क्यूबन सरकारांनी क्यूबामध्ये अण्वस्त्रधारी अग्निबाणांचे तळ उभारण्याचा महत्त्वाचा करार केला.

क्यूबामध्ये अण्वस्त्रधारी अग्निबाण ठेवण्याची पहिली कल्पना कुणाची, स्वतः फिडेल कास्ट्रोची की निकिता क्रुश्चेव्हची, ही गोष्ट अद्याप स्पष्ट झाली नाही. पण १९६२ च्या मध्याला क्यूबात २ रशियन तंत्रज्ञ प्रचंड अण्वस्त्र तळ उभारीत असल्याच्या गंभीर बातम्या अमेरिकेत येऊ लागल्या आणि अमेरिकन सरकारमध्ये एकच धावपळ उडाली. घबराट पसरली. अमेरिकेपासून अवघ्या नव्वद मैलांवर रशियाचा अण्वस्त्र तळ उभा राहतो म्हणजे काय. अमेरिकन गुप्तहेरखाती काय झोप घेत होती ?

अफवा आणि बातम्या वाढू लागल्या तेव्हा अधिक माहिती मिळविण्याचे आदेश सी. आय. ए. आणि लष्करी हेरखात्याला गेले. ऑक्टोबर १०, १९६२ रोजी क्यूबातील काही भागाची हवाई छायाचित्रे हेरखात्याने अध्यक्ष केनेडी यांच्यापुढे ठेवली तेव्हा ते हबकूनच गेले. क्यूबामध्ये अनेक नवनवीन रस्त्यांची जाळीच पसरलेली दिसत होती. क्यूबन द्वीपकल्पाच्या प्रत्येक इंच भूमीची छायाचित्रे घेऊन तपासणी करण्याचा हुकूम केनेडींनी सोडला. पुढील आठवड्यात अमेरिकन लष्करांच्या टेहळणी विमानांनी क्यूबाची अक्षरशः हजारो हवाई छायाचित्रे घेतली.

या छायाचित्रांमधून येणारा पुरावा जेव्हा केनेडींपुढे गेला तेव्हा ते अक्षरशः

हादरूनच गेले. रशियन तंत्रज्ञांनी क्यूबाच्या उत्तर व पश्चिम किनाऱ्यावर चार प्रचंड अण्वस्त्र तळ उभारले होते. आणखी सहा अण्वस्त्र तळ उभारण्याचे काम चालू होते. छायाचित्रांमध्ये भक्कम सिमेंटची बांधकामे, अग्निबाणांचे जड प्रक्षेपक वाहून नेण्यासाठी घातलेले खास रूळ, मेगॅटन शक्तीचे अग्निबाण आदी गोष्टी स्पष्ट दिसत होत्या. या अण्वस्त्रधारी अग्निबाणांचा पल्ला सुमारे २,५०० मैल होता. त्याचप्रमाणे अणुबाँब वाहून नेणारी ३ ल्युशिन बाँबर्सही दिसत होती. सबंध क्यूबन द्वीपकल्प म्हणजे अमेरिकेकडे तोंड करून उभ्या असलेल्या अण्वस्त्रांचा प्रचंड तळच बनला होता. अमेरिकन अधिकाऱ्यांची झोप उडाली. रशिया हे तळ कशासाठी उभारीत आहे ? अमेरिकेतील सर्व शहरांवर अण्वस्त्राचा वर्षाव करू शकतील अशा तऱ्हेचे अग्निबाण रशियात केव्हापासूनच बसविले असताना पुन्हा क्यूबामध्ये ही अण्वस्त्रे कशाला ? बर्लीनवरून लक्ष उडविण्यासाठी तर नाही ? पेंटॅगॉनमधील अधिकारी रात्र रात्र नकाशे तपासू लागले. बैठका भरवू लागले.

अध्यक्ष केनेडींनी आपल्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक भरविली. हे अग्निबाणतळ तसेच राहू देणे शक्य नव्हते. क्यूबावर सरळ हल्ला करून हे तळ नष्ट करतो म्हटले तर रशियनांचा प्रतिहल्ला होण्याचा धोका होता. कारण ते तळ पूर्णपणे रशियनांच्या हाती उभारले जात होते. अमेरिकेचा कठोरपणा दिसेल अशी पावले टाकायलाच हवी होती. शिवाय रशियनांना पूर्णपणे कोंडीत पकडणेदेखील योग्य नव्हते. माघार घ्यायला मार्ग ठेवायला हवा होता. अखेर क्यूबन द्वीपकल्पाभोवती कडे घालून रशियन जहाजांना आत प्रवेश करण्यास मज्जाव करण्याचा निर्णय केनेडींनी घेतला.

## जगाला हादरा देणारे केनेडीचे भाषण

ऑक्टोबर २२, १९६२ रोजी टेलिव्हिजनवरील भाषणात त्यांनी हा निर्णय जाहीर केला तेव्हा सारे जग हादरून गेले. आता फक्त ठिणगी उडण्याचा अवकाश होता. जग अणुयुद्धाच्या कड्यावर पोचले होते.

केनेडींनी आपल्या भाषणात जाहीर केले की, अमेरिका अथवा इतर कोणताही देश या विरुद्ध क्यूबातील अण्वस्त्रांचा उपयोग होणार नाही याची खात्री करण्यासाठी तेथील अण्वस्त्रे काढून घेण्याचा अमेरिका आग्रह धरीत आहे. क्यूबाला यापुढे कोणतीही शस्त्रास्त्रे जाऊ नयेत यासाठी हा वेढा घालण्यात आला आहे. पश्चिम गोलार्धातील कोणत्याही देशावर क्यूबातून जर एकही अण्वस्त्र सोडले गेले तर हा रशियाचा आपल्यावरील हल्ला आहे असे अमेरिका समजेल आणि त्याचा परिणाम रशियावरील प्रचंड प्रतिहल्ल्यात होईल.

केनेडींच्या भाषणानंतर सर्वत्र एकदम घबराटीचे वातावरण पसरले. अमेरिकन शहरांमधून मोटारीतील कर्ण्यांमधून राखीव सैनिकांनी आपापल्या तळावर ताबडतोब दाखल व्हावे अशा सूचना दिल्या जाऊ लागल्या. अणुयुद्ध सुरू झाले तर नागरिकांनी काय करावे याविषयीची माहिती रेडिओवर दिली जाऊ लागली. काही

तासातच बंदुकांचा आणि घरगुती वस्तूंचा खप प्रचंड वाढला. स्टॉक मार्केट खाली कोसळू लागले. श्वास रोखून सारे जग अणुयुद्धाच्या छायेत वावरू लागले.

दरम्यान जगभर पसरलेल्या अमेरिकन लष्करी तळांना धोक्याचे इशारे देण्यात आले. अण्वस्त्रधारी अमेरिकन पाणबुड्या अज्ञात दिशेने मार्गक्रमण करू लागल्या. अण्वस्त्रधारी बॉंबर विमाने कायमची आकाशात घिरट्या घालू लागली, इतर विमाने दूरदूरच्या छोट्या छोट्या विमानतळावर विखरून ठेवण्यात आली. बर्लीन-मधील अमेरिकन सैन्याने हालचालींना प्रारंभ केला.

अमेरिकन नौदलाने क्यूबापासून आठशे मैलांच्या अंतरावर एक अशी अदृश्य साखळी निर्माण केली की, तीमधून एकाही जहाजाला नजरेस पडल्याविना आत शिरणे शक्य नव्हते. पंचवीस रशियन अण्वस्त्रधारी जहाजे समुद्रातून क्यूबाच्या दिशेने सरकत होती अशी हेरखात्याची माहिती होती. त्यांना साखळीत अडविण्या-साठी अमेरिकन नौदलाची शंभर जहाजे जय्यत तयार होती.

नौदलाला आज्ञा होत्या की, एखादे जहाज या साखळीतून आत शिरण्याचा प्रयत्न करू लागले की त्याला थांबण्याचा इशारा द्यायचा. ते थांबले नाही तर त्याला धोक्याचा इशारा द्यायचा आणि तरीही नाही थांबले तर जहाज बुडवून टाकायचे. इशारा ऐकून जहाज थांबले तर त्याची तपासणी करायची आणि त्यात कोणतीही शस्त्रास्त्रे नसल्यास क्यूबाकडे जाऊ द्यायचे. युद्धसामग्री सापडल्यास त्याला मागे परतण्याचा हुकूम करायचा, तपासणीची हीच पद्धत विमाने आणि पाणबुड्या यांना लावायची होती.

## रशियात काय घडत होते ?

यावेळी रशियात काय घडत होते ? नेहमीप्रमाणे याही बाबतीत अद्यापही पूर्ण रहस्य आहे. बहुधा रशियन लष्करही येईल त्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी सज्ज झाले असावे. क्यूबामध्ये अण्वस्त्रतळ उभारण्याचा निर्णय कास्ट्रो आणि क्रुश्चेव्ह या दोघांचाही. अमेरिकेने याबाबतीत एवढा ताठर पवित्रा घेताच क्रुश्चेव्हच्या या निर्णयाबद्दल त्याच्यावर बरीच टीका झाली असणार.

इकडे अमेरिकन साखळीच्या दिशेने काही रशियन जहाजे सरकतच होती आणि पुढे काय होते आहे याकडे भीतीयुक्त उत्कंठेने सगळ्या जगाचे डोळे लागले होते. ऑक्टोबर २४ रोजी ' बुखारेस्ट ' नावाचे रशियन जहाज अमेरिकन साखळीने अडविले. त्याची तपासणी घेण्यात आली आणि वर कोणतीही युद्धसामग्री नाही याची खात्री झाल्यावर त्याला क्यूबाकडे जाण्याची परवानगी देण्यात आली.

परंतु सतत हेरगिरी करणाऱ्या अमेरिकन टेहळया विमानांना आढळून आले की प्रचंड आग्निबाण आणि अण्वस्त्रे घेऊन येणारी रशियन जहाजे साखळीपर्यंत पोचण्याआधीच नव्वद अंशाचा कोन करून परत फिरू लागली आहेत. परिस्थिती

बिघडू द्यायची नाही असा निर्णय क्रेमलीनमध्ये घेतला गेला असला पाहिजे. ही बातमी पसरली तेव्हा सर्वांनी सुटकेचे निश्वास टाकले. अगदी समोरासमोर उभे ठाकण्याचा प्रसंग टळला होता. अमेरिकेची एक अट मात्र अद्यापही रशियाने मान्य करायची होती. क्यूबातील अण्वस्त्रे काढून घेण्याची.

संयुक्त राष्ट्रसंघात हे प्रकरण निघाले. क्यूबाभोवती घातलेली साखळी चालू असतानाच युनोमधील अमेरिकन प्रतिनिधी अॅडलाय स्टीव्हन्सन यांनी मागणी केली की, रशियनांनी क्यूबातील आपले लष्करी तळ ताबडतोब हलवावेत. तेथील अण्वस्त्रतळ उभारण्याच्या गतीत फरक झाल्याचे अमेरिकन टेहळणी विमानांना अद्याप आढळले नव्हते. क्रुश्चेव्हने अद्याप तोंडातून चकार शब्दही काढला नव्हता. शेवटी अमेरिकेने तुर्कस्तानमधील आपले तळ काढून घ्यावे अशी मागणी रशियाने केली. केनेडींनी या गोष्टीला चक्क नकार दिला. एवढेच नव्हे तर केनेडींनी क्यूबाच्या जवळ असलेल्या फ्लोरिडा किनाऱ्यावर सैन्याची प्रचंड जमवाजमव सुरू केली. रशियाने जर आपले अण्वस्त्रतळ काढून घेतले नाहीत तर हे सैन्य वायुदल आणि नौदल यांच्या मदतीने चाल करून स्वतःच रशियन तळ नष्ट करील अशी धमकीही दिली.

प्रकरण एवढ्या थराला आलेले पाहताच क्रुश्चेव्हने सरळ माघार घेतली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या देखरेखीखाली क्यूबातील रशियन अण्वस्त्रतळ काढून घेतले तरच पुढची बोलणी होऊ शकतील असे केनेडींनी एका पत्राद्वारे क्रुश्चेव्हला कळविले होते. या पत्राला क्रुश्चेव्हने पाठविलेले उत्तर २८ ऑक्टोबर रोजी वॉशिंग्टनला पोचले आणि ताण कमी झाला. जागतिक शांतता राखण्यासाठी आपण तळ काढून घेण्यास तयार आहोत असे रशियाने कळविले. परंतु अण्वस्त्रतळ काढून घेण्यापूर्वी अमेरिका क्यूबावर चाल करून जाणार नाही असे आश्वासन क्रुश्चेव्हने केनेडीकडून मिळविले. आणीबाणी संपली. क्यूबन द्वीपकल्पाभोवतीची अमेरिकन साखळी उठविण्यात आली. दोन राक्षसी, अणुसज्ज राष्ट्रे एकमेकांवर कोसळून पृथ्वीची राख करण्याची भीती टळली.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या एकोणिस अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली क्यूबातील अण्वस्त्रतळ हलवावेत असे ठरले होते. रशियाची संमती होती. पण या संपूर्ण प्रकरणात फिडेल कास्ट्रोला कोणी विचारातच घेतले नव्हते. युनोच्या अधिकाऱ्यांना आपल्या देशात प्रवेश करू देण्यास कास्ट्रोने चक्क नकार दिला. एवढेच नव्हे तर क्यूबातील ग्वेटानामो तळ अमेरिकनांनी सोडल्याशिवाय रेड क्रॉस अधिकाऱ्यांनाही आपल्या देशात येण्याची परवानगी त्याने नाकारली. रशियनांनी त्याची समजूत घालण्यासाठी मिकोयानला पाठविले. पण उपयोग झाला नाही.

इकडे अमेरिकन टेहळ्या विमानांची पाहणी चालू होतीच. रशियन अण्वस्त्रतळ हळूहळू काढून घेतला जात असल्याचे स्पष्ट झाले. अग्निबाण आणि अण्वस्त्रे

जहाजांमधून परत रशियाच्या दिशेने रवाना होऊ लागली. रशिया आणि अमेरिका यांच्यात आधीच एखादा गुप्त करार झाला नव्हता ना? असा संशय यावा एवढ्या वेगाने क्यूबामधील रशियन तळ हलविले जात होते.

परंतु या दरम्यान क्यूबाच्या हाती जी रशियन शस्त्रे येऊन पडली होती त्यामुळे क्यूबाची संरक्षण फळी अगदी भक्कम झाली होती. अण्वस्त्रधारी अग्निबाण जरी हलविले गेले तरी रशियन विमान-वेधी अग्निबाण, १०० मिग विमाने, सुमारे एक डझन युद्धनौका आणि इतर अनेक शस्त्रास्त्रे रशियनांनी क्यूबनाच्या हाती दिली होती. आता कोणत्याही घातपाताच्या मार्गाने अथवा बे ऑफ पिग्ज्सारख्या हाल-चालींनी फिडेल कास्ट्रोला सत्तेवरून खाली खेचण्याचा संभव अधिकच कमी झाला होता.

या अण्वस्त्रतळ प्रकरणी केनेडींचा विजय झाला. बे ऑफ पिग्ज प्रकरणी झालेली मानहानी केनेडींनी या आणीबाणीमध्ये पूर्णपणे भरून काढून अमेरिकेचा सन्मान वाढविला. रशियनांविरुद्धचा अमेरिकेचा कणखरपणा, कोणताही धोका पत्करण्याची तयारी अमेरिकेची ताकद या प्रकरणात जगाला दिसून आली. केनेडींची निर्णय घेण्याची तयारी, थंडपणा आणि नेतृत्व गुणही अमेरिकनांना पटले.

क्रुश्चेव्हची मात्र या प्रकरणी बरीच मानहानी झाली. अमेरिकन सापळ्यात सापडण्या इतक्या टोकाला जाऊन अगदी अमेरिकेच्या कुंपणापाशी अण्वस्त्रतळ उभारण्याचे धाडस केल्याबद्दल त्याच्यावर टीका झाली. क्रुश्चेव्हच्या राजकीय अस्ताची जी अनेक कारणे दिली जातात त्यामध्ये क्यूबातील अण्वस्त्रतळ प्रकरणी रशियाची झालेली मानहानी हेही एक कारण आहे. क्रुश्चेव्हने हा धोका का पत्करला यालाही अनेक कारणे संभवतात. चिनी कम्युनिस्टांशी स्पर्धा करताना


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी** (S. N.) पो. कतरी सराय (गया)

आपण अधिक जहाल आहोत हे दाखविण्यासाठी क्रुश्चेव्हने हे टोकाचे पाऊल टाकले असले पाहिजे असे काही लोक सांगतात.

डिसेंबर १९६२ मध्ये, म्हणजे या आणीबाणी नंतर अडीच महिन्यांनी क्रुश्चेव्हने सुप्रीम सोव्हिएतपुढे भाषण करताना सांगितले, 'क्यूबन सरकारच्या विनंतीवरून ही शस्त्रास्त्रे क्यूबात आपण नेली. त्यामध्ये सुमारे चाळीस इंटरमिजिएट रेंज बॅलॅस्टिक मिसाईल्सचाही समावेश होता. ही सर्व शस्त्रे रशियन लष्कराच्याच हाती राहणार होती. आमचा हेतू हा होता की, क्यूबाचे संरक्षण. क्यूबामध्ये अग्निबाण ठेवल्याने साम्राज्यवाद्यांना अणुयुद्ध आपल्या दाराशी आल्यासारखे वाटेल आणि जे अणुयुद्ध सुरू करण्याची ते वारंवार धमक्या देतात त्याचा धोका आणि गांभीर्य त्यांना अधिक वास्तव रीतीने उमगेल.'

क्रुश्चेव्हला जरी या प्रकरणात माघार घ्यावी लागली तरी एका अर्थाने त्याचे हे उद्गार खरेच ठरले असे म्हणायला हरकत नाही. एरवी अमेरिकेत या हाल-चालीची अशी प्रतिक्रिया झाली नसती. अणुयुद्धाचा धोका किती वास्तव आहे हे अमेरिका आणि रशिया या दोघांनाही या निमित्ताने पटले.

ते काहीही असो, या जागतिक आणीबाणीच्या प्रसंगात आपण बड्या राष्ट्रांच्या खेळातील केवळ एक प्यादे ठरलो हे फिडेल कास्ट्रोला कळून चुकले आणि पुन्हा अशी प्याद्याची भूमिका वठवायची नाही हे त्याने मनोमन ठरवून टाकले. याच प्रसंगातून फिडेलच्या संपूर्ण स्वतंत्र धोरणाचा उदय झाला. उत्तर व्हिएतनाम आणि कोरिया यांच्याप्रमाणे जगातील सर्व दलित राष्ट्रांच्या एकतेवरील निष्ठा जाहीर करून त्याने जागतिक कम्युनिस्ट चळवळीत आपले वेगळे निशाण उभारले.

पुढे एका फ्रेंच वृत्तपत्राला मुलाखत देताना फिडेल कास्ट्रोने सांगितले, 'जागतिक बुद्धिबळाच्या पटावरील एक प्यादे होण्याची क्यूबाची तयारी नाही. क्यूबाचे सार्व-भौमत्व ही वास्तवता आहे; त्यासाठीच तर आम्ही लढलो. क्यूबन सरकारला एका शब्दानेही न विचारता क्रुश्चेव्हने क्यूबातील अग्निबाण काढून घेण्याचे केनेडीला आश्वासन द्यावे ही गोष्ट मी त्यामुळे योग्य मानीत नाही. हा प्रश्न आमच्या ताब्यात नसलेल्या रशियन अग्निबाणांचा होता ही गोष्ट खरी आहे. परंतु हे अग्निबाण क्यूबन भूमीवर होते. म्हणून आमचा सल्ला घेतल्याशिवाय त्याबाबत निर्णय घ्यायला नको होता. आम्ही कुणाचे सेटलाईट नव्हे. अर्थातच सोव्हिएत रशियावर जागतिक राजकारणाच्या जबाबदाऱ्या आहेत आणि आमच्यावर काहीच नाहीत हे आम्ही मानतो. क्रुश्चेव्हला शांतता हवी होती. आम्हालाही हवी होती. परंतु क्यूबन सार्वभौमत्व निकालात काढण्याचा कुणाला अधिकार नाही.'

या प्रसंगाने अमेरिकेला कास्ट्रोने एक धडा शिकवला की, क्यूबाचे स्वातंत्र्य कायम राखण्यासाठी तो कोणत्याही थरापर्यंत जायला तयार आहे. अमेरिकाही हा धडा शिकली. आणि घातपाती हालचालींनी अथवा बे ऑफ पिग्ज सारख्या

प्रयत्नांनी क्यूबन क्रांतिकारकांची राजवट उलथून पाडण्याचे प्रयत्न अमेरिकन सरकारने कायमचे सोडून दिले. थोडक्यात म्हणजे अमेरिकेने क्यूबातील फिडेलच्या राजवटीची अपरिहार्यता मान्य केली. या वेळपर्यंत अमेरिकन राज्यकर्ते अशा भ्रमात होते की, क्यूबामधील बहुसंख्य जनता असंतुष्ट आहे आणि थोड्याशा कारणाने ती फिडेलविरुद्ध उभी ठाकू शकेल. परंतु या आणिबाणीच्या काळात क्यूबन जनतेने फिडेलला जो उत्स्फूर्त पाठिंबा दिला त्याने अमेरिकेचा भ्रमनिरास झाला.

पुढे १९६३ च्या मार्च महिन्यात सोव्हिएत रशियाच्या निमंत्रणावरून फिडेल कास्ट्रोने रशियाला भेट दिली. तेव्हा तेथे त्याचे प्रचंड स्वागत झाले. दुसऱ्या कोणत्याही राजप्रमुखाचे असे उत्स्फूर्त स्वागत मास्कोत झाले नसेल. कास्ट्रोची मनधरणी करून त्याला खूष करण्याचाच हा प्रकार होता.

या स्वागताने कास्ट्रो खूष झाला खरा. पण आपल्या स्वतंत्र धोरणाची कास त्याने काही सोडली नाही. त्याच्या या स्वतंत्र धोरणाचा उद्गाता होता चे गव्हेरा. कास्ट्रोची सत्ता प्रस्थापित झाली होती. राजवटीचे स्थैर्य निश्चित झाले होते. अमेरिकन आक्रमणाची भीती आता जवळजवळ निकालात निघाली होती. स्वसंरक्षणांचा आणि शस्त्रास्त्रांचा प्रश्न काहीसा सुटला होता. कास्ट्रोचे लक्ष होते आता क्यूबाच्या आर्थिक उन्नतीवर आणि चे गव्हेराची नजर होती लॅटिन अमेरिकेतील दरिद्री देशावर. क्यूबामध्ये क्रांतीचा मार्ग खुला झाला होता. पण लॅटिन अमेरिकेतील इतर देश अजून चे आणि कास्ट्रो यांना हाक घालीत होते.

[ क्रमशः ]


# या लेखमालेतील शेवटचा लेखांक पुढील अंकी

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

गाडीभर पैका

तुम्हीही मिळवू शकाल !



पण कसा ?

चालू अक

पृष्ठ क्रमांक ३६–३७ मधील

पत्रक पहा.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

# माणूस

यापुढील १५ ऑगस्ट विशेषांकातील आणखी काही विशेष–

□ **बॅटल ऑफ आराकान**

लेफ्टनंट जनरल थोरात यांच्या आयुष्यातील
एक रोमहर्षक प्रसंग
लेखक : कर्नल आ. भा. जाधव

□ **मंगलधाम**

वासुदेव बळवंत ते अनंत कान्हेरे
रवींद्र पिंगे

□ **५ भूमिगत आठवणी**

नानासाहेब गाडगीळ ( सराफ )

□ **स्वदेशी आंदोलनाची पार्श्वभूमी**

दादुमिया

□ **भागोजी नाईकाचा सशस्त्र उठाव**

डॉ. सुधीर फडके

□ **अवघ्या एकोणचाळिसाव्या वर्षी....**

क्यूबन क्रांतीच्या अद्‌भुतरम्य नायकाचा–
चे गव्हेराचा धीरोदात्त आणि नाट्यमय शेवट

□ **एका रुखवताची कहाणी**

रमेश मंत्री

□ या विशेषांकाची प्रसिद्धी : १२ ऑगस्ट १९७२

□ या विशेषांकाची किंमत : **एक रुपया**

□ आकार नेहमीचा : पृष्ठसंख्या सुमारे शंभर

या विशेषांकानंतरचा १९ ऑगस्टचा अंक निघणार नाही.